# महासागर

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुंबई कार्यालय: बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१. फोन : ०२२ ३१८५ ७७३५

पालघर कार्यालय: २०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८१२९६८७२५

नाशिक कार्यालय: 'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

वितरण: मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | मंगळवार, ११ मार्च २०२५ | वर्ष: ६ | अंक: ८४ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३


## संतुलन ठेवायचे आहे -फडणवीस

**मुंबई,दि.१० प्रतिनिधी**

२१०० रुपये कधीपासून देणार? या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, "असे आहे की, त्यासंदर्भात निश्चितपणे आमचे काम चालले आहे. बघा शेवटी अर्थसंकल्पाचे संतुलन ठेवणे हे देखील महत्त्वाचं आहे आणि आपली घोषणा पण पूर्ण करायची आहे."

"आता ट्रेण्ड आमच्याकडे चांगले आहेत. राष्ट्रीय स्तरावर ७ टक्क्यांवर आहे. पण, त्याचवेळी जर आपल्याला शाश्वत पद्धतीने आपल्या योजना चालवायच्या असतील, तर आर्थिक शिस्त देखील आपल्याला ठेवावी लागेल. तीन टक्क्यांच्या वर जाता येणार नाही. आता मागच्या वर्षी २.९ टक्के झालं. म्हणून आता २.७ पर्यंत आपण आणलेलं आहे", अशी माहिती फडणवीसांनी दिली. "एप्रिल महिन्यामध्ये २१०० रुपये मिळणार नाही. एप्रिल महिन्यामध्ये १५०० रुपयेच मिळतील. ज्यावेळी आम्ही सुरू करू. घोषित करू. आम्ही लपवून थोडी घोषित करणार आहोत? आम्ही घोषित करू की पुढच्या महिन्यापासून २१०० रुपये आणि त्या महिन्यापासून देऊ", असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

### अग्राग्रलेख
### खरीखरी


## शिस्तीचा अर्थसंकल्प

आज ठरल्याप्रमाणे महाराष्ट्राचा अर्थसंकल्प शिस्तीने सादर झाला. महत्त्वाची गोष्ट म्हणजे महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिती पाहता ज्या ज्या ठिकाणी कपात करणे शक्य होते. त्या त्या ठिकाणी अर्थमंत्र्यांनी ती कपात केलेली आहे. निवडणुकीपूर्वी जी जी आश्वासने दिलेली होती. ती बंद केलेली नाहीत. मात्र मागच्या मुख्यमंत्र्यांनी लाडक्या बहिणींना पंधराशे रुपयांच्या एवजी 2100 रुपये करण्याची करण्याची केलेली घोषणा अंमलात येण्यास या अर्थसंकल्पात तरी मुहूर्त सापडलेला नाही. महाराष्ट्र हे देशातील सर्वात श्रीमंत राज्य आहे असे म्हणतात. तसे पाहिले तर अमेरिका जगातील सर्वात श्रीमंत देश आहे. पण त्या देशातही ट्रम्प नावाचा एक्का आल्याबरोबर त्यांनीही कापाकापी सुरू केलेली आहे. आपल्या महाराष्ट्राच्या अर्थमंत्र्यांनी तसे काही केलेले नाही. हे आपले भाग्यच म्हणावयास हवे. या अर्थसंकल्पात अर्थमंत्र्यांनी अर्थाअर्थी जेवढी आर्थिक बेरीज-वजाबाकी करायची आहे तेवढी केलेली आहे. निवडणुकीच्या आधीचा अर्थ आणि त्याचा संकल्प तेव्हा गरजेचा होता. आता गरज संपलेली आहे. विजयमाला गळ्यात पडलेली आहे. त्यामुळे पुढील साडेचार वर्ष तरी विभिन्न कारणे दाखवून महाराष्ट्राच्या उज्वल भविष्यासाठी सर्वांनी थोडा थोडा त्याग करायला हवा. असे आवाहन अर्थमंत्र्यांनी केले. तर त्याला प्रतिसाद देणे मराठी महाराष्ट्राचे आणि विशेष करून मराठी मुंबईचे कर्तव्यच आहे. तो केला पाहिजे. पण अर्थमंत्र्यांनी बऱ्याच सकारात्मक गोष्टी अर्थसंकल्पामध्ये केलेल्या आहेत. त्यामध्ये मुंबईची वाहतूक गतिमान करणे. ही कितीतरी मोठी गोष्ट आहे. आता याच गतिमानतेची प्रगती लवकरच आपल्याला दिसेल आणि मुंबईची वाहतूक वेगवान होईल. अशी अपेक्षा मुंबईकरांनी ठेवलेली असेल. तर ती नक्कीच पूर्ण होईल असे समजूया. मुंबईप्रमाणेच पुणे म्हणा, नागपूर म्हणा किंवा इतरही काही शहरे म्हणा. त्यांचीही तीच समस्या आहे. त्यांच्यासाठीही पुढील अर्थसंकल्पात अर्थमंत्री नक्कीच काहीतरी भरीव करतील. असा विश्वास बाळगायला अजिबात हरकत नाही. शेतकऱ्यांची कर्जमाफी केलेली नाही, मात्र ती करणार नाही. असे अर्थमंत्री बोलले नाहीत, म्हणजे पुढे केव्हा तरी ती होईलच. याबद्दल आपल्या सर्व शेतकरी बांधवांनी निश्चित राहावे. आता आपण शिवशाही बद्दल बोलूया. (शिवशाही म्हणजे शिवशाही बसबद्दल नाही बरे!) छत्रपती शिवरायांच्या काळात ज्या आग्र्यात शिवाजी महाराज औरंग्याच्या कैदेत असताना आणि सुटकेची अजिबात शक्यता नसताना आपला गनिमी कावा दाखवून त्याच्या हातावर तुरी दिल्या आणि त्याला स्वतःचे डोके फोडायला भाग पाडले. त्या आग्र्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभे राहणार आहे. त्याचाच बदला घेताना त्यानंतरच्या काळात शंभूराजांना संगमेश्वरात घरभेद्यांकरवी घात झाल्याने ते औरंग्याच्या ताब्यात गेल्यावर शंभूराजे ज्या निर्भयपणे अत्याचारांना सामोरे गेले. त्या निर्भयपणाचे स्मारक उभारण्याचे ठरवणे ही अत्यंत प्रेरणादायी गोष्ट आहे. पानिपत ही आता म्हण झालेली आहे. एखाद्याचे फार मोठे नुकसान झाल्यावर पानिपत झाले असे म्हणतात. पण पानिपत ही मराठ्यांची शौर्यगाथा आहे. हे आता जवळजवळ सर्वच इतिहासकार मान्य करतात. पराभव झाला तरी मराठी सत्ता जराही हलली नाही, जराही डुलली नाही. हा महाराष्ट्राचा जाज्वल्य इतिहास आहे. मराठे आणि अब्दाली यांच्यात जोरदार युद्ध झालेल्या त्या पानिपत येथील भूमीवर शौर्याचे प्रतीक म्हणून स्मारक उभारण्याची घोषणा समस्त मराठी जनांना सुखावणारी आहे. याशिवाय अभय योजनेमुळे कर सवलतीचा एक महत्त्वाचा निर्णय या अर्थसंकल्पात घेण्यात आलेला आहे. त्यामुळे राज्यातील कर विभागाच्या विविध कायद्यानुसार सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांकडे असलेल्या थकबाकीच्या तडजोडी करता अभय योजना जाहीर करण्यात आलेली आहे. औद्योगिक आणि आर्थिक विकासासाठी मेक इन महाराष्ट्र द्वारे गुंतवणुकीस चालना दिलेली आहे. तसेच पुढील पाच वर्षात 40 लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आणि 50 लाख रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे. मुंबई महानगर प्रदेशचे आर्थिक उत्पादन 2047 पर्यंत 1.5 ट्रिलियन डॉलर करण्याचा संकल्प या निमित्ताने करण्यात आलेला आहे. कृषी व सिंचनासाठी विविध योजना द्वारे अनुदान देण्याची घोषणाही करण्यात आलेली आहे. तसेच महिला सक्षमीकरणासाठी उद्योजकता आणि बचत गटांना आर्थिक सहाय्य आणि मुलींच्या शैक्षणिक सहभागासाठी परीक्षा शुल्कात शंभर टक्के प्रतिपूर्ती करण्याची घोषणाही करण्यात आलेली आहे. ग्रामीण घरकुल योजना आणि शहरी गृहनिर्माणासाठी अनुक्रमे 15000 कोटी आणि 8100 कोटींची तरतूद करण्यात आलेली आहे. पायाभूत सुविधां करिताही पुरेसा निधी घोषित करण्यात आला आहे. राज्यातील प्रत्येक व्यक्तीला पाच किलोमीटरच्या परिघात दर्जेदार आरोग्य सुविधा पुरवण्याकडेही सरकारचे लक्ष असणार आहे. तीर्थक्षेत्र आणि पर्यटन स्थळांचा विकास, जल पर्यटन आणि साहसी पर्यटनाला चालना देण्यासाठी, प्रकल्प निर्मितीचेही धोरण सरकार राबवणार आहे. तसेच खेळाडू तयार व्हावेत. यासाठी पायाभूत सुविधा आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा संकुलासाठी भरीव निधीची तरतूदही करण्यात आलेली आहे. अशाप्रकारे सर्वच बाबतीत शिस्तशीरपणाबद्दल प्रसिद्ध असलेल्या अर्थमंत्र्यांनी महाराष्ट्राला यापुढे शिस्तीत राहावे लागेल. हा सल्लाही दिलेला आहे. 'मराठ्याविना राष्ट्रगाडा न चाले' असे म्हणतात. मुंबई ही आपली आर्थिक राजधानी आहे, असे आपण नेहमीच म्हणतो. तेव्हा आता मुंबईला आर्थिक उंचीवर नेण्यासाठी महाराष्ट्राला प्रयत्न करावे लागतील. त्यामुळे जशी वाहतूक गतिमान होईल. तशीच आर्थिक प्रगतीही गतिमान होईल असा आत्मविश्वास बाळगायला अजिबात हरकत नाही. विशेष म्हणजे आपल्या महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अर्थसंकल्पाचे समतोल साधणारा अर्थसंकल्प, असे कौतुक करून अर्थसंकल्पात संतुलन ठेवणे देखील महत्त्वाचे असते. असेच नमूद केलेले आहे. बड्या घराला सावरताना घरातील खाचखळगे सर्वात प्रथम बुजवावे लागतात. त्याप्रमाणे अर्थमंत्र्यांनी महाराष्ट्राचा गाडा चालवण्यासाठी जी जी पावली उचललेली आहेत. त्याकडे आपण जरा सकारात्मक दृष्टीने पाहिले पाहिजे.


nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023


# अर्थसंकल्प: घोषणांचा पाऊस

## "विकसित भारत-विकसित महाराष्ट्र" संकल्पनेला बळ देणारा अर्थसंकल्प - अजित पवार





**मुंबई, दि. १० प्रतिनिधी**

**"महाराष्ट्र आता थांबणार नाही.., विकास आता लांबणार नाही..." असा निर्धार व्यक्त करत शेती, उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य, पर्यटन, पायाभूत सुविधा आणि सामाजिक विकासासाठी भरीव तरतूद असलेला हा अर्थसंकल्प सादर करण्यात आला. देशांतर्गत आणि विदेशी गुंतवणुकीला चालना देण्याबरोबरच रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी वाढविण्याचे उद्दिष्ट यात आहे. विधानसभा निवडणुकीत राज्यातील जनतेने व्यक्त केलेला विश्वास सार्थ करण्यासाठी हा अर्थसंकल्प महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास अजित पवार यांनी व्यक्त केला.**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचा संकल्प केला आहे. या संकल्पपूर्तीला गती देणारा आणि महाराष्ट्राच्या विकासाला बळकटी देणारा २०२५-२६ चा अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत सादर केला.

अर्थसंकल्पीय भाषणाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, स्वराज्यजननी जिजाऊ माँसाहेब, छत्रपती राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजमाता अहिल्यादेवी होळकर, सावित्रीबाई फुले आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे स्मरण करण्यात आले. संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला गेला.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले की, महाराष्ट्र हा औद्योगिक आणि थेट विदेशी गुंतवणुकीत देशातील अव्वल राज्य आहे. जानेवारी २०२५ मध्ये दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेच्या वेळी राज्य शासनाने ६३ कंपन्यांसोबत सामंजस्य करार केले. यामुळे १५.७२ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून १६ लाख रोजगार निर्मितीचा अंदाज आहे.

महाराष्ट्रात वीज स्वस्त होणार!

गेल्या काही वर्षांपासून वाढत्या वीजदरांमुळे राज्यातील प्रत्येक सरकार सातत्याने जनतेच्या रोषाचा सामना करत असल्याचं पाहायला मिळालं आहे. करोनामुळे (Covid-19) राज्यात लॉकडाऊन लावलेला असताना राज्यातील लाखो कुटुंबांना अनेक पटींनी अधिक वीजबिलं भरावी लागली होती. तेव्हाच्या सरकारला देखील जनतेच्या संतापाला सामोरं जावं लागलं होतं. राज्यातील विद्यमान महायुतीच्या सरकारने निवडणुकीच्या आधी प्रचारकाळात वीज दर कमी करण्याबाबत घोषणा केली होती. दरम्यान, आज राज्याचे अर्थमंत्री व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नव्या सरकारचा पहिला अर्थसंकल्प सादर केला. यावेळी त्यांनी येत्या पाच वर्षांत महाराष्ट्रात वीजेचे दर कमी होतील अशी घोषणा केली आहे.

अजित पवार म्हणाले, "महावितरण कंपनीने पुढील पाच वर्षांसाठी वीजेचे दर निश्चित करण्यासाठीचा प्रस्ताव महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे सादर केला आहे. ऊर्जा क्षेत्रातील नियोजन व कमी दराच्या हरित ऊर्जेच्या खरेदीमुळे येत्या पाच वर्षांमध्ये राज्यातील औद्योगिक वीज दर इतर राज्यांच्या तुलनेत कमी होतील."

**मुंबईतील वाहतूक गतिमान होणार**

अर्थमंत्री म्हणाले, "मुंबई उपनगरातील वाहतूक गतिमान व्हावी यासाठी वर्सोवा ते मढ, वर्सोवा ते भाईंदर किनारी मार्ग, मुलुंड ते गोरेगाव, ठाणे ते बोरीवली आणि ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह भुयारी मार्ग असे ६४ हजार ७८३ कोटी किमतीचे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. ठाणे ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ असा उन्नत मार्ग बांधण्याचं नियोजन असून त्याद्वारे ठाणे, डोंबिवली, कल्याण व इतर महत्त्वाची शहरं विमानतळाशी जोडली जाणार आहेत." तसेच, बाळकुंभ ते गायमुख या ठाणे किनारी मार्गाची लांबी १३.४५ किमी असून त्याचे ३,३६४ कोटींचे खर्चाचे काम २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचं नियोजन असल्याचं अजित पवार यांनी सांगितलं.

**ग्रामसडक योजनेचा पहिला टप्पा पूर्ण**

अजित पवार म्हणाले, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील पहिल्या टप्प्यातील कामं पूर्ण झाली असून दुसऱ्या टप्प्यांतर्गत ९.६१० किमी लांबीच्या रस्त्यांचा दर्जा सुधारण्याची कामं हाती घेतली आहेत. ही कामं मार्च २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचं नियोजन आहे. या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात अतिरिक्त ७ हजार किमी रस्त्यांचं काँक्रिटीकरण केलं जाईल. तिसऱ्या टप्प्यात १ हजार पेक्षा जास्त लोकसंख्या असणारी ३,५८२ गावं १४ हजार किमी लांबीच्या सिमेंट काँक्रीटच्या रस्त्याने प्रमुख जिल्हा-राज्य-राष्ट्रीय महामार्गांना जोडली जातील. याची एकूण किंमत ३०,१०० कोटी रुपये इतकी आहे. पहिल्या टप्प्यात ८ हजार कोटींची केली जाणार आहेत.

**अभय योजना – कर सवलतीचा महत्त्वाचा निर्णय**

वस्तू व सेवा कर लागू होण्यापूर्वीच्या राज्यकर विभागाच्या विविध कायद्यांनुसार सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांकडे असलेल्या थकबाकीच्या तडजोडीकरिता "अभय योजना" जाहीर करण्यात आली. ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत लागू असलेल्या या योजनेमुळे थकबाकीदार कंपन्यांना दिलासा मिळणार आहे.

## मुंबईसाठी बजेटमध्ये काय घोषणा

- राज्याचे लॉजिस्टिक्स धोरण जाहीर करण्यात आले आहे. 5 लाख प्रत्यक्ष अप्रत्यक्ष नोकऱ्या निर्माण करण्यात येणार आहेत. मुंबई महानगर प्रदेश हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे आर्थिक विकास केंद्र, म्हणजेच "ग्रोथ हब" म्हणून विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वांद्रे-कुर्ला संकुल, कुर्ला-वरळी, वडाळा, गोरेगाव, नवी मुंबई, खारघर व विरार - बोईसर या सात ठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाची व्यापार केंद्रे निर्माण केली जाणार आहेत. त्यामुळे, मुंबई महानगर प्रदेशाची अर्थव्यवस्था सध्याच्या 140 बिलियन डॉलरवरून सन 2030 पर्यंत 300 बिलीयन डॉलर, तर सन 2047 पर्यंत 1.5 ट्रिलीयन डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दीष्ट आहे. गेटवे ऑफ इंडिया, मुंबई येथून मांडवा, एलिफंटापर्यंत सुरक्षित प्रवासाकरिता अत्याधुनिक सुविधायुक्त बोटींसाठी आर्थिक प्रोत्साहन देण्याचे धोरण जाहीर करण्यात येणार आहे.

## लाडकी बहीण योजना

"मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" योजनेंतर्गत सुमारे 2 कोटी 53 लाख लाभार्थी महिलांना जुलै, 2024 पासून आर्थिक लाभ देण्यात येत आहे. त्यासाठी 33 हजार 232 कोटी रुपये खर्च झाला आहे. सन 2025-26 मध्ये या योजनेकरीता एकूण 36 हजार कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे. या योजनेतून मिळणाऱ्या अनुदानाचा उपयोग काही महिला गटांनी आर्थिक उपक्रमासाठी बीज भांडवल म्हणून केला असून अशा गटांना आणखी प्रोत्साहन देण्यासाठी विशेष योजना हाती घेण्याचे विचाराधीन आहे. दीनदयाल अंत्योदय योजना - राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियानांतर्गत सुमारे 22 लाख महिलांना "लखपती दिदी" होण्याचा मान मिळाला असून सन 2025-26 मध्ये आणखी 24 लाख महिलांना लखपती करण्याचे उद्दीष्ट आहे. नवी मुंबईत उलवेमध्ये 194 कोटी 14 लाख रुपये किंमतीच्या "युनिटी मॉल"चे काम प्रगतीपथावर आहे . बचतगटांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात एक "उमेद मॉल" उभारण्याचे शासनाने ठरवले असून पहिल्या टप्प्यात 10 जिल्ह्यांसाठी 150 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

- मुंबई उपनगरातील वाहतूक गतीमान करण्यासाठी वर्सोवा ते मढ खाडीपूल, वर्सोवा ते भाईंदर किनारी मार्ग, मुलंड ते गोरेगाव, ठाणे ते बोरिवली, ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह भुयारी मार्ग असे ६४,७८३ कोटी रुपयांचे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील खोपोली ते खंडाळा या घाट लांबीतील मिसिंग लिंक प्रकल्पाचं काम ऑगस्ट २०२५ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे.

## संगमेश्वर येथे छत्रपती संभाजी महाराजांचे भव्य स्मारकाची घोषणा

छत्रपती शिवाजी महाराजांचं अरबी समुद्रात भव्य स्मारक उभारण्याची घोषणा करणाऱ्या राज्य सरकारने त्या स्मारकाच्या प्रत्यक्ष कामाला अद्याप सुरुवात केलेली नाही. अशातच राज्यातील महायुती सरकारने छत्रपती संभाजी महाराजांचं भव्य स्मारक उभारण्याची घोषणा केली आहे. उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी आज राज्यातील नव्या सरकारचा पहिला अर्थसंकल्प सादर केला. यावेळी त्यांनी ही घोषणा केली आहे. यासह हरियाणातील पानिपत येथे मराठ्यांच्या युद्धाचं स्मारक बांधण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचंही जाहीर केलं. उत्तर प्रदेशमधील आग्रा येथे शिवाजी महाराजांचं स्मार्क उभारणार असल्याची घोषणा अजित पवारांनी आज केली. अजित पवार म्हणाले, "छत्रपती शिवरायांनी स्थापन केलेल्या स्वराज्याच्या रक्षण आणि विस्तारासाठी जीवन समर्पित केलेल्या, असीम शौर्य आणि धैर्याने लढलेल्या, सर्व लढायांत विजयश्री मिळवणाऱ्या छत्रपती संभाजी महाराजांच्या पराक्रमाच्या खुणा महाराष्ट्रात जिथे आहेत, त्यात कोकणातील संगमेश्वर हे एक प्रमुख ठिकाण आहे. औरंगजेबाच्या महाकाय सेनेशी महाराजांनी बोटावर मोजता येतील एवढ्या शूर मावळ्यांना सोबत घेऊन येथेच पराक्रमाची शर्थ केली. स्वराज्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या स्वाभिमानी राजाच्या पराक्रमाची स्मृती कायमस्वरुपी जपण्यासाठी संगमेश्वर येथे त्यांचे भव्य स्मारक उभारण्याची मी घोषणा मी करतो."

**पानिपत येथे स्मारक उभारण्याचा निर्णय**

अजित पवार म्हणाले, "स्वराज्यासाठी बलिदान देणाऱ्या लाखो मराठ्यांच्या शौर्याचे प्रतीक म्हणून हरियाणातील पानिपत येथे यथायोग्य स्मारक उभारण्याचा निर्णयही आम्ही घेतला आहे. हरियाणा शासनाच्या मदतीने या स्मारकासाठी जागा उपलब्ध करुन घेण्यात येईल."

**आग्र्यात महाराजांचे स्मारक उभारणार**

मुघलांच्या नजरकैदेतून आग्र्याहून सुटका हा शिवचरित्रातील प्रेरणादायी प्रसंग आहे. छत्रपती शिवाजी महाराज नजरकैदेत होते, तेथे भव्य स्मारक उभारण्याचे राज्य शासनाने ठरवले आहे. त्यासाठी उत्तर प्रदेश शासनाच्या सहकार्याने जागा उपलब्ध करुन घेण्यात येईल, अशी माहिती अजित पवार यांनी दिली.

## अर्थसंकल्पाची ठळक वैशिष्ट्ये

**राजकोषीय तूट:**

राजकोषीय तूट स्थूल राज्य उत्पन्नाच्या ३% पेक्षा कमी ठेवण्यात यश.
महसुली तूट १% पेक्षा कमी.
२०२५-२६ मध्ये राजकोषीय तूट १,३६,२३५ कोटी रुपये.

**औद्योगिक आणि आर्थिक विकास:**

"मेक इन महाराष्ट्र" धोरणाद्वारे गुंतवणुकीस चालना.
पुढील ५ वर्षांत ४० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आणि ५० लाख रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट.
मुंबई महानगर प्रदेशाचे आर्थिक उत्पादन २०४७ पर्यंत १.५ ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचा संकल्प.

**कृषी आणि सिंचन:**

शेतकऱ्यांसाठी विविध योजना आणि अनुदान.
२०२४-२५ मध्ये कृषी क्षेत्राचा विकासदर ८.७% पर्यंत वाढवला.
शेती उत्पादनात मूल्यवर्धन आणि सिंचन सुविधांमध्ये मोठी गुंतवणूक.

**महिला सक्षमीकरण:**

महिला उद्योजकता आणि स्वयंपूर्ण गटांना आर्थिक सहाय्य.
व्यावसायिक शिक्षणात मुलींच्या सहभागासाठी शिक्षण व परीक्षा शुल्काची १००% प्रतिपूर्ती.

**गृहनिर्माण:**

पुढील ५ वर्षांत "सर्वांसाठी घरे" धोरण.
ग्रामीण घरकुलांसाठी १५,००० कोटी, शहरी गृहनिर्माणासाठी ८,१०० कोटींची तरतूद.

**पायाभूत सुविधा:**

वाढवण बंदर, नवी मुंबई विमानतळ, बुलेट ट्रेन, मेट्रो प्रकल्प यांसाठी भरीव तरतूद.
सर्व वाहतूक क्षेत्रांसाठी पुरेसा निधी.

**आरोग्य आणि शिक्षण:**

प्रत्येक व्यक्तीला ५ किमीच्या परिघात दर्जेदार आरोग्य सुविधा.
राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी.

**कर प्रणाली आणि वित्त व्यवस्थापन:**

जीएसटीमधून राज्याच्या उत्पन्नात दरवर्षी १२-१४% वाढ.
सार्वजनिक मालमत्ता मुद्रीकरण आणि नवीन वित्त धोरण.

**सांस्कृतिक आणि पर्यटन विकास:**

तीर्थक्षेत्र, पर्यटनस्थळांचा विकास.
जलपर्यटन आणि साहसी पर्यटन प्रकल्प.

**क्रीडा आणि युवक धोरण:**

पायाभूत सुविधा आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा संकुलांसाठी भरीव निधी.

## भाषणाचा सुकाळ, निधीचा दुष्काळ – वडेट्टीवार

**मुंबई, दि. १० प्रतिनिधी**

महायुती सरकारचा पहिला अर्थसंकल्प आज अर्थमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत सादर केला. मात्र, हा अर्थसंकल्प म्हणजे फक्त घोषणांचा सुकाळ आणि निधीचा दुष्काळ असल्याची जोरदार टीका काँग्रेस विधी मंडळाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. सरकारने निवडणुकीपूर्वी गुलाबी जॅकेट घालून मतं मागितली, पण सत्ता मिळाल्यानंतर ना ते जॅकेट राहिलं, ना लाडक्या बहिणींचा उल्लेख अर्थसंकल्पात केला. हा सरळसरळ महिलांचा विश्वासघात आहे, असा आरोपही त्यांनी केला.

महायुती सरकारने निवडणुकीपूर्वी 'लाडकी बहीण' योजनेची मोठी जाहिरातबाजी केली. मात्र, या योजनेसाठी अर्थसंकल्पात कोणतीही भरीव तरतूद नाही. महिलांना दरमहा २१०० रुपये देण्याची घोषणा फोल ठरली असून, सरकार वेगवेगळे निकष लावून महिलांना अपात्र ठरवत आहे. यावरून सरकारच्या तिजोरीत खडखडाट असल्याचे स्पष्ट होते, असे वडेट्टीवार यांनी सांगितले.



महायुती सरकारने निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, आजच्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी कोणतीही ठोस घोषणा करण्यात आलेली नाही. यामुळे बळीराजाच्या पदरी निराशा पडली आहे. बँका आता शेतकऱ्यांना कर्ज देणार नाहीत, त्याला जबाबदार कोण? असा सवालही वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

या अर्थसंकल्पात शहरी भागातील प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणात निधी दिला गेला आहे. विशेषतः मुंबई आणि पुण्यातील पायाभूत सुविधांसाठी मोठ्या तरतुदी करण्यात आल्या, तसेच नागपूरच्या प्रकल्पांनाही भरघोस निधी मिळाला. मात्र, ग्रामीण भागातील योजना आणि प्रकल्पांकडे सरकारने साफ दुर्लक्ष केले. हा अर्थसंकल्प कंत्राटदारांसाठी आहे, सर्वसामान्यांसाठी नाही, अशी टीकाही वडेट्टीवार यांनी केली.

महायुती सरकारच्या अर्थसंकल्पानंतर महाविकास आघाडीने विधानभवनाच्या पायऱ्यांवर सरकारविरोधात जोरदार आंदोलन केले. हा अर्थसंकल्प म्हणजे घोषणांचा सुकाळ आणि निधीचा दुष्काळ असून, सरकारने फसव्या घोषणा देण्यापलीकडे काहीही केले नाही, असा संताप विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केला.

## "सेव्हन हेवन" अर्थसंकल्प सादर सर्वसामान्य लोकांची थट्टा – जयंत पाटील

**मुंबई, दि. १० प्रतिनिधी**

राज्य सरकारने आज विधानसभेत अर्थसंकल्प सादर केला. मात्र, या अर्थसंकल्पावर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) चे प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांनी जोरदार टीका करत "हा फक्त श्रीमंतांसाठी पूल आणि टनेलचा सपाटा असलेला 'सेव्हन हेवन' अर्थसंकल्प असून, सामान्य जनतेला फसवणारा आहे," असे म्हटले.



जयंत पाटील यांनी अर्थसंकल्पातील वाढत्या तुटीवरही जोरदार हल्लाबोल केला. मागील वर्षी महसुली तूट २०,००० कोटी दाखवली होती, ती ४५,८९२ कोटींवर पोहोचली आहे. एकूण तूट ६०,००० कोटींवर जाण्याची शक्यता आहे. राजकोषीय तूट १.१० लाख कोटींवरून १.३६ लाख कोटींवर गेली असून, हा आकडा दीड लाख कोटींवर जाईल. गरीब, मध्यमवर्गीयांसाठी कोणतीही ठोस घोषणा नाही. जयंतराव पाटील यांनी सरकारच्या धोरणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत सांगितले की, "जे श्रीमंत आहेत, गाड्यांमध्ये फिरतात, त्यांच्यासाठी सरकारने मोठ्या प्रमाणावर पूल आणि टनेलच्या घोषणा केल्या आहेत. पण एसटी, रेल्वेने प्रवास करणाऱ्या गरीब आणि मध्यमवर्गीय नागरिकांकडे सरकारने पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे."

शिवभोजन योजनेचा अर्थसंकल्पात उल्लेख नाही, त्यामुळे ही योजना बंद करण्याचा सरकारचा हेतू स्पष्ट दिसतो. 'आनंदाचा शिधा' योजनेवरही भर नाही, कारण आता निवडणुका संपल्या आहेत.

## ते काही मनातून जात नाही
## अजितदादांचा शिंदेंना चिमटा

**मुंबई, दि. १० प्रतिनिधी**

विधीमंडळात राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी नव्या सरकारचा पहिला अर्थसंकल्प सादर केला. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार या तिघांनी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी अजित पवारांनी एकनाथ शिंदेंच्या वक्तव्यावर शाब्दिक कुरघोडी करत चिमटा काढल्याचं पाहून सभागृहात एकच हशा पिकला होता. मुख्यमंत्रिपदाची खुर्ची एकनाथ शिंदेंच्या मनातून अद्याप गेलेली नाही अशा अर्थाची टिप्पणी अजित पवारांनी यावेळी केली होती.



पत्रकार परिषदेत बोलायला सुरुवात सुरुवात केल्यानंतर एकनाथ शिंदे म्हणाले, "आमच्या नव्या सरकारच्या कार्यकाळातील हे पहिलं अर्थसंकल्पीय अधिवेशन असून आम्ही आज पहिला अर्थसंकल्प मांडला. राज्याचा याआधीचा अर्थसंकल्प मांडला तेव्हा देखील आम्ही तिघेजण इथे होतो, आजही आहोत. यावेळी फक्त खुर्च्यांची थोडी अदलाबदल झाली आहे." यावर अजित पवारांनी देवेंद्र फडणवीसांकडे इशारा केला व त्यांना म्हणाले, "ते काही मनातनं जात नाही". यावर सभागृहात एकच हशा पिकला. फडणवीसही यावर हसले.

अजित पवारांच्या चिमट्यानंतर एकनाथ शिंदे म्हणाले, "खुर्च्यांची अदबलाबदल झाली असली तरी टीम तीच आहे". त्यावर फडणवीस म्हणाले, "अदलाबदल झाली असली तरी बदलाबदल झालेली नाही. त्यानंतर शिंदे म्हणाले, "आम्ही एक टीम म्हणून गेल्या अडीच वर्षांपासून चांगलं काम करत आहोत. तेच काम आताही आम्ही पुढे नेत आहोत. आज आमच्या सरकारने मांडलेला अर्थसंकल्प हा राज्याच्या सर्वांगिण विकासाला चालना देणारा असा अर्थसंकल्प आहे.

अधिवेशनाच्या सुरुवातीला घेतलेल्या पत्रकार परिषदेतही अजित पवारांनी अशाच पद्धतीने एकनाथ शिंदे यांची फिरकी घेतली होती. त्यावेळी, महायुती सरकारची नवीन टर्म असली तरी टीम जुनीच आहे. फक्त आमच्या दोघांच्या (एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस) खुर्चीची आदलाबदल झाली आहे. पण अजित पवारांची खुर्ची फिक्स आहे", असं मिश्कील वक्तव्य उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं. यावर लगेचच अजित पवार यांनी देखील गंमतीदार उत्तर दिलं. "तुम्हाला (एकनाथ शिंदे) खुर्ची (मुख्यमंत्री पदाची खुर्ची) फिक्स ठेवता आली नाही, त्याला मी काय करू", असं म्हणत अजित पवार यांनी एकनाथ शिंदे यांची फिरकी घेतली.

## मारल्या होत्या थापा भारी, केलाय महाराष्ट्र कर्जबाजारी – उद्धव ठाकरे

**मुंबई, दि. १० प्रतिनिधी**

राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पावर शिवसेना (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी जोरदार टीका केली आहे. "मारल्या होत्या थापा भारी, केलाय महाराष्ट्र कर्जबाजारी," अशा शब्दांत त्यांनी सरकारवर हल्लाबोल केला. महाराष्ट्र आर्थिक संकटात सापडला असून, महसुली तूट आणि कर्जाचा बोजा वाढतच आहे. मात्र, सरकारच्या घोषणांचा फक्त देखावा करण्यात येत असल्याचा आरोप त्यांनी केला. अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया देताना उद्धव ठाकरे म्हणाले, "मागील वर्षभरात सरकारने मोठमोठ्या घोषणा केल्या, पण प्रत्यक्षात त्या पूर्ण झालेल्या नाहीत. विकासाच्या नावाखाली महाराष्ट्राला कर्जाच्या खाईत ढकलले जात आहे. महसुली तूट ४५ हजार कोटींवर पोहोचली असून, राज्यावरचा एकूण कर्जाचा बोजा दीड लाख कोटींपर्यंत जाणार आहे."

ठाकरे यांनी सरकारच्या धोरणांवर निशाणा साधत शेतकरी, मध्यमवर्गीय आणि गरीब जनतेकडे सरकारने दुर्लक्ष केल्याचा आरोप केला. शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी नाही, अनुदान नाही. प्रधानमंत्री सन्मान योजनेतील ३,००० रुपयांची वाढ कुठेच दिसत नाही. एसटी बसने आणि रेल्वेने प्रवास करणाऱ्या सर्वसामान्यांसाठी कोणतेही ठोस निर्णय नाहीत. शिवभोजन थाळी योजनेचा उल्लेख नाही, म्हणजे ती बंद करण्याचा सरकारचा डाव दिसतो. महागाई आणि बेरोजगारी कमी करण्यासाठी कोणत्याही ठोस उपाययोजना नाहीत, अशी टीका त्यांनी केली. ठाकरे म्हणाले, "गाडीतून फिरणाऱ्यांसाठी पूल आणि टनेलची भरमार घोषणा आहे, पण सामान्य जनतेसाठी काहीच नाही. ज्यांच्या खिशात आधीच पैसा आहे, त्यांना फायदा मिळेल, पण मध्यमवर्गीय आणि गरीब माणसाला कोणतेही दिलासा नाही."

## राज्यात चारचाकी वाहनांच्या किंमती वाढणार

**मुंबई, दि. १० प्रतिनिधी**

राज्याच्या अर्थसंकल्पात सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत २० हजार १६५ कोटी रुपयांची भरीव तरतूद करण्यात आली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत ही तरतूद २ हजार कोटी रुपयांनी अधिक आहे. या अर्थसंकल्पामध्ये महसुली जमा ५ लाख ६० हजार ९६४ कोटी रुपये व महसुली खर्च ६ लाख ६ हजार ८५५ कोटी रुपये अंदाजित करण्यात आली आहे. त्यामुळे ४५ हजार ८९१ कोटी रुपये अंदाजित तूट असल्याचं सांगत अजित पवारांनी वाहन कर, मुद्रांक शुल्क वाढीचा प्रस्ताव सादर करत अर्थसंकल्पात मोठा झटका दिला आहे.

राज्यात सध्या व्यक्तिगत मालकीच्या परिवहनेतर चारचाकी सीएनजी आणि एलपीजी वाहनांवर वाहन प्रकार आणि किंमतीनुसार ७ ते ९ टक्के दराने मोटार वाहन कराची आकारणी केली जाते, या कराच्या दरांमध्ये १ टक्क्याने वाढ करण्यात आली आहे. यामुळे २०२५-२६ या काळात १५० कोटी रूपयांचा अतिरिक्त महसूल राज्याला मिळणे अपेक्षित आहे.

त्याशिवाय राज्यात ३० लाखांहून अधिक किंमतीच्या इलेक्ट्रिक वाहनांवर ६ टक्के दराने मोटार वाहन कर आकारण्याचा प्रस्ताव अजित पवारांनी अर्थसंकल्पात मांडला. मोटर वाहन कराच्या कमाल मर्यादेतही २० लाख रूपयांवरून ३० लाखापर्यंत वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सरकारच्या या निर्णयामुळे राज्याला १७० कोटी रुपयांचा अतिरिक्त महसूल मिळेल अशी अपेक्षा अर्थमंत्री अजित पवारांनी व्यक्त केली आहे.

तसेच बांधकामासाठी वापरल्या जाणाऱ्या क्रेन्स, कॉम्प्रेसर, प्रोजेक्टर्स आणि एक्सॅव्हेटर्स या प्रकारातील वाहनांना एकरकमी वाहन किंमतीच्या ७ टक्के दराने मोटार वाहन कर आकारला जाणार आहे. प्रस्तावित वाहन कर सुधारणेमुळे राज्याला १८० कोटी अतिरिक्त महसूल मिळेल. ७५०० किलो वजनापर्यंतच्या मालवाहतूक करणाऱ्या हलक्या वाहनांवर ७ टक्के मोटर वाहन कर, त्यामुळे ६२५ कोटी रूपयांचा अतिरिक्त महसूल राज्याला मिळण्याची अपेक्षा असल्याचं अजित पवारांनी सांगितले.

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील कलम ४ नुसार, एकाच व्यवहाराच्या पूर्ततेसाठी एका पेक्षा जास्त दस्तएवजांचा वापर केल्यास पुरक दस्तएवजांना १०० रूपयांएवजी ५०० रूपये इतके मुद्रांक शुल्क आकारले जाईल. त्याशिवाय एखाद्या दस्तावर भरावयाच्या मुद्रांक शुल्काबाबत सध्या आकारण्यात येणारे शुल्क १०० एवजी १००० इतके करण्याचं राज्य सरकारने ठरवले आहे.

राज्य सरकारने मोटर वाहन करात वाढ केल्याने येत्या काळात वाहन खरेदी करणाऱ्या ग्राहकांच्या खिशाला आणखी झळ बसण्याची शक्यता आहे. कुठलेही वाहन खरेदी करताना त्याची एक्स शोरूम प्राईस आणि ऑन रोड प्राईस यात फरक आढळतो. शोरूममधून कार प्रत्यक्षात रस्त्यावर येईपर्यंत अनेक कार आकारले जातात. त्यात मोटार वाहन कर हा राज्य सरकार आकारते. त्यात वाढ झाल्यास कारच्या किंमतीतही वाढ होते.

> महत्त्वाचे

## म्हसरूळ पोलिसांची पायी पेट्रोलिंग

**आडगाव ।** नाशिक शहरात वाढती गुन्हेगारी, हाणामारी, टवाळखोरी, लूटमार आणि मद्यपान करून रॅश ड्रायव्हिंगचे प्रकार वाढल्याने पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी कारवाईचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने म्हसरूळ पोलीस



स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल डहाके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी पायी पेट्रोलिंग करून टवाळखोरांवर कारवाई केली. ट्रिपल सीट, विना हेल्मेट अशा लोकांनवर कारवाई केली. यावेळी पोलीस रस्त्यावर उतरून कारवाई करताना बघून नागरिकांमध्ये समाधाचे वातावरण तयार झाले. अशीच कारवाई नेहमी पोलिसांनी करावी, अशी अपेक्षा नागरिकांनी केली आहे. उपनिरीक्षक दीपक पठारे, उपनिरीक्षक परदेशी हवालदार खराटे, गुणवंत गायकवाड, ज्ञानेश्वर कातकडे, प्रमोद गायकवाड यांनी करवाई केली.

## आगळा वेगळा समाजसेवी महिला दिन

**पिंपळगाव बसवंत ।** शनिवारी सर्वत्र महिला दिनानिमीत्त वेगवेगळे समारंभ संपन्न झाले.



सत्कार सोहळे, सन्मानपत्राने गौरव झाला; पण पिंपळगावातील समाजसेवी प्रा. कावेरी देवरे-पगारे या पिंपळगावच्या अचिव्हर युनिव्हर्स मुलींच्या सायन्स कॉलेजमध्ये कार्यरत असुन समाज सेवेची गोडी असल्याने महिला दिनानिमित्त चिंचखेड परिसरात बाहेरून आलेल्या गरीब महिलांना पदरमोड करून त्यांच्या वस्तीवर जाऊन साड्या व गुलाब पुष्प दिले. सदर महिलांना महिला दिन माहीत नसतांना त्यांना सन्मानीत केले.

## डॉ. फडके वाचनालयात महिला दिन साजरा

**सिडको ।** येथील डॉ. सुधीर फडके सार्वजनिक वाचनालय, सीआयटीयु आणि जनवादी महिला संघटनेच्यावतीने जागतिक कामगार महिला दिनानिमित्त "स्त्री : काल, आज आणि उद्या" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. सुप्रसिद्ध विचारवंत आणि संपादक दीप्ती राऊत आणि कवयित्री अनिलराव वाघ यांनी व्याख्यान दिले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सीटूचे राष्ट्रीय उपाध्यक्ष व राज्याध्यक्ष डॉ. डी. एल. कराड होते. वाचनालयाचे कोषाध्यक्ष कवी विवेक उगलमुगले यांनी सूत्रसंचालन करून प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमात ॲड. वसुधा कराड यांनी चार कर्तृत्ववान महिलांचा सत्कार केला. त्यांना शाल, श्रीफळ, सन्मानपत्र आणि पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. लहान विद्यार्थिनींचाही विशेष सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात डॉ. डी. एल. कराड यांनी महिलांच्या योगदानाचे महत्त्व विशद केले. रेखा खैरनार आणि रत्नमाला सोनजे यांनी विशेष सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. यावेळी राष्ट्रपती पुरस्कार विजेत्या शिक्षिका शकुंतला जायभावे, सीटूचे जिल्हाध्यक्ष कॉ. सिताराम ठोंबरे, ॲड. तानाजी जायभावे यांच्यासह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## अभिनव बालविकास मंदिर शाळेत महिला दिन साजरा

**सिडको ।** मविप्र समाज संचलित, अभिनव बालविकास मंदिर, उत्तमनगर सिडको. शाळेत जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. मुख्याध्यापिका ज्योती पवार व ज्येष्ठ शिक्षिका नीलिमा बच्छाव यांनी राजमाता जिजाऊ, झाशीची राणी, सावित्रीबाई फुले, अहिल्याबाई होळकर या सर्व महान स्त्रियांच्या प्रतिमांचे पूजन केले. उपशिक्षिका शितल सोळुंके यांनी जागतिक महिला दिन का साजरा करतो याविषयी सविस्तर माहिती सांगितली. तसेच यानिमित्ताने शाळेतील विद्यार्थ्यांनी महिला दिनानिमित्त कविता सादर केले. तसेच मा. मुख्याध्यापिका पवार मॅडम यांनी मनोगत व्यक्त केले. महिला दिनाची माहिती दिली. याप्रसंगी शाळेतील विद्यार्थिनींनी राजकीय, सामाजिक, क्रीडा, व्यावसायिक क्षेत्रातील प्रसिद्ध स्त्रियांची वेशभूषा केली होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेणुका मुसळे यांनी केले. कार्यक्रमाला सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता।





## विद्या प्रबोधिनी प्रशाला इंग्रजी शाळेत महिलादिन साजरा

**नाशिक ।** येथील सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटी संचलित विद्या प्रबोधिनी प्रशाला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत आंतरराष्ट्रीय महिलादिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचा प्रारंभ दीपप्रज्वलन स्वागत सत्काराने झाला. कार्यक्रमासाठी आदिवासी आयुक्त लीना बनसोड प्रमुख अतिथी म्हणून लाभल्या होत्या. कार्यक्रमास संस्थेचे सरकार्यवाह हेमंत देशपांडे व कार्यवाह मिलिंदनवैद्य यांचीही विषेश उपस्थिती लाभली होती. लीना बनसोड यांनी विद्यार्थ्यांशी यावेळी संवाद साधला. त्या म्हणाल्या की, कधीही एक मुलगी म्हणून त्यांनी स्वताला दुय्यम समजले नाही. त्यांनी सदैव नव-नवीन आव्हाने स्वीकारली आणि ते यशस्वीपणे पार पाडले. तसेच त्यांनी रोजच्या जीवनात स्त्री-पुरुषांची समानता याचे बीज लहान वयातच घरा-घरातून पेरले जावे यासाठी मुलगा मुलगी हा भेद समाजात करू नये याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमात विद्यार्थिनींनी राणी लक्ष्मीबाई, सिंधुताई सपकाळ, द्रौपदी मुर्मु , आनंदीबाई जोशी, किरण बेदी, मुक्ताबाई, कल्पना चावला, पी.व्ही. सिंधू, जिजामाता, राजमाता अहिल्याबाई होळकर, मेरीकॉम, सावित्रीबाई फुले, प्रतिभाताई पाटील, इंदिरा गांधी, हिरकणी या सर्व थोर महिलांच्या वेशभूषा धारण करून त्यांच्या कर्तृत्वावाचा सन्मान केला. कार्यक्रमासाठी शालेय समितीचे अध्यक्ष जयंत खेडेकर, मुख्याध्यापक राजन चेट्टीयारसर यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्राची देशपांडे, अनिता हिरे, पौर्णिमा जाधव, प्रगती जाधव, वर्षा टीचर व सर्व शिक्षक कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



नाशिक । रामशेज किल्ला येथे स्वच्छता मोहीम राबविलेले स्वच्छता दूत.

## किल्ले रामशेज येथे श्रमदान, स्वच्छता मोहीम उत्साहात

**सिडको ।** भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा आणि मावळा मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित किल्ले रामशेज श्रमदान आणि स्वच्छता मोहीम मोठ्या उत्साहात पार पडली. या मोहिमेत सर्व मित्र परिवार आणि किल्ले दुर्ग संवर्धन सभासदांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

गड-किल्ल्यांचे संवर्धन आणि स्वच्छता राखण्याच्या उद्देशाने आयोजित या मोहिमेअंतर्गत रामशेज किल्ल्यावरील परिसर स्वच्छ करण्यात आला. किल्ल्यावर वाढलेली गवतझुडपी, प्लास्टिक आणि अन्य कचरा संकलित करून ते योग्य प्रकारे टाकण्यात आले. तसेच, गडाच्या संरक्षक भिंती आणि पायऱ्यांची डागडुजी करण्यात आली. या मोहिमेत स्थानिक गडप्रेमींनीही मोठ्या संख्येने सहभाग घेतला. स्वयंसेवकांनी श्रमदान करत गडाच्या संवर्धनासाठी योगदान दिले. पर्यावरणपूरक पर्यटन वाढविण्यासाठी स्वच्छता आणि गड संवर्धन गरजेचे असल्याचे मत आयोजकांनी व्यक्त केले. या उपक्रमाचे संयोजन भाजप युवा मोर्चाचे पदाधिकारी आणि मावळा मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी केले. त्यांनी भविष्यातही अशा मोहिमा सातत्याने राबवण्याचा निर्धार व्यक्त केला. किल्ले दुर्ग संवर्धनासाठी प्रत्येक नागरिकाने पुढाकार घ्यावा आणि गडकोटांचे जतन करण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन उपस्थित छावा क्रांतीवीर सेना प्रणित मावळा मित्र मंडळ व भाजपा युवा मोर्चा गडकिल्ले संवर्धन व स्वच्छता मोहिम किल्ला रामशेजचे अमोल शिंदे, वैभव रन्हेर व तन्मय गांगुर्डे यांनी केले आहे. मोहिमेच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्व स्वयंसेवकांचे आणि सहभागी संस्थांचे अभिनंदन करण्यात आले.

## मुक्त विद्यापीठातर्फे स्व. यशवंतराव चव्हाण कर्मभूमी ते जन्मभूमी सायकल फेरीस प्रारंभ



**नाशिक ।** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे भारताचे माजी उपपंतप्रधान तथा महाराष्ट्राचे प्रथम मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांची कर्मभूमी नाशिक ते जन्मभूमी कराड (सातारा) पर्यंत सायकल फेरीस रविवारी (दि.९) प्रारंभ करण्यात आला.

स्व. यशवंतराव चव्हाण यांचा जन्मदिवस दि. १२ मार्च निमित्त काढण्यात आलेल्या या सायकल फेरीची सुरुवात मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे व प्रयागराज (उत्तर प्रदेश) येथील राजश्री टंडन मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. सत्यकाम यांनी हिरवा झेंडा दाखवल्यानंतर झाली.

स्व. चव्हाण यांच्या कार्य- विचारांचे स्मरण– जागरण करत, मार्गावरील जनतेत 'मधमाशी– झाड– हवा– पाणी– माती' वाचवण्याचा संदेश देत व शिक्षणाचा प्रचार– प्रसार करत ही सायकल फेरी निघाली आहे. तसेच सायकल चालवण्याचे आरोग्यदायी फायदे व त्यामुळे इंधन वाचवून हवेतील कार्बनडाय ऑक्साईडचे प्रमाण कमी करून प्रदूषण न करता निसर्गाचा समतोल कसा राखला जाईल याबद्दल विशेष जनजागृती केली जाणार आहे. या सायकल फेरीत विद्यापीठाचे कर्मचारी राजेश आहेर (व्यवस्थापक) ,प्रमोद जावळे, डॉ. श्याम पाटील, माधव पळशीकर, वाल्मिक सांगळे, किशोर शिरसाट, गिरीश गवळी, लक्ष्मण शेंडे, यशवंत दुसाने, शरद सोनवणे, प्रदीप गायकवाड, सुधाकर निंबाळकर, आनंद बर्वे, किशोर शिंदे सहभागी झाले आहेत. दि. ९ ते १२ मार्च पर्यंत चार दिवसांच्या कालावधीत मुक्त विद्यापीठ ते स्व. यशवंतराव चव्हाण यांचे समाधी स्थळ असलेल्या कृष्णा कोयना प्रीतीसंगम- पर्यंतचे साधारण ४०० किलोमीटरचे अंतर सहभागीं सायकलस्वारांकडून पार केले जाणार आहे.

दि. १२ मार्च रोजी सायकल फेरीच्या समारोपास स्व. यशवंतराव यांना प्रीतीसंगामच्या समाधीस्थळी विद्यापीठ व कर्मचारी यांच्यातर्फे श्रद्धांजली वाहण्यात येईल. सायकलफेरी शुभारंभ प्रसंगी विद्यापीठाचे वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, सिका संचालक डॉ. मधुकर शेवाळे, पुणे विभागीय केंद्र संचालक डॉ. व्ही. बी. गायकवाड, विद्यार्थी कल्याण व बहि:शाल केंद्र प्रमुख डॉ. दयाराम पवार आदींची प्रमुख उपस्थिती होती.

## 'शातिर THE BEGINNING' चित्रपटातून रेश्मा वायकरचे पदार्पण

**नाशिक ।** मराठी चित्रपटसृष्टीत सध्या महिला प्रधान चित्रपटाला चांगले दिवस आल्याचे दिसते. मात्र मराठीत महिला प्रधान सस्पेन्स थ्रिलर प्रकारातील चित्रपटांचा अभाव आहे. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून श्रीयांस आर्ट्स अँड मोशन पिक्चर्सच्या वतीने 'शातिर THE BEGINNING' या सस्पेन्स थ्रीलर चित्रपटाची घोषणा करण्यात आली असून या चित्रपटातून अभिनेत्री रेश्मा वायकर यांचे मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण होत आहे.




या चित्रपटाची कथा सुनील वायकर आणि हेमंत एदलाबादकर यांची आहे. तर पटकथा आणि दिग्दर्शन सुनील वायकर यांनी केले असून त्यांचा हा दिग्दर्शक म्हणून पहिलाच चित्रपट आहे. श्रीयांस आर्ट्स अँड मोशन पिक्चर्सच्या बॅनरखाली रेश्मा वायकर यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. चित्रपटाला सुप्रसिद्ध संगीतकार रोहित नागभिडे यांचे संगीत लाभले असून गीतकर वैभव देशमुख यांच्या गीतांना वैशाली सामंत, शाल्मली खोलगडे यांचा स्वरसाज आहे. पदार्पणातील भूमिकेबद्दल बोलताना रेश्मा वायकर म्हणाल्या, पहिला चित्रपट करताना काहीतरी हटके भूमिका असायला पाहिजे हे मी ठरवले होते. आज आपल्या समाजात अंमलीपदार्थ सहजतेने मिळत आहेत. ते घेणाऱ्या तरुणाईचे प्रमाण वाढत आहे. विद्येचे माहेरघर, सांस्कृतिक राजधानी असलेले पुणे शहर अशाच प्रकरणामुळे मधल्या काळात चर्चेत होते. या दुष्ट प्रवृत्ती विरुद्ध लढा देणाऱ्या महाविद्यालयीन तरुणाईची ही कथा आहे. ॲक्शन पॅक्ड अशा नायिका, एक सामाजिक संदेश देणारी व्यक्तिरेखा साकारणे माझ्यासाठी आव्हानात्मक होते. या चित्रपटात रेश्मा वायकर यांच्यासह मीर सरवर, योगेश सोमण, रमेश परदेशी, अनिल नगरकर, अभिमन्यू वायकर, वेद भालशंकर, श्रेया कुलकर्णी, गौरव रोकडे, निशांत सिंग, मनोज चौधरी महत्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहेत. येत्या ९ मे २०२५ रोजी 'शातिर THE BEGINNING' संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.

# तरुणांनी अभ्यासाबरोबरच व्यायामाकडेही लक्ष द्यावे : ना. महाजन





## पारंपरिक क्रीडा महाकुंभ स्पर्धेचे बक्षीस वितरण

**नाशिक ।** प्रत्येक खेळ आपल्यासाठी महत्वाचा आहे. खेळाच्या माध्यमातून शारीरिक क्षमतेचा कस लागतो. त्यातून व्यायाम होतो. त्यामुळे प्रत्येक तरुणाने व्यसनांपासून दूर राहत अभ्यासाबरोबरच व्यायाम करावा, असे आवाहन राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी येथे केले.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीण्यता विभाग, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांच्यावतीने श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक सोहळ्यास ३५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आणि पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्ताने औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्रशिक्षणार्थी यांच्यासाठी आयोजित पारंपरिक क्रीडा महाकुंभ स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा रविवारी (दि.९) सायंकाळी स्व. मीनाताई ठाकरे विभागीय क्रीडा संकुलात आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, आ. सीमा हिरे, अर्जुन पुरस्कार प्राप्त धावपटू कविता राऊत, विभागाच्या संचालक माधवी सरदेशमुख, सहसंचालक अनिल गावित, क्रीडा विभागाच्या उपसंचालक श्रीमती साळुंखे, क्रीडा भारतीचे अध्यक्ष संजय पाटील, क्रीडा प्रशिक्षक वीरेंद्र सिंह आदी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विजयी, उपविजयी संघाला बक्षीस वितरण करण्यात आले. महाजन पुढे म्हणाले की, शालेय आणि महाविद्यालयीन जीवनात कबड्डी, व्हॉलिबॉल आणि कुस्तीमध्ये पुणे विद्यापीठ आणि राज्य संघाचे प्रतिनिधित्व केले आहे. गेल्या काही वर्षांत पारंपरिक खेळ मागे पडले आहेत. या पार्श्वभूमीवर मंत्री लोढा यांनी पुढाकार घेत आयोजित केलेला पारंपरिक खेळांचा कुंभ उपक्रम कौतुकास्पद आणि अनुकरणीय आहे. विद्यार्थांनी व्यसनांपासून दूर राहत व्यायामाकडे लक्ष द्यावे. व्यायामाकडे कल वाढला की व्यसनापासून दूर रहाल, असेही त्यांनी सांगितले. ना. लोढा म्हणाले की, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागाने कमी कालावधीत स्पर्धेची केलेली तयारी कौतुकास्पद आहे. या स्पर्धेत सहभागी स्पर्धकांनी देशी खेळ खेळण्याचा आनंद घेतला. आगामी काळात हा क्रीडा कुंभ व्यापक स्तरावर घेण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. संचालक श्रीमती सरदेशमुख यांनी प्रास्ताविक केले. सहसंचालक गावित यांनी आभार मानले.

### सामंजस्य करार

ना. महाजन, ना. लोढा यांच्या उपस्थितीत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि एचएएल, नाशिक यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी एचएएलचे अधिकारी उपस्थित होते. या कराराच्या माध्यमातून नाशिक आणि छत्रपती संभाजी नगर विभागातील आठ संस्थांना 'एचएएल' ऑनलाईन ट्रेनिंगची सुविधा उपलब्ध करून देणार आहे.

महत्त्वाचे

## समतोल राखणारा अर्थसंकल्प



राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची राज्यात प्रभावी अमंलबजावणी आणि मुलींच्या व्यावसायिक शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची १०० टक्के प्रतिपूर्ती करण्यात येत आहे. मराठी भाषा संवर्धनासाठी 'मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर येथे उच्च दर्जाचे संशोधन केंद्र तसेच अनुवाद अकादमी स्थापन करण्यात येणार आहे. मान्यताप्राप्त उच्च आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणाऱ्या आणि ज्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थिनींना हा लाभ या वर्षीही मिळणार, ही आनंदाची बाब आहे. रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाकडून मायक्रोसॉफ्ट कंपनीमार्फत १० हजार महिलांना कौशल्य व कृत्रिम बुध्दिमत्ता या विषयाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. हीदेखील समाधानाची गोष्ट आहे. सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी नमामि गोदावरी विकास आराखडा आणि नाशिकच्या 'रामकाल पथ' प्रकल्पासाठी १४९ कोटी निधीची केलेली तरतूद आगामी कुंभमेळ्याच्या दृष्टीने सकारात्मक बाब आहे. देशातील रोजगाराच्या दृष्टीने महत्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या वाढवण बंदर प्रकल्पासाठी केलेली तरतूद आणि सन २०३० पर्यंत हा पूर्ण करण्याचे आश्वासन दिल्यामुळे विशेषत: नाशिकच्या विकासाला चालना मिळणार आहे. नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पाव्दारे नाशिक व जळगाव जिल्हयातील ४९ हजार ५१६ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ होणार आहे. दमणगंगा-एकदरे-गोदावरी या नदीजोड प्रकल्पामुळे ३.५५ टीएमसी पाणी उपलब्ध होणार असून, नाशिक जिल्ह्यातील २ हजार ९८७ हेक्टर क्षेत्रालाही यामुळे सिंचनाचा लाभ होईल. "गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार" ही योजना कायमस्वरुपी केल्याबद्दल सरकारचे अभिनंदन. कृषी क्षेत्रात 'एआय' वापराचे धोरण शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरू शकते. शेतमालाच्या वाहतुकीसाठी महत्वाच्या असलेल्या शेत व पाणंद रस्त्यांच्या बांधणीसाठी "बळीराजा शेत व पाणंद रस्ते" या नव्या योजनेचे, शेतकऱ्यांना मोफत देऊ केलेल्या ७.५ अश्वशक्ती विजेबाबतही स्वागत आहे. आग्र्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे तर संगमेश्वरात छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक, आंबेगावात शिवसृष्टी हे निर्णय शिवकालीन इतिहासाला उजाळा देणारे ठरणार आहेत. राज्यातील महामार्ग, बंदरे, विमानतळे, जलमार्ग, बस, रेल्वे आणि मेट्रो या सर्व दळणवळण क्षेत्रांसाठी पुरेशी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे.कायदेशीर खटले जलदगतीने निकाली काढण्यासाठी राज्यातील न्यायालयांच्या पायाभूत सुविधांचे बळकटीकरण, विधी व न्याय विभागासाठी ७५९ कोटी रुपयांचा निधी आणि राज्यात १८ नव्या न्यायालयांची स्थापना करण्याचा निर्णय न्यायदान प्रक्रियेतील कामकाजाला गती देणारा ठरेल.

**– ॲड. नितीन ठाकरे,**
**मविप्र सरचिटणीस, नाशिक**

## रामरायाच्या पाटोस्तव विधीने अमलकी एकादशी साजरी

**देवळाली कॅम्प ।** अमलकी एकादशीच्या दिवशी श्री रामरायाच्या पाटोस्तव विधीचा सोहळा भक्तिभावाने संपन्न झाला. या विशेष दिवशी रामरायाला तब्बल ३२ हात पांढऱ्या शुभ्र फेट्याचा परिधान करण्यात आला. हा विधी प्रतिष्ठामहोददी व



प्रतिष्ठामौक्तिकम् या प्राचीन ग्रंथांमध्ये उल्लेखित असून, वेदांतील अनुष्टुप छंदाशी त्याचा संबंध आहे. रामरायाला फेटा बांधण्यापूर्वी १६ पुरुषसुक्तांनी महापूजा पार पडली. प्रथम श्वेतवस्त्र झगा पोशाख, सीता देवीस साडी-चोळी नेसवण्यात आली आणि त्यानंतर विधीपूर्वक फेटा बांधण्यास सुरुवात झाली. हा संपूर्ण विधी सुमारे दोन तास चालला. हा सोहळा पुजारी घराण्याच्या २७ पिढ्यांच्या वारसांनी शतकानुशतके अखंडपणे सुरू ठेवला आहे. एरवी वर्षभर रामरायाला पितांबर नेसवले जात असले तरी, फाल्गुन महिन्यात उन्हाळ्याचा त्रास होऊ नये म्हणून श्वेत वस्त्र परिधान केले जाते. श्वेतवस्त्रातील रामरायाचे दर्शन मोठे पुण्यदायी मानले जाते. आचार्य महामंडलेश्वर श्रीमहंत सुधीरदास महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली महापूजा, महाअभिषेक व आरती संपन्न झाली. सचिन पुजारी, दीपक कुलकर्णी यांनी फेटा विधी पार पाडला. या वेळी देवेंद्र पुजारी, धनंजय पुजारी आणि प्रदीप वाघमारे उपस्थित होते.

**रंगपंचमीचा उत्सव उत्साहात**

रंगपंचमीच्या निमित्ताने केशर व पळसाच्या फुलांचा रंग उकळून रंग तयार करण्यात आला. हा रंग वासंतिक नवरात्र उत्सवासाठी वापरण्यात येणार आहे. यंदाच्या नवरात्रोत्सवाचे मानकरी हेमंतबुवा पुजारी यांच्या शुभहस्ते श्रींना श्रीखंडाचा नैवेद्य अर्पण करण्यात येईल. त्यानंतर श्वेत वस्त्रावर रंग व गुलाल अर्पण करून नाशिककरांचा रंगपंचमी रहाड उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार आहे.

# कांदा उत्पादक शेतकऱ्यांना किमान २२५० प्रति क्विंटल आधारभूत किंमत द्या : भुजबळ

## लासलगाव बाजार समितीत झालेल्या कांदा आंदोलनाबाबत वेधले सभागृहाचे लक्ष




**नाशिक ।** कांद्याचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्यात येईल, असे आश्वासन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे यांनी दिले. तर कांद्याच्या प्रश्नांवर कायमस्वरूपी मार्ग काढण्याच्या दृष्टीने राज्य सरकारच्या पातळीवर एक धोरण आखण्यात येईल. त्यासाठी लवकरच लोकप्रतिनिधी व कांदा उत्पादक शेतकरी प्रतिनिधी यांची बैठक घेऊन केंद्र सरकारकडे याबाबत पाठपुरावा करण्यात येईल, अशी माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

माजी उपमुख्यमंत्री या. छगन भुजबळ यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित करत कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न मांडले. यावेळी भुजबळ यांनी आक्रमक अशी भूमिका घेत कांद्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावावा अशी भूमिका घेतली. भुजबळ यांनी तारांकित प्रश्न उपस्थित करत कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न मांडले. यामध्ये त्यांनी म्हटले की, केंद्र सरकारने २० टक्के निर्यात शुल्क तातडीने हटविण्याची गरज आहे. तसेच सातत्याने उदभवणारा हा प्रश्न सोडविण्यासाठी यावर शाश्वत उपययोजना करण्याची गरज असल्याचे सांगत त्या दृष्टीने पुढील फॉर्मुला मांडला. यामध्ये कांदा उत्पादन खर्च १५०० रु. त्यावर नफा ७५० रु.अशी एकूण २२५० रु. प्रतिक्विंटल आधारभूत किंमत ठेवावी अशी मागणी त्यांनी केली. तसेच किमान ३ हजार रुपये भावापर्यंत कोणतेही निर्बंध लावू नयेत, ३ ते ४ हजारापर्यंत MEP लागू करावी, ४ ते ५ हजारांपर्यंत पर्यंत भाव गेल्यास निर्यात शुल्क लागू करावे, ५ ते ६ हजार भाव गेल्यास निर्यातबंदी लागू करावी. अशा प्रकारचा फॉर्मुला मांडत तो राज्य सरकारने केंद्र सरकारकडून मान्य करून घ्यावा, अशी मागणी मांडली. तसेच नाफेडसाठी देखील हीच किमान आधारभूत लागू करून नाफेडच्या कामातील अनागोंदी कमी करून सुधारणा करण्याची देखील मागणी केली. त्याचबरोबर लासलगाव येथे कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी लासलगाव मार्केट बंद करून केलेल्या आंदोलनाबाबत सभागृहाचे लक्ष वेधत हा प्रश्न अतिशय तातडीने सोडविण्यात यावा अशी आग्रही मागणी केली.

## राज्याच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा अर्थसंकल्प

विकसित भारत, विकसित महाराष्ट्र संकल्प करत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजितदादा पवार यांनी सादर केलेला अर्थसंकल्प राज्याच्या विकास चक्राला अधिक गती देत सर्वसमावेशक विकासाची पायाभरणी करणारा अर्थसंकल्प आहे. या अर्थसंकल्पात शेतकरी, महिला, युवक यासह समाजातील सर्व घटकांचा विचार केला असल्याने हा अर्थसंकल्प राज्याचा सर्वांगीण विकासाला चालना देणारा अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी दिली आहे. यांनी म्हटले आहे की, उद्योग, पायाभूत सुविधा, कृषि व संलग्न क्षेत्रे, सिंचन, सामाजिक व इतर क्षेत्राच्या विकासासाठी महत्वाच्या तरतुदी अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या



आहे. औद्योगिक विकासात राज्य सदैव अग्रेसर नुकत्याच दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये राज्य शासनाव्दारे एकूण ६३ कंपन्यांसोबत सामंजस्य करार करण्यात आले. राज्यातील शेती क्षेत्रासाठी भरीव अशी तरतूद करण्यात आली आहे. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचा दुसरा टप्पा २१ जिल्ह्यांतील ७ हजार २०१ गावांमध्ये राबविण्यात येणार आहे. कृषी क्षेत्रामध्ये कृत्रिम बुध्दिमत्ता व अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराचे धोरण आखण्यात येत आहे. शेतकऱ्यांना पीक नियोजनाचा सल्ला देणे, उत्पादन खर्च कमी करणे, उत्पादकता वाढविणे, दर्जेदार शेतमालाचे उत्पादन तसेच शेतमालाला हक्काची व शाश्वत बाजारपेठ मिळवून देणे यासाठी शासकीय, निमशासकीय व खाजगी क्षेत्रात उपयुक्त असलेल्या प्रणाली शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'कृत्रिम बुध्दिमत्ता' तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. येत्या दोन वर्षात त्यासाठी ५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. नाशिक जिल्ह्याच्या बाबतीत भुजबळ म्हणाले की, राज्यातील अपूर्ण सिंचन प्रकल्पांची कामे पूर्ण करण्यासोबतच नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पाद्वारे नाशिक व जळगाव जिल्ह्यातील ४९ हजार ५१६ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ होणार आहे. या प्रकल्पाची अंदाजित किंमत ७ हजार ५०० कोटी रुपये आहे. दमणगंगा एकदरे गोदावरी या नदीजोड प्रकल्पामुळे ३.५५ टीएमसी पाणी उपलब्ध होणार असून त्यामुळे जायकवाडी धरणाच्या लाभक्षेत्रातील १ हजार ७६६ हेक्टर क्षेत्र पुनर्स्थापित होईल. नाशिक जिल्ह्यातील २ हजार १८७ हेक्टर क्षेत्रालाही यामुळे सिंचनाचा लाभ होईल. या प्रकल्पाची अंदाजित किंमत २ हजार ३०० कोटी रुपये आहे. कोकणातील उल्हास आणि वैतरणा नद्यांच्या खोयातून ५४.७० टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याचा प्रकल्प हाती घेण्यात येणार आहे. यातून मराठवाड्यातील सुमारे २ लाख ४० हजार हेक्टर क्षेत्राच्या सिंचनासाठी पाणी उपलब्ध होईल. या प्रकल्पाचे सर्वेक्षण व अन्वेषणाचे काम सुरू आहे.ब यातून नाशिकसह मराठवाड्याचा पाणी प्रश्न मिटणार आहे. ते म्हणाले की, नाशिकमध्ये आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या दृष्टीने "नमामि गोदावरी" अभियानाचा आराखडा तयार करण्यात येत आहे. कुंभमेळ्याच्या सुव्यवस्थित आयोजनासाठी विशेष प्राधिकरणाची स्थापना करुन त्यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. तसेच नाशिक येथे रामकाल पथविकास प्रकल्पांतर्गत रामकुंड, काळाराम मंदिर आणि गोदातट परिसराचा पर्यटनाच्यादृष्टीने विकास करण्यासाठी १४६ कोटी १० लाख रुपये किंमतीची कामे हाती घेण्यात येत आहेत. त्यामुळे नाशिकच्या विकासाला अधिक चालना मिळणार आहे.

**– आ. छगन भुजबळ, माजी उपमुख्यमंत्री**

# महाराष्ट्रातील सर्व विभागांच्या विकासाचे समतोल अंदाजपत्रक : ना. कोकाटे

**नाशिक ।** शेतकरी, कष्टकरी, महिला, विद्यार्थी, युवक, मागासवर्गीय, आदिवासी, अल्पसंख्याक, उद्योजक, व्यापारी, व्यावसायिक अशा सर्व घटकांना न्याय व विकासाची संधी देणारा हा अर्थसंकल्प आहे. राज्यातील विदर्भ, मराठवाडा, खान्देश अशा विकसनशील विभागांच्या विकासाचा समतोल विचार व प्रत्येक घटकाला विकासाची संधी देणारा हा अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिली.

या अर्थसंकल्पाबाबत आपले मत व्यक्त करताना श्री. कोकाटे म्हणाले की, राज्याच्या अर्थसंकल्पातून राज्याच्या शाश्वत व सर्वसमावेशक विकासाची पायाभरणी करण्यासाठी अर्थमंत्री म्हणून अजितदादा पवार यशस्वी ठरले. कारण त्या दृष्टिकोनातून अंदाजपत्रकात तरतूद करण्यात आली आहे. या अर्थसंकल्पात शेतकरी, महिला, युवकांसह अनेक घटकांचा सर्वांगीण विचार केला आहे. कृषिसह संलग्न क्षेत्रे, सिंचन क्षेत्राच्या विकासासाठी अनेक तरतुदी अर्थसंकल्पात करण्यात आल्या. यामुळे राज्याच्या विकासाला मोठी गती



मिळणार आहे. राज्यातील शेती क्षेत्रासाठी भरीव अशी तरतूद करून अजितदादांनी शेतकरी सक्षम कसा होईल, याकडे कटाक्षाने लक्ष दिले आहे. कृषि क्षेत्रामध्ये कृत्रिम बुध्दिमत्ता व अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराचे धोरण आखण्यात आले. शेतकऱ्यांना पीक नियोजनाचा सल्ला देणे, उत्पादन खर्च कमी करणे, उत्पादकता वाढविणे, दर्जेदार शेतमालाचे उत्पादन तसेच शेतमालाला हक्काची व शाश्वत बाजारपेठ मिळवून देण्यासाठी विशेष तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. नाशिकमध्ये आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या दृष्टीने "नमामि गोदावरी" अभियानाचा आराखडा तयार करण्यात येत आहे. कुंभमेळ्याच्या सुव्यवस्थित आयोजनासाठी विशेष प्राधिकरणाची स्थापना करुन त्यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेद्वारे शेतकऱ्यांना मोफत वीज उपलब्ध करून देण्यात येत आहे. ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रे उभारण्यात येणार आहेत. ज्या तालुक्यांमध्ये बाजार समिती अस्तित्वात नाही, तेथे किमान एक स्वतंत्र बाजार समिती स्थापन करण्याचे ठरविण्यात आले आहे. हा निर्णय क्रांतिकारी ठरणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. शेतकऱ्यांना बी बियाणे, यंत्रसामुग्री, खते आणि शेतमालाच्या वाहतूकीसाठी महत्वाच्या असलेल्या शेत व पाणंद रस्त्यांच्या बांधणीसाठी "बळीराजा शेत व पाणंद रस्ते" ही नवी योजना सुरू करण्यात येणार असल्याने शेतकऱ्यांना अधिक फायदा होणार आहे.

पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी गोदावरी खोऱ्यामध्ये वळविण्यात येणार आहे. यातून नाशिकसह मराठवाड्याचा पाणी प्रश्न मिटणार आहे. नाशिक येथे रामकाल पथविकास प्रकल्पांतर्गत रामकुंड, काळाराम मंदिर आणि गोदातट परिसराचा पर्यटनाच्यादृष्टीने विकास करण्यासाठी १४६ कोटी १० लाख रुपये किंमतीची कामे हाती घेण्यात येत आहेत. त्यामुळे नाशिकच्या विकासाला अधिक चालना मिळणार असल्याचेही कोकाटे यांनी सांगितले.

## इंडियन आयडॉल पंधरामध्ये हेमा मालिनी

**नाशिक ।** सोनी एंटरटेनमेंट टेलिव्हिजनवरील इंडियन आयडॉल १५ एक धमाकेदार होळी स्पेशल एपिसोड घेऊन येत आहे. ज्यात दिग्गज अभिनेत्री हेमा मालिनी स्पेशल जज म्हणून उपस्थित राहतील. या विशेष पाहुण्यांसह उत्सवात जज श्रेया घोषाल, विशाल दादलानी, बादशाह, सूत्रसंचालक अभिजीत सावंत आणि मियांग चांग यांचाही समावेश आहे. संगीत, नॉस्टॅल्जिया आणि अविस्मरणीय क्षणांचे आनंददायी मिश्रण या भागात असेल.

या एपिसोडमध्ये आयडॉल की बसंती उर्फ रितिका, 'मेरे नसीब मे' या गाण्याचे हृदयद्रावक सादरीकरण करेल. हे गाणे एपिसोडचे प्रमुख लक्षवेधी ठरेल. तिची नाट्यमय अभिव्यक्ती आणि गाण्याने अनेकजण प्रभावित होतात. या सादरणीकरणाद्वारे एक नॉस्टॅल्जिक प्रवास सुरु होतो. कारण यानिमित्ताने बादशाह हेमा मालिनी यांना स्टार-स्टड चित्रपट नसीब मध्ये भूमिका करण्याच्या अनुभवाविषयी



प्रश्न विचारतो. हेमा मालिनी यांनी मल्टी स्टार कास्टिंग असलेल्या या चित्रपटात सहभागी होण्यासाठी सुरुवातीला संकोचले होते हे मान्य केले. त्या म्हणाल्या, 'त्यांनी माझ्यासाठी मल्टी स्टार कास्टचा चित्रपट साइन केला तेव्हा मी घाबरले. हा सिनेमा एका वर्षात पूर्ण करण्याचे टार्गेट होते. पण सगळेच कलाकार बिझी होते. अमितजी, ऋषी कपूर, रीना रॉय, अमजद खान, शत्रुघ्न सिन्हा अगदी सहकलाकारसुद्धा बिझी होते. सगळ्यांनी एकत्र येऊन चित्रीकरण करणे खूप कठीण होते. त्याचवेळी इतर अनेक चित्रपटांचे शूटिंग सुरु होते. त्यासाठी आम्हाला खूप प्रवासही करावा लागत होता. पण आम्ही खूप चांगल्या पद्धतीने काम केले. या इव्हिनिंग नॉस्टॅल्जियात भर टाकताना मियांग चांग याने फरदीन खानने हेमामालिनी आणि फिरोज खान यांच्याबद्दल पूर्वी शेअर केलेली एक हृदयस्पर्शी गोष्ट शेअर केली. या प्रसंगाबद्दल सांगण्यास उद्युक्त केले. फिरोज खान खूप भावनिक चित्रपट निर्माते होते. गाण्याच्या शेवटच्या सीनच्या वेळी मागील बाजूला लोक हसत होते. त्यामुळे त्यांना राग आला आणि रागाने काहीतरी लाथाडले. त्यांना नंतर कळले की तो माझा मेकअप बॉक्स होता. त्यानंतर दोन दिवस पिन-ड्रॉप सायलेन्स होता. कारण सगळेच घाबरले होते. ते माझे आहे, हे समजल्यानंतर त्यांनी माफी मागितली. होळीच्या रंगांची उधळण असलेला इंडियन आयडॉल १५ एपिसोड ही एक अविस्मरणीय मेजवानी आहे.

# सिडकोत उद्या भव्य युवा रोजगार मेळावा

## गरजूंनी ऑनलाईन अर्ज करण्याचे आ.हिरेचे आवाहन



**सिडको ।** बेरोजगारांना रोजगार मिळावा यासाठी आमदार सीमाताई हिरे यांच्या संकल्पनेतून बुधवारी (ता.१२) भव्य युवा रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. तरूणांचे सिलेक्शन करून त्यांना नोकरी उपलब्ध करून देण्यासाठी ३५ नामवंत कंपन्यांच्या प्रतिनिधीचा सहभाग असणार आहे. उत्तमनगर परिसरातील भोळे मंगल कार्यालयात मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून गरजूंनी लवकरात लवकर ऑनलाईन नाव नोंदणी करण्याचे आवाहन आमदार हिरेंनी केले आहे.

अंबड आणि सातपूर अशा दोन औद्योगिक वसाहती सिडको परिसराच्या जवळ असूनही बेरोजगारांची संख्या मोठी आहे. कंपन्यामध्ये नोकरीच्या जागा आहे परंतू वेळेत माहिती न मिळाल्याने अनेकांवर नोकरीची संधी गमवण्याची वेळ येत आहे. यातूनच सिडको, सातपूर परिसरातील बेरोजगार यातूनच आमदार हिरेंनी महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता विभागाच्या सयुक्त विद्यमाने मेळाव्याचे आयोजन केले आहे. मेळाव्यात स्वंयरोजगार आणि शासनाच्या कर्ज योजनांची माहिती विविध महामंडळांचे प्रतिनिधींकडून देण्यात येणार आहे.

सदर मेळाव्याच्या माध्यमातून बॅक ऑफिस, सुपरवायझर, हेल्पर, डिलिव्हरी बॉय, मशिन ऑपरेटर, प्रोडक्शन सुपरवायजर, ट्रेनी, बॅकिंग, अकाऊंटंट, डाटा एन्ट्री, ज्युनियर इंजिनियर, असेंम्बली ऑपरेटर, सिक्युरिटी, फॅसिलिटी मॅनेजमेंट सेल्स मार्केटिंग, नर्सिंग, हाऊसकिपींग, कॉल सेंटर, लॉजिस्टिक्स आदी प्रकारच्या नोकऱ्या बेरोजगारांना उपलब्ध होणार आहे.

अर्जदारांसाठी पाचवी ते पदवीधर तसेच आयटीआय, डिप्लोमा अशी शिक्षणाची अट असणार असून अधिक माहितीसाठी ९२८९३०७३२७ या नंबर संपर्क साधावा. तसेच गरजूंनी लवकरात लवकरात लवकर ऑनलाईन नावनोंदणी करावी असे आवाहन आ.हिरे आणि रश्मीताई हिरे यांनी केले आहे. मेळाव्याच्या नियोजनाची जबाबदारी डिस्टील एम्प्लॉयमेंट सर्व्हिसेसचे विनेश मोरे आणि त्यांच्या टिमवर आहे.

# कौशल्य विकासाचे प्रशिक्षण मिळाले १७० विद्यार्थ्यांना!

**नाशिक ।** भारतातील नामांकित कंपनी इन्फोसिस आणि सेंटम फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित उपक्रमाद्वारे मविप्रच्या केटीएचएम महाविद्यालयातील १७० विद्यार्थ्यांना १५ दिवसांचे कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षण पूर्ण झाल्याबद्दल केटीएचएम महाविद्यालयात आयोजित दीक्षांत समारंभाप्रसंगी सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.



अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. एस. काळे तर प्रमुख पाहुणे म्हणून सेंटम फाउंडेशनचे प्रकल्प व्यवस्थापक ग्यानेंद्रकुमार मिश्रा, स्वमन स्किलच्या संचालक डॉ. स्वाती डुंबरे उपस्थित होते. प्रशिक्षण कालावधीत विद्यार्थ्यांना विविध विषयांचे ज्ञान देण्यात आले. त्यात संप्रेषण कौशल्ये, नियोजन करून निर्णय घेणे, मुलाखत कौशल्य, संप्रेषण प्रभाव, ई-मेल लेखन, समस्या सोडवणे आणि निर्णय घेणे, व्यवस्थापन पध्दती आदींचा समावेश होता. ग्यानेंद्रकुमार मिश्रा यांनी इन्फोसिस कंपनी आणि सेंटम फाउंडेशन यांची विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी असलेली भूमिका मांडली. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. एस. एस. काळे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास आणि भविष्यासाठी महाविद्यालय सतत प्रयत्नशील असते. प्रशिक्षणासारखे विविध उपक्रम अत्यंत महत्त्वाचे असून, यातून विद्यार्थ्यांना भविष्य घडवण्यासाठी दिशा मिळते. कुमारी तपस्वी पाटोळे आणि कल्पेश महाले या विद्यार्थ्यांनी प्रशिक्षणातून मिळालेले ज्ञान आणि भविष्याच्या संधी मनोगतात सांगितल्या. याप्रसंगी शिक्षणाधिकारी डॉ. नितीन जाधव, डॉ. भास्कर ढोके, डॉ. शशिकांत मोगल, प्राचार्या डॉ. प्रतिमा वाघ आदी उपस्थित होते. ज्योती जोशी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. दिगंबर उफाडे यांनी आभार मानले. संस्थेने व महाविद्यालयाने या प्रशिक्षणासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल ज्योती सूर्यवंशी यांनीही आभार व्यक्त केले. डॉ. जयश्री जाधव यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. दीपक डेर्ले, डॉ. सुचेता बर्वे, प्रा. सचिन बंडगर, प्रा. कैलास अहिरे इत्यादींचे सहकार्य लाभले.

# देवाभाऊंचा बडगा...!

ज्याप्रकारे (अमानुष मारहाणीचे) फोटो आले आहेत, ज्या प्रकारे (संतोष देशमुखांची) ही हत्या झाली आहे, या हत्येमागे ज्याला (वाल्मीक कराड) मास्टरमाईंड ठरविण्यात आले आहे, तो मंत्र्यांच्या इतका जवळचा आहे, तर मग त्या मंत्र्याने नैतिकतेच्या आधारावर राजीनामा द्यायला हवा... मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कठोर भूमिकेमुळेच धनंजय मुंडे यांना मंत्रीपदाचा अखेर राजीनामा देणे भाग पडले.

संतोष देशमुख हत्याप्रकरणी तपासासाठी सीआयडी नेमल्यावर सरकारने त्यांना पूर्ण मोकळीक दिली होती. न्यायालयात आरोपपत्र दाखल होईपर्यंत त्यात काय आहे हे मुख्यमंत्र्यांनाही ठाऊक नव्हते. फॉरेन्सिक लॅबमधून आरोपींच्या मोबाईलमधून डिलीट केलेली माहिती तपास यंत्रणांनी शोधून काढली. संतोष देशमुख यांच्या अमानुष मारहाणीचे जे फोटो समाज माध्यमातून व्हायरल झालेत तेसुद्धा पोलिसांनीच अथक प्रयत्नांनी शोधून काढले... स्वतः मुख्यमंत्र्यांनीच एका मुलाखतीत हे सांगितले.

तीन महिन्यांपूर्वी म्हणजेच दि. ९ डिसेंबरला बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख याची अत्यंत क्रूर पद्धतीने हत्या झाली, तेव्हापासून धनंजय मुंडे व त्यांचे जिल्ह्यातील सहकारी संशयाच्या भोवऱ्यात सापडले. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य सूत्रधार वाल्मीक कराड हा सुद्धा फार उशिरा पोलिसांच्या हाती मिळाला.

कृष्णा अंधळे तर तीन महिने झाले तरी अजून फरारीच आहे. तो जिवंत तरी आहे का, अशीही शंका व्यक्त केली जात आहे. संतोष देशमुख हा गावातील लोकप्रिय सरपंच होता. दोन कोटींच्या खंडणी वसूल करण्याच्या कामात त्याचा अडथळा होत होता म्हणून वाल्मीक व त्याच्या टोळीने त्याचे अपहरण करून, त्याला निर्वस्त्र करून त्याचे हाल हाल करून ठार मारले. खंडणी वसूल करताना यापुढे कोणी आपल्याला आडवे जाण्याचे धाडस करू नये या हेतूने दहशत निर्माण करण्यासाठी संतोषची निर्घृण हत्या करण्यात आली.

वाल्मीक हा या टोळीचा आका म्हणून ओळखला जात होता, तर या आकाचा आका म्हणून सरकारमध्ये मंत्री असलेल्या धनंजय मुंडेंकडे बोट दाखवले गेले. संतोषच्या मारेकऱ्यांचे आश्रयदाते मंत्रिमंडळात बसले आहेत, असे उघड आरोप होत होते तरीही तब्बल ८० दिवस स्वतः मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि धनंजय मुंडेही कशाची वाट पाहत होते?

गेले तीन महिने भाजपाचे आमदार सुरेश धस, संदीप क्षीरसागर, प्रकाश सोळंके, नमीता मुंदडा, करुणा मुंडे, सुप्रिया सुळे, अंजली दमानीया, मनोज जरांगे असे अनेक दिग्गज संतोष देशमुखांच्या हत्येवरून माध्यमातून तोफा डागत होते. बीडमधील भयावह दहशतवादाच्या कहाण्या रोज प्रसिद्ध होत होत्या. बीड हत्या प्रकरणात जनमताचा आणि राजकीय दबाव रोज वाढत होता.

पोलिसांच्या बदल्या झाल्या, नवे पोलीस प्रमुख आले, सीआयडी व एसआयटी नेमली गेली. माध्यमांचा व लोकप्रतिनिधींचा रोख आकाचा आका म्हणजे धनंजय यांच्यावर होता, पण मुंडे राजीनामा देत नव्हते. त्यांचे बॉस उपमुख्यमंत्री अजितदादा पवार त्यांच्याकडे राजीनामा मागत नव्हते आणि स्वतः देवेंद्र फडणवीस हे अजितदादा काय करणार याची वाट पाहत होते.

**स्टेटलाईन**
**डॉ. सुकृत खांडेकर**
sukritforyou@gmail.com

फडणवीस म्हणत होते, अजितदादा जी भूमिका घेतील ती मान्य आहे, मुंडे म्हणत होते - मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री सांगतील ते मला मान्य आहे आणि अजितदादा म्हणत होते - हत्या प्रकरणात मुंडेंचा संबंध आहे असे कोणतेही पुरावे पुढे आलेले नाहीत... जर पुरावे नाहीत, न्यायालयात दाखल केलेल्या आरोपपत्रातही त्यांचे नाव नाही मग मुख्यमंत्र्यांनी त्यांना राजीनामा द्यायला का सांगितले? अति तिथे माती असा प्रकार मुंडे यांच्याबाबतीत घडला असेच म्हणावे लागेल.

मुंडे हे मंत्रीपदाचा राजीनामा देण्यासाठी संतोष देशमुखच्या अमानुष हत्येचे फोटो व्हायरल होण्याची वाट पाहत होते का? मुंडे यांना अजितदादांची सावली असे म्हटले जाते, या सावलीला वाचविण्यासाठी शेवटपर्यंत आटापिटा चालू होता, असेच चित्र महाराष्ट्राला दिसले. दि. ९ डिसेंबरला सरपंचाची हत्या झाली आणि ४ मार्चला मुंडे यांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला. हा वेळकाढूपणा होता की त्यांना वाचविण्याचा प्रयत्न झाला?

महायुतीच्या सरकारमधील एका कॅबिनेट मंत्र्याला चार महिन्यांत राजीनामा देण्याची पाळी येते हे मुख्यमंत्र्यांनाही वेदनादायी नाही का? न्यायालयात आरोपपत्र दाखल झाल्यावर मुंडे यांना सरकारमधील कोणीही वाचवू शकले नाही. गुन्हेगारांचा आश्रयदाता अशी त्यांची प्रतिमा तयार झाली. तुम्ही राजीनामा देणार नसाल, तर मला राज्यपालांना पत्र पाठवून तुम्हाला मंत्रिमंडळातून काढून टाकण्याची कारवाई करावी लागेल, असा सज्जड इशारा देण्याची पाळी मुख्यमंत्र्यांवर का आली?

संतोष देशमुख याच्या हत्येनंतर जसे वातावरण तापू लागले तसे मुंडे व त्यांच्या टोळीचे का?ळे कारनामे उघडकीस येऊ लागले. मित्रपक्षांना बरोबर घेऊन सरकार चालवणे कसे अडचणीचे आहे, याचा अनुभव देवेंद्र फडणवीसांना येऊ लागला.

विधानसभेत सरकारला प्रचंड बहुमत आहे. २८८ पैकी २३५ आमदार महायुतीचे आहेत. भाजपाचे १३७ आमदार निवडून आले आहेत. पण काही मंत्र्यांच्या पराक्रमांमुळे सरकारची सतत बदनामी होते आहे, या सर्वांना सांभाळून, समतोल राखत आणि विरोधी पक्षांना अंगावर घेत देवेंद्र फडणवीस महायुती सरकारचा गाडा रेटत आहेत.

भाजपाचे दिवंगत नेते व ज्यांनी पक्षाची पाळेमुळे राज्यात रोवली ते गोपीनाथ मुंडे यांनी राजकारणातील गुन्हेगारीच्या विरोधात सातत्याने आवाज उठवला व त्यांच्या पुतण्याला याच आरोपाखाली मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला यापेक्षा दुर्दैव काय असू शकते? आपले चुलते गोपीनाथ मुंडे यांचे बोट धरून धनंजय यांनी राजकारणात प्रवेश केला. भाजपा युवा मोर्चाचे अध्यक्ष झाले.

गोपीनाथ मुंडे लोकसभेवर निवडून गेल्यावर त्यांच्या मतदारसंघातून त्यांनी पंकजाला भाजपाची उमेदवारी दिली तेव्हापासून धनंजय काकांवर नाराज झाले. पंकजा दोन वेळा परळीतून आमदार झाल्या. गोपीनाथ मुंडेंची राजकीय वारस म्हणून पंकजा पुढे आल्यावर धनंजय यांनी २०१४ मध्ये थेट राष्ट्रवादी काँग्रेसचा रस्ता धरला. २०१९ मध्ये त्यांनी पंकजा यांचा पराभव केला व राष्ट्रवादीचे आमदार म्हणून विधानसभेत पोहोचले.

महाआघाडी सरकारमध्ये सामाजिक न्यायमंत्री झाले तेव्हापासून त्यांचे बीडमधील साम्राज्य वाढू लागले. जुलै २०२३ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये झालेल्या बंडखोरीत ते अजितदादांबरोबर गेले आणि महायुती सरकारमध्ये कृषिमंत्री झाले.

२०२४ मध्ये पंकजा यांनी भाजपाच्या उमेदवार म्हणून लोकसभा निवडणूक लढवली पण पंकजा यांचा पराभव झाला. पंकजा विधान परिषदेवर आमदार झाल्या. धनंजय परळीतून २०२४ मध्ये विधानसभा निवडणुकीत पुन्हा आमदार झाले व फडणवीस यांच्या सरकारमध्ये अन्न नागरीपुरवठा मंत्री झाले.

धनंजय हे जबर महत्त्वाकांक्षी आहेत. अजितदादांचे विश्वासू आहेत. देवेंद्र-अजितदादा यांच्या गाजलेल्या पहाटेच्या शपथविधीच्या वेळी ते दादांबरोबर होते. बीड जिल्ह्यावर एकहाती वर्चस्व निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. वाल्मीकच्या माध्यमातून त्यांनी जिल्ह्यात दरारा निर्माण केला. दहशतीच्या जोरावर वाल्मीक आपले साम्राज्य विस्तारत होता. पालकमंत्री म्हणून धनंजय यांची कवच कुंडले वाल्मीकवर होती. वाल्मीकसमोर जिल्ह्यातील पोलीस-प्रशासन वाकत होते. जे आड येतील त्यांना कायमचा धडा शिकवला जात होता, त्यातूनच संतोष देशमुखची निर्घृण हत्या झाली.

कोणत्याही जिल्ह्यातील पोलीस - प्रशासन हे पालकमंत्री किंवा स्थानिक आमदाराच्या विरोधात कधी जात नाहीत. त्याचा पुरेपूर लाभ धनंजय यांच्या सहकाऱ्यांनी उठवला. गेले तीन महिने धनंजय यांच्या विरोधात राज्यभर प्रक्षोभ प्रकट होत असताना पंकजा स्वतः शांत होत्या. मात्र धनंजय यांनी राजीनामा दिल्यावर, देर आए, दुरुस्त आए, असे त्या म्हणाल्या.

पंकजा यांनी बीडमधील एका कार्यक्रमात म्हटले होते - धनंजय यांचे पान ज्याच्याशिवाय हलत नाही, तो म्हणजे वाल्मीक कराड. त्यावर गर्दीतून टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला होता. मग बीडमधील आकाला अटक झाल्यावरच मोठ्या आकाने लगेचच मंत्रीपदाचा राजीनामा द्यायला हवा होता. संतोष हा मराठा, तर धनंजय हे वंजारी. मराठा विरुद्ध ओबीसी असाही संघर्ष पेटविण्याचा काहींनी प्रयत्न केला पण सत्तेच्या जोरावर दहशत आणि दहशतीच्या जोरावर सत्ता प्राप्त करणाऱ्यांना देवाभाऊंचा बडगा महागात पडला.

मुंडे यांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिल्यावर त्यांना कोणाचीही सहानुभूती मिळाली नाही. त्यांच्या समर्थनार्थ बीडमधेही कोणीही रस्त्यावर उतरले नाहीत. धनंजय मुंडे व नैतिकता यांचा संबंध काय, असा प्रश्न तर विचारला गेलाच, पण त्यांचे बॉस अजितदादाही त्यांना वाचवू शकले नाहीत.

■ ■ ■

# नापासांची दोन महिन्यात पुनर्परीक्षा!

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद पाचवी आणि आठवीच्या वर्गांसाठी वार्षिक परीक्षा, पुनर्परीक्षा व मूल्यमापन यांची कार्यपद्धती निश्चित करत आहे. पाचवी आणि आठवी हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील महत्त्वाचे टप्पे आहेत. त्यामुळे त्या टप्प्यापर्यंत त्यांना शिकवलेल्या गोष्टी व्यवस्थित समजल्या आहेत की नाही, याची पडताळणी होण्याच्या दृष्टीने परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तशी पूर्वीचीच सर्व वर्गात परीक्षा ही पद्धत योग्य होती. गुणवंत विद्यार्थी बरोबर गाळून पुढील उच्च शिक्षणासाठी पाठवली जात होती. पुन्हा जुने तेच सोने हे सत्य शासनाच्या प्रत्ययास येत आहे.

----------

राज्यात नवे शैक्षणिक धोरण लागू करायचे असेल, तर गुणवत्तेच्या दृष्टीने पहिलीपासून आठवीपर्यंत नापास करायचे नाही, हे परवडणारे नाही, हे लक्षात आल्यावर शालेय शिक्षण विभाग यावर्षीपासून पाचवी आणि आठवीच्या वर्गांच्या वार्षिक परीक्षा घेणार आहे. पाचवी आणि आठवी या टप्प्यांवर प्रत्येक विद्यार्थ्याच्या गुणवत्तेची परीक्षा होणार आहे. राज्य शिक्षण मंडळाच्या अनुदानित आणि विनाअनुदानित सर्व शाळांना हा नियम लागू असेल.

शिक्षण विभाग बिनकामाचे नियम निर्गमित करून विद्यार्थी, पालक व शिक्षक यांचे माथे भडकून घेते, त्यातून काही एक साध्य होत नाही. हा नेहमीचाच उपद्रव झाला आहे; ज्याला विभाग नवीन प्रयोग असे गोजिरवाणे संबोधन लावत असतो. बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायद्यानुसार विद्यार्थ्यांना आठवीपर्यंत अनुत्तीर्ण करता येत नव्हते. मात्र, विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण मूल्यमापन करण्याची सक्ती या कायद्यात होती. त्याकडे दुर्लक्ष झाल्याने विद्यार्थी बहुतांश विषयात कच्चा राहू लागले. त्यांची गुणवत्ता थेट नववीच्या वार्षिक परीक्षेत मोजली जाऊ लागल्याने विद्यार्थी परीक्षेत अपयशी ठरत होते. आता नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू करावे लागणार आहे. यात गुणवत्तेला अधिक प्राधान्य आहे. म्हणून शालेय शिक्षणात दोन टप्प्यांवर विद्यार्थ्यांची गुणवत्ता जोखण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे.

त्यासाठी महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ मध्ये राज्य सरकारने सुधारणा केली आहे, असे दिसते. ते सूर्यप्रकाशात स्पष्टपणे पुढे दिसणारच आहे. सुधारित नियमांनुसार इयत्ता पाचवीच्या वर्गापर्यंत बालकाला वयानुरूप वर्गामध्ये प्रवेश देण्यात येईल. इयत्ता सहावी ते आठवीच्या वर्गात वयानुरूप प्रवेश देताना बालकास पाचवीच्या वर्गासाठीची वार्षिक परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील.

बालक ही परीक्षा उत्तीर्ण नसल्यास त्याला पाचवीच्या वर्गात प्रवेश देण्यात येईल. यामुळे आता शाळेतील प्रवेशाच्या एक टप्प्यावर म्हणजे पाचवीला परीक्षा देत त्याची गुणवत्ता सिद्ध करावी लागणार आहे. त्यामुळे शिक्षक आणि पालक या दोघांचीही शैक्षणिक जबाबदारी वाढणार आहे. नेहमीप्रमाणे डोकेदुखी पाठ सोडणारच कशी? यासंबंधी अधिसूचना जारी करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांनी पुढील वर्गात जाण्यासाठी गुणवत्ता सिद्ध करता यावी म्हणून प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या शेवटी पाचवी आणि आठवीच्या वर्गासाठी वार्षिक परीक्षा घेतली जाणार आहे. विद्यार्थी वार्षिक परीक्षा उत्तीर्ण होऊ शकला नाही, तर अशा बालकाला संबंधित विषयासाठी शाळेला अतिरिक्त पूरक मार्गदर्शन द्यावे लागेल आणि वार्षिक परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यापासून दोन महिन्यांच्या आत त्याची पुनर्परीक्षा घ्यावी लागेल.

विद्यार्थी पुनर्परीक्षेत नापास झाले, तर त्यांना पाचवी किंवा आठवीच्या वर्गात, जसे असेल तसे ठेवले जाईल. मात्र, प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही बालकाला शाळेतून काढून टाकले जाणार नाही, असाही दिलासा दिला जात आहे. पहिलीपासून परीक्षाच नाही, असा समज झाला होता. परंतु प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांचे सर्वंकष मूल्यमापन झाले पाहिजे. त्यामुळे पाचवी आणि आठवीला वार्षिक परीक्षा सुरू होणार असेल, तर त्याचे स्वागत आहे.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद पाचवी आणि आठवीच्या वर्गांसाठी वार्षिक परीक्षा, पुनर्परीक्षा व मूल्यमापन यांची कार्यपद्धती निश्चित करत आहे. पाचवी आणि आठवी हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील महत्त्वाचे टप्पे आहेत. त्यामुळे त्या टप्प्यापर्यंत त्यांना शिकवलेल्या गोष्टी व्यवस्थित समजल्या आहेत की नाही, याची पडताळणी होण्याच्या दृष्टीने परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

पाचवी ते आठवीच्या परीक्षांत नापासही केले जाणार, अशी नुसतीच भिती दाखविली जात आहे, मात्र प्रत्यक्षात तो पहिल्याच प्रयत्नात पास होईल, यासाठी शाळा प्रयत्नशील असेल, हे निश्चित! पाचवीला ५० गुणांची, तर आठवीला ६० गुणांची वार्षिक परीक्षा घेतली जाईल, असे म्हटले जाते. राज्याच्या रिकामटेकड्या शालेय शिक्षण विभागाने आठवीपर्यंत सर्वच विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश देण्याच्या धोरणात बदल केला आहे.

यंदापासून पाचवीच्या विद्यार्थ्यांची ५० गुणांची, तर आठवीच्या विद्यार्थ्यांची ६० गुणांची वार्षिक परीक्षा घेतली जाणार आहे. या परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना आता पुन्हा त्याच वर्गात बसावे लागणार आहे. राज्य सरकारने या परीक्षांची आणि त्यांच्या मूल्यमापनाची कार्यपद्धती जाहीर केली आहे.

आगाऊ प्रयोगशील महाराष्ट्र राज्यात २०१०-११ पासून पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी सर्वंकष मूल्यमापन कार्यपद्धती लागू करण्यात आली. त्यानुसार मूल्यमापनामध्ये ड श्रेणी मिळालेल्या अथवा अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण न करता त्यांनाही पुढील वर्गात प्रवेश दिला जात होता. मात्र त्यातून विद्यार्थ्यांचे अभ्यासाकडे दुर्लक्ष होत होते. तसेच विद्यार्थ्यांना वयानुरूप प्रवेश द्यायचा असल्याने त्यांना मागील वर्गातील अध्ययन कौशल्य अपेक्षित प्रमाणात मिळाली नसली तरी त्यांना पुढील वर्गात प्रवेश द्यावा लागत होता. त्यातून मुलांच्या पुढील अध्ययनात अडथळा येत असे.

या पार्श्वभूमीवर आता इयत्ता पाचवी आणि आठवीसाठी परीक्षा घेण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. पाचवीच्या विद्यार्थ्यांची १० गुणांची तोंडी आणि ४० गुणांची लेखी परीक्षा घेतली जाणार आहे. तर आठवीच्या विद्यार्थ्यांची १० गुणांची तोंडी आणि ५० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे. या परीक्षा दुसऱ्या सत्राच्या अभ्यासक्रमावर आधारित असतील. परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांना ३५ टक्के गुण मिळवावे लागतील.

नव्या बदलामुळे विद्यार्थ्यांनी इयत्ता पाचवी आणि आठवीसाठी किमान अपेक्षित अध्ययन कौशल्य प्राप्त केले की नाही, याची खात्री करता येईल. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना नियमित अभ्यासाची सवय लावण्यासह पुढील शैक्षणिक आव्हाने आणि स्पर्धा परीक्षांना सामोरे जाण्यासाठी तयार करण्याचा उद्देश असल्याचे सरकारकडून नव्या निर्णयाचे समर्थन करताना सांगण्यात आले आहे, बघुया, किती प्रभाव दिसतो ते!

राज्य सरकारने या परीक्षांचे सनियंत्रण आणि पर्यवेक्षण करण्यासाठी राज्य, जिल्हा, तालुका, केंद्र स्तरावर सनियंत्रण समित्या स्थापन करण्याचाही निर्णय घेतला आहे. या परीक्षा शाळास्तरावर घेतल्या जाणार आहेत. मात्र परीक्षांवेळी केंद्रस्तरीय भरारी पथके तयार करून शाळांना भेटी दिल्या जाणार आहेत.

त्यानुसार या परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पडत असल्याची काळजी घेतली जाणार आहे. सहावी ते आठवी इयत्तेच्या वर्गात विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यापूर्वी त्यांना पाचवीची परीक्षा उत्तीर्ण करावी लागणार आहे. या परीक्षेत अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची पुनर्परीक्षा घेतली जाणार आहे. यावर प्रतिक्रिया व्यक्त करतांना म्हणावेसे वाटते, की एक ना धड; भाराभर चिंध्या!

-------------

**संकलन व सुलेखन**
**कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे**
**गडचिरोली.**
**९४२३७१४८८३**

■ ■ ■

# चॅम्पियन्स ऑफ चॅम्पियन!

९ मार्च २०२५ ही तारीख भारतीय क्रिकेटच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदली गेली आहे कारण या दिवशी मिनी वर्ल्डकप म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने न्युझीलंड संघावर चार गडी राखून विजय मिळवत चॅम्पियन्स ट्रॉफीवर तिसऱ्यांदा भारताचे नाव कोरून इतिहास घडवला.

यावेळची चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा पाकिस्तान आणि दुबई या देशात खेळली गेली. या चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत सुरुवातीपासूनच भारत विजेतेपदाचा प्रबळ दावेदार होता. काहीही करून यावेळी संघाला चॅम्पियन करायचेच अशी खूणगाठ कर्णधार रोहित शर्मा आणि प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी बांधली होती.

विश्व कसोटी चॅम्पियन स्पर्धेत भारतीय संघाला अंतिम फेरीत पोहाचवण्यास आलेले अपयश आणि ऑस्ट्रेलिया विरुद्ध झालेल्या कसोटी मालिकेतील पराभव विसरून त्यांनी नव्याने सुरुवात केली. चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत कोणते खेळाडू हवेत याचा पक्का विचार रोहित शर्माच्या मनात होता. त्याने निवड समितीकडून त्याला हवे ते खेळाडू घेतले.

दुबईतील खेळपट्टी फिरकीला अनुकूल असल्याने त्याने पाच फिरकी गोलंदाजांना संघात घेतले त्यातील रवींद्र जडेजा, कुलदीप यादव, अक्षर पटेल आणि वरुण चक्रवर्ती या चार फिरकी गोलंदाजांना त्याने अंतिम अकरा मध्ये खेळवले आणि चारही फिरकी गोलंदाजांनी त्यांच्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरवत अप्रतिम कामगिरी केली. या चौघांना जगातील सर्वोत्तम वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी, हार्दिक पांड्या आणि हर्षित राणा यांनी सुरेख साथ दिली. भारताची गोलंदाजी या स्पर्धेतील सर्वोत्तम गोलंदाजी ठरली. ज्या ज्या वेळी सामना भारताच्या हातातून निसटला असे वाटत होते त्या त्या वेळी गोलंदाजांनी संघाला विजय मिळवून दिला.

अंतिम फेरीतही भारताच्या सर्व गोलंदाजांनी अप्रतिम कामगिरी केली. रवींद्र जडेजा, कुलदीप यादव, अक्षर पटेल आणि वरुण चक्रवर्ती चारही फिरकी गोलंदाजांनी भेदक गोलंदाजी करून न्यूझीलंडच्या फलंदाजांना जेरीस आणले. भारताने न्युझीलंड संघाला अवघ्या २५१ धावात रोखले.

न्युझीलंड संघाने डावाची सुरुवात तर धमाकेदार केली पण रचीन रवींद्र आणि केन विल्यम्सन हे त्यांचे भरावशाचे फलंदाज बाद झाल्यावर भारताच्या फिरकी गोलंदाजांनी फास आवळला आणि न्यूझीलंडच्या फलंदाजांना वेसण घातली त्याचा परिणाम असा झाला की त्रिशतकी मजल मारणारा न्युझीलंडचा संघ २५१ धावाच करू शकला.

न्युझीलंड संघाला २५१ धावांवर रोखून भारताने अर्धी लढाई जिंकली. केवळ गोलंदाजांनीच नव्हे तर फलंदाजांनीही छान कामगिरी केली. भारताचा कर्णधार रोहित शर्मा याने ७४ धावांची धडाकेबाज खेळी केली. त्याने आणि शुभमन गीलने शतकी सलामी देऊन विजयाचा पाया रचला.

रोहित शर्मा हाच अंतिम सामन्याचा मानकरी ठरला. विराट कोहली स्वस्तात बाद झाला तरी श्रेयस अय्यर, अक्षर पटेल आणि हार्दिक पांड्या यांनी भारताला विजयी केले. अंतिम सामन्यातच नव्हे तर संपूर्ण स्पर्धेत भारताच्या गोलंदाज आणि फलंदाजांनी अप्रतिम कामगिरी केली.

या स्पर्धेत भारताचे क्षेत्ररक्षणही अप्रतिम होते. एकूणच गोलंदाजी, फलंदाजी आणि क्षेत्ररक्षण अशा तिन्ही आघाड्यांवर भारताने अप्रतिम कामगिरी करीत हे विजेतेपद मिळवले. रोहित शर्माने संघाचे कर्णधारपद अतिशय कुशलतेने सांभाळले. या विजतेपदात जितका खेळाडूंचा वाटा आहे तितकाच सपोर्ट स्टाफचाही आहे. प्रशिक्षक गौतम गंभीर आणि त्यांच्या टीमने पडद्यामागे मोठी कामगिरी बजावली त्यामुळेच भारत पुन्हा एकदा आयसीसीच्या स्पर्धेत विजेता बनला.

भारतीय संघाचे हे विजेतेपद खास आहे कारण भारतीय संघाचे हे तिसरे चॅम्पियन्स ट्रॉफीचे विजेतेपद आहे. २००२ साली भारताने श्रीलंके सोबत संयुक्त विजेतेपद मिळवले होते. तेंव्हा भारताचा कर्णधार सौरभ गांगुली हा होता . त्यानंतर २०१३ साली महेंद्रसिंग धोनी कर्णधार असताना भारताने इंग्लंडला हरवून दुसऱ्यांदा चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली होती त्यानंतर बारा वर्षानंतर भारतीय संघाने या स्पर्धेचे विजेतेपद मिळवले आहे. तीनदा चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकणारा भारत हा पहिला देश आहे. त्यामुळेच भारतासाठी हे विजेतेपद ऐतिहासिक आहे.

तीनदा चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकून भारताने आम्हीच चॅम्पियन ऑफ चॅम्पियन्स आहोत हे जगाला दाखवून दिले. हे विजेतेपद मिळवून भारतीय संघाने क्रिकेट विश्वावर आपली हुकूमत पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. कारण आयसीसीच्या सलग तीन स्पर्धेत भारताने अंतिम फेरी गाठली त्यात भारताला दोनदा विजेतेपद मिळवण्यात यश मिळाले. फक्त एकदाच भारताला अंतिम फेरीत पराभव स्वीकारावा लागला तो २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलिया कडून.

मात्र त्यानंतर मागील वर्षी टी २० विश्वचषक स्पर्धेत भारताने दक्षिण आफ्रिकेला हरवून विश्व विजेतेपद मिळवले होते आणि आता चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेचे विजेतेपद मिळवून भारताने क्रिकेट विश्वातील आपली मक्तेदारी सिद्ध करून आपणच क्रिकेट मधील सर्वोत्तम संघ आहोत हे जगाला दाखवून दिले आहे. तिसऱ्यांदा चॅम्पियन्स ट्रॉफीचे विजेतेपद मिळवणाऱ्या चॅम्पियन्स भारतीय संघाचे हार्दिक अभिनंदन!



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

■ ■ ■

## महासागर वृत्तपत्राद्वारे मिळाली वाडीची माहिती

पंधराशेची वाडी दिड लाख झाली... हा लेख दैनिक महासागर वृत्तपत्रात शुक्रवार ७ मार्च व शनिवार ८ मार्च रोजी प्रकाशीत झाला. मी ३५ वर्षापासून वाडीत राहत आहे. परंतु आजपर्यंत वाडीचा इतिहास माहीत नव्हता. तो संपूर्ण इतिहास महासागरद्वारा पूर्ण माहीत झाला. दीड लाख लोकसंख्येच्या वाढत्या शहरातील समस्या, अपूर्ण कामे आणि सुविधांचा अभाव या प्रश्नांना अरुण कराळे या एकमेव धाडसी पत्रकारांनी हात घालून समाजापुढे मांडले, हे अभिनंदनीय आहे.



जिथे स्थानिक नेते आणि इतर पत्रकार दुर्लक्ष करतात, तिथे आपण निर्भीडपणे हा मुद्दा उचलला. आपल्या या कार्याचे मी मनापासून अभिनंदन करतो आणि हा उपक्रम सतत चालू राहील, तसेच आपल्या लेखणीतून स्थानिक नागरिक जागृत होतील, इतर पत्रकार, वार्ताहर यांना प्रेरणा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करतो. आपल्या पुढील वाटचालीस शुभेच्छा आणि महासागरचे अभिनंदन!

■ **चंद्रशेखर देशभ्रतार, वाडी, नागपूर .**

## तर समजून जा किडनी खराब झाली



बदललेली जीवनशैली, खानापिण्याच्या चुकीच्या सवई आणि टेन्शन यामुळे अनेकांना बीपी आणि डायबिटीजचा आजार असतो, सध्या आणखी एक आजार वेगानं वाढतो आहे तो म्हणजे किडनीशी संबंधित समस्या. तुमच्या किडनीमध्ये जर काही समस्या असेल तर ती लवकर तुमच्या लक्षात येत नाही, मात्र त्यानंतर ती गंभीर स्वरूप धारण करू शकतो. त्यामुळे किडनीच्या आजारांकडे विशेष लक्ष देणं गरजेचं असतं.

किडनी हा तुमच्या शरिराचा सर्वात महत्त्वाचा अवयव असतो, ज्याच्यामाध्यमातून शरीरातील घाण बाहेर टाकण्याचं आणि रक्त शुद्ध करण्याचं काम केलं जातं. मात्र जर तुमच्या किडनीमध्ये काही प्रॉब्लेम झाला तर तुमच्या शरीराच्या विशिष्ठ भागांमध्ये तीव्र वेदना होतात. जर किडनीमध्ये काही समस्या असेल तर तुमचं शरीर त्याबद्दल काही संकेत देते.

किडनीवर सूज आल्यास कमरेच्या जवळ वेदना होतात. किडनी जास्तच खराब असेल तर तुम्हाला शरीराच्या इतरही भागात वेदना होऊ शकतात. पोटामध्ये तीव्र वेदना होतात. जर तुमचं पोट खूप जास्त दुखत असेल तर त्याकडे चुकूनही दुर्लक्ष करू नका, ते तुमच्या किडनी फेल्यूअरचं देखील लक्षण असू शकतं.

मूतखड्याचा त्रास असेल तर चुकूनही त्याकडे दुर्लक्ष करू नका, यामुळे तुम्हाला भविष्यात किडनीसंबंधी काही समस्या निर्माण होऊ शकतात. किडनीमध्ये काही तरी समस्या निर्माण झाल्याचं लक्षण असू शकतं. त्यामुळे अशा स्थितीमध्ये वेळीच डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

■ ■ ■

**वाचक लिहितात**

## अग्निहोत्राचे महत्त्व!

दरवर्षी १२ मार्चला विश्व अग्निहोत्र दिवस साजरा केला जातो. त्यानिमित्ताने अग्निहोत्र करण्याचे महत्त्व आणि लाभ थोडक्यात जाणून घेऊ या.

सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या वेळी अग्नीमध्ये आहुती अर्पण करून केली जाणारी सूर्योपासना म्हणजे अग्निहोत्र! ही उपासना करण्यासाठी वेळ सोडली, तर अन्य कशाचेच बंधन नाही.

अग्निहोत्रासाठी पिरॅमिडच्या आकाराच्या पात्रात गायीच्या शेणाच्या गोवऱ्या, दोन चिमूट अखंड तांदूळ आणि देशी गाईचे तूप यांच्या सहाय्याने अग्नी प्रज्वलित करतात. त्यानंतर मंत्र म्हणून आहुती दिली जाते. अग्निहोत्रातून निर्माण होणारा अग्नी हा वायुमंडलात दीर्घकाळ राहतो आणि त्यामुळे आपल्या भोवती दहा फूट अंतरापर्यंत संरक्षक कवच निर्माण होते.

अग्निहोत्रामुळे वनस्पतींना वातावरणातून पोषण द्रव्य मिळतात. भस्माचा वापर शेतीत केल्याने अधिक सकस आणि स्वादिष्ट अन्नधान्य, फळे,फुले आणि भाजीपाला पिकतो. अग्निहोत्र दररोज केल्याने मुलांच्या मनावर उत्तम परिणाम होऊन त्यांच्यावर चांगले संस्कार होतात. चिडचिडी, हट्टी मुले शांत आणि समंजस होतात. मुलांना एकाग्रतेने अभ्यास करण्यात मदत मिळते.

अग्निहोत्राचे असे अनेक लाभ आहेत. आज आपले जीवन अतिशय धावपळीचे आणि तणावग्रस्त झाले आहे.अशा परिस्थितीत मानव जातीच्या कल्याणासाठी ऋषीमुनींनी अग्निहोत्राचा मार्ग उपलब्ध करून दिला आहे. आपण श्रद्धापूर्वक तो अवलंबल्यास निश्चितच लाभ होईल!

■ **डॉ. सौ. स्वाती देशमुख**
**नागपूर.**

# 'होळी' सणाचे पावित्र्य राखा!

दुष्प्रवृत्ती आणि अयोग्य विचार यांची होळी करून सत्प्रवृत्ती जोपासण्याचा संकल्प करण्याचा सण म्हणजे होळी. भारतात स्थानपरत्वे हा सण साजरा करण्याच्या पद्धतीही भिन्न भिन्न असल्याच्या पाहायला मिळतात. होळी साजरी करण्यामागील कथाही राज्यानुसार आणि चालीरीतीनुसार वेगवेगळ्या सांगितल्या जातात.

काही प्रदेशात होळीला अधिक महत्व दिले जाते, तर काही ठिकाणी होळीनंतर येणाऱ्या रंगपंचमीला. गेल्या काही वर्षांत शहरासारख्या ठिकाणी होळी सणामध्ये गैरप्रकारांचा मोठ्या प्रमाणात शिरकाव झालेला पाहायला मिळतो ज्यामुळे या सणाचे पावित्र्य कुठेतरी कमी होऊ लागले आहे. होळीचे निमित्त करून आठवडाभर आधीपासूनच इमारतींच्या गच्चीवरुन, रेल्वे गाड्या, बसेसवर पाण्याने भरलेले फुगे, प्लास्टिक पिशव्या फेकून मारल्या जातात. यांमध्ये शालेय आणि महाविद्यालयीन मुलींसह नोकरी व्यवसायानिमित्त घराबाहेर पडणाऱ्या तरुणींना लक्ष्य केले जाते.

नुकत्याच पार पडलेल्या जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने समस्त युवावर्गाने आपल्या सोशल मीडिया अकाउंटवर महिलांच्या सन्मानार्थ स्टेटस आणि पोस्ट लावल्या होत्या तोच युवावर्ग आज होळीचे निमित्त साधून महिलांवर पाण्याने भरलेल्या प्लॅस्टिकच्या पिशव्या फेकताना दिसत आहे.

आज आपण येणाऱ्या जाणाऱ्या महिलांवर ज्याप्रमाणे पाण्याच्या पिशव्या फेकून मारत आहोत, कुठेतरी आपल्या आईला, बहिणीला आणि प्रियजनांनाही अशा प्रकारच्या त्रासाचा सामना करावा लागत असेल याचा विचार ही मंडळी केव्हा करणार? दरवर्षी केवळ पाण्याने भरलेले फुगे आणि पिशव्या मारण्यामुळे कितीतरी अपघात घडतात, कितीतरी जणांना आपले डोळे गमवावे लागतात, तर कित्येकांना कायमस्वरूपी अपंगत्व येते. मागील ५-६ वर्षांपासून होळीच्या निमित्ताने फुग्यांना पर्याय म्हणून पातळ प्लास्टिक पिशव्या विक्रीसाठी बाजारात येऊ लागल्या आहेत. धूलिवंदनाच्या दिवशी दुपारीच या प्लास्टिक पिशव्यांचा खच रस्त्यावर साचलेला पाहायला मिळतो. हवेसोबत उडत जाऊन या पिशव्या नाल्यांत आणि गटारांत साचतात. २६ जुलै २००५ या दिवशी मुंबईत महाप्रलय आला होता ज्याला मुख्यत्वे कारणीभूत प्लास्टिक पिशव्याच होत्या.

वर्षभर प्लास्टिक निर्मूलनासाठी प्रयत्न करणारे पालिका प्रशासन होळीच्या दिवसांत मोठ्या प्रमाणात वितरित होणाऱ्या प्लास्टिक पिशव्यांवर कायदेशीर कारवाई करताना कुठे दिसत नाही. होळीच्या ठिकाणी बोंब मारण्याची प्रथा पूर्वापार चालत आली आहे; मात्र हल्ली या प्रथेच्या आड कुणाचे तरी नाव घेऊन घाणेरड्या शिव्या घातल्या जातात. धुलीवंदनाच्या दिवशी एकमेकांना रासायनिक रंग फासले जातात ज्यामुळे बऱ्याचदा गंभीर स्वरूपाचे त्वचाविकार होतात. नासकी अंडी फेकून मारली जातात, मद्यपान करून रस्त्यांवर धिंगाणा घातला जातो, महिलांना पाहून अश्लील शेरेबाजी केली जाते. लोकांना आणि गाड्या अडवून जबरदस्तीने पैसे उकळले जातात.

या अपप्रकारांना रोखण्यासाठी दरवर्षी पोलिसांना शासनाकडून आदेश द्यावे लागतात, याची खरे तर आपल्याला लाज वाटायला हवी. हिंदू धर्मातील प्रत्येक सण आणि उत्सव यामागे लोककल्याणाचा आणि सामाजिक एकोप्याचा उदात्त हेतू दडलेला आहे.

होळीसारख्या पवित्र सणामध्ये शिरलेल्या गैरप्रकारामुळे या दिवसांत अनेक जण घराबाहेर पडणे टाळू लागले आहेत. सणांमागील शास्त्र लक्षात घेऊन ते साजरे केल्यास मनुष्याला त्यातून आनंद मिळतो: मात्र होळीसारख्या पवित्र सणाला आलेले ओंगळवाणे स्वरूप पाहता आपणच आपल्या धर्माची अवहेलना करत आहोत हे हिंदू केव्हा जाणणार आहेत ?



**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई.**
**९६६४५५९७८०**

■ ■ ■

**अशोकायन**
**प्रा. अशोक सारडा मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



## भक्ती ?

**देव देवळात**
**चित्त खेटरात**
**मन गुंतलय**
**समधं संसारात ...**

**गळ्यात माळा**
**पोटात काळा**
**सांगा कसा पावेल**
**विठू सावळा ?..**

**करावी निष्काम भक्ती**
**स्मरावा श्रीपती**
**नश्वर संसार**
**धरु नये आसक्ती ..**

# टोयोटा हिलक्स ब्लॅक एडिशन मजबूत, स्टायलिश आणि प्रीमियम एसयूव्हीचा अनुभव देण्यासाठी सज्ज

**बंगळुरू, १० मार्च** टोयोटा किर्लोस्कर मोटर अर्थात टीकेएमने आज भारतात नवीन हिलक्स ब्लॅक एडिशन सादर केली आहे. हे वाहन अशा ग्राहकांसाठी खास बनवले गेले आहे, जे शहरातील दैनंदिन प्रवास आणि कठीण रस्त्यांवर ऑफ-रोडिंग साहसासाठी एक विश्वासार्ह आणि दमदार वाहन शोधत आहेत. हिलक्स ब्लॅक एडिशन त्याच्या ऑल-ब्लॅक थीममुळे अधिक आक्रमक आणि स्टायलिश दिसते, पण त्याच वेळी त्याची ताकद, मजबूत बांधणी आणि उच्च कार्यक्षमताही कायम ठेवते.

हिलक्स ब्लॅक एडिशनमध्ये २,८ लिटरचे चार-सिलेंडरटर्बो-डिझेल इंजिन देण्यात आले आहे, जे ६-स्पीड ऑटोमॅटिक ट्रान्समिशन सह येते आणि ५०० एनएम टॉर्क निर्माण करते. त्याच्या ४४ बैठक व्यवस्थेमुळे कठीण रस्त्यांवरही सहज प्रवास करता येतो. या वाहनात टोयोटाच्या प्रगत अभियांत्रिकी आणि सुरक्षितता वैशिष्ट्यांचा समावेश करण्यात आला आहे. याची ७०० एमएम पाण्यातून सहज वाटचाल करण्याची क्षमता, मजबूत चेसिस आणि आयएमव्ही प्लॅटफॉर्ममुळे हे वाहन कोणत्याही परिस्थितीत उत्कृष्ट कामगिरी करू शकते.




हिलक्स ब्लॅक एडिशनचे बाह्य स्वरूप पूर्णपणे ब्लॅक थीममध्ये डिझाइन करण्यात आले आहे, जे त्याला अधिक दमदार आणि आकर्षक लुक देते. ब्लॅक फ्रंट रेडिएटर ग्रिल, मजबूत बोनट लाइन आणि १८-इंचब्लॅक अलॉय व्हील्स या डिझाइनला अधिक स्टायलिश बनवतात. तसेच ब्लॅक आऊटसाईड रिअर व्यू मिरर कव्हर्स, डोअर हँडल्स, फेंडर गार्निश आणि फ्युएल लिड गार्निश यामुळे वाहनाला एकसंध आणि आक्रमक लुक मिळतो. फ्रंट अंडर रन मुळे याला अधिक स्पोर्टी लुक मिळतो. तसेच, शार्प स्वीप्ट-बॅक एलईडी हेडलाइट्स आणि एलईडी रिअर कॉम्बिनेशन लॅम्प्स यामुळे हे वाहन रात्री अधिक आकर्षक दिसते.

सुरक्षिततेच्या दृष्टीने, हिलक्स ब्लॅक एडिशनमध्ये ७ एसआरएस एअरबॅग्स, व्हेईकल स्टॅबिलिटी कंट्रोल, ट्रॅक्शन कंट्रोल आणि इलेक्ट्रॉनिक डिफरेंशियल लॉक यासारखी अत्याधुनिक वैशिष्ट्ये देण्यात आली आहेत. याशिवाय, हिल असिस्ट कंट्रोल आणि डाऊनहिल असिस्ट कंट्रोल यामुळे चढ-उता असलेल्या रस्त्यांवरही हे वाहन अधिक सुरक्षित राहते. फ्रंट पार्किंग सेन्सर्स अरुंद जागांमध्ये गाडी पार्क करताना अधिक सोयीस्कर ठरतात.

या वाहनाचे इंटिरियर आधुनिक, आलिशान आणि ड्रायव्हर-केंद्रित आहे. हिलक्स ब्लॅक एडिशनमध्ये प्रीमियम लेदर अपहोल्स्ट्री आहे, जी प्रवास अधिक आरामदायी बनवते. तसेच, ड्युअल-झोन फुली ऑटोमॅटिक क्लायमेट कंट्रोल प्रवाशांना हवामान आपल्या सोयीनुसार सेट करण्याची सुविधा देते. या वाहनात ८-इंच इन्फोटेन्मेंट टचस्क्रीन देण्यात आली आहे, जी अँड्रॉइड ऑटो आणि ॲपल कारप्लेला सपोर्ट करते. अधिक आरामदायी अनुभवासाठी ८-वे पॉवर्ड ड्रायव्हर सीट, स्वयंचलित डिमिंग फंक्शनसह इलेक्ट्रोक्रोमिक इनसाईड रिअर व्यू मिरर आणि रिव्हर्स पार्किंग कॅमेरा यांचा समावेश करण्यात आला आहे.

# अभिनेत्रींनी सांगितले होळी स्किनकेअर सिक्रेट्स!



**मुंबई, १० मार्च:** रंगांचा सण होळी आनंद, साजरीकरणाचा क्षण आहे, जो रंगाची उधळण करत संपूर्ण शहरामध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण करतो. या सणादरम्यान गोड आठवणी निर्माण होत असल्या तरी रंगांमुळे त्वचा कोरडी होऊ शकते, जळजळ होऊ शकते आणि त्वचेवर रंगांचे डाग राहू शकतात. नेहमी प्रकाशझोतात असलेल्या अभिनेत्रींसाठी स्किनकेअर फक्त रूटिन नसून गरज आहे. होळीपूर्वी संरक्षणात्मक उपायांपासून सण साजरा केल्यानंतर रिकव्हरीपर्यंत एण्ड टीव्हीवरील स्टार अभिनेत्री होळीचा आनंद घेतल्यानंतर देखील त्वचा चमकदार व आरोग्यदायी ठेवण्यासाठी त्यांच्या पसंतीच्या स्किनकेअर टिप्सबाबत सांगत आहेत. या अभिनेत्री आहेत गीतांजली मिश्रा (राजेश, 'हप्पू की उलटन पलटन') आणि शुभांगी अत्रे (अंगूरी भाबी, 'भाबीजी घर पर है'). मालिका 'हप्पू की उलटन पलटन' मधील गीतांजली मिश्रा ऊर्फ राजेश म्हणाल्या, ''होळी माझा आवडता सण आहे. मला हा सण घेऊन येणारी ऊर्जा, रंगांची उधळण आणि उत्साह आवडतो, पण मी माझ्या स्किनकेअरबाबत कधीच तडजोड करत नाही. होळी खेळायला जाण्यापूर्वी मी माझी त्वचा आणि केसांवर खोबरेल किंवा बदामाचे तेल लावते, यामुळे रंगांपासून त्यांचे संरक्षण होण्यासोबत सहजपणे रंग धुता येतात. सूर्यप्रकाश कमी-जास्त होत असला तरी सनस्क्रिनकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. मी नुकसान कमी करण्यासाठी सेंद्रिय रंगांचा वापर करते. होळी खेळून झाल्यानंतर मी माझी त्वचा सौम्यपणे स्वच्छ करते, ॲलो वेरा जेलचा वापर करते आणि शरीराला आतून व बाहेरून हायड्रेट करते. साधाहळदी व मधाचाफेस फॅक त्वचेची चमक पुन्हा आणण्यासाठी माझे सिक्रेट शस्त्र आहे. या लहान उपायांसह मी सणानंतर त्वचेवर होणाऱ्या परिणामांबाबत चिंता न करता होळीचा पुरेपूर आनंद घेते.''

पहा मालिका 'हप्पू की उलटन पलटन' रात्री १० वाजता आणि 'भाबीजी घर पर है' रात्री १०.३० वाजता दर सोमवार ते शुक्रवार फक्त एण्ड टीव्हीवर!

# मालिका हप्पू की उलटन पलटन'ने हास्य व वारसाची सहा वर्षे साजरी केली!



**मुंबई, १० मार्च:** एण्ड टीव्हीवरील लोकप्रिय विनोदी मालिका हप्पू की उलटन पलटन' अविश्वसनीय टप्प्यावर पोहोचली आहे, जेथे मालिकेने हसवून-हसवून लोटपोट करणारे विनोद आणि संस्मरणीय पात्रांसह प्रेक्षकांचे मनोरंजन करण्याची सहा भव्य वर्षे पूर्ण केली आहेत. प्रतिभावान जोडी संजय व बिनायफर कोहली निर्मित मालिका २०१९ मध्ये सुरू झाली आणि तेव्हापासून घराघरांमध्ये लोकप्रिय ठरली आहे. ही मालिका कॉमेडी आणि कौटुंबिक ड्रामाचे सुरेख संयोजनसादर करते. दरोगा हप्पू सिंग, त्याची प्रबळ इच्छाशक्ती असलेली पत्नी व त्यांच्या खोडकर मुलांच्या विलक्षण कृत्यांच्या अवतीभोवती फिरणारी ही मालिका देशभरातील चाहत्यांना हास्य व आनंद देत आहे. या उल्लेखनीय क्षणाला साजरे करण्यासाठी सर्व कलाकार व टीम सेटवर भव्य सेलिब्रेशनकरिता एकत्र आले. माझ्या टीमसोबत हा टप्पा साजरा करताना मला खूप अभिमान वाटत आहे. मी पुढील अनेक वर्षे धमाल, हास्याचा आनंद देण्यासोबत नवनवीन गोष्टी शिकण्यासाठी उत्सुक आहे.''

हिमानी शिवपुरी (कटोरी अम्मा) आपल्या भूमिकेच्या प्रभावाबाबत सांगताना म्हणाल्या, कटोरी अम्मा माझ्यासाठी भूमिकेपेक्षा अधिक आहे. ती भावना आहे. ''निर्माता बिनायफर कोली आभार व्यक्त करत म्हणाल्या,''मालिका हप्पू की उलटन पलटन'ची सहा वर्षे पूर्ण करण्याचा क्षण माझ्यासाठी भावनिक व अभिमानास्पद आहे. आमचे अद्भुत कलाकार, समर्पित टीम व प्रेमळ प्रेक्षकांशिवाय हा प्रवास शक्य झाला नसता. त्यांचा अविरत पाठिंबा प्रेक्षकांना आनंदित करणारे मनोरंजन देत राहण्यास आम्हाला प्रेरित करतो. पुढे अनेक वर्षे हास्य व आनंदाचेमनोरंजन मिळणार आहे.''

पहा मालिका हप्पू की उलटन पलटन' दर सोमवार ते शुक्रवार रात्री १० वाजता फक्त एण्ड टीव्हीवर!

# 'राईड टू सेफ्टी' रॅलीचे आयोजन



नागपूर, ६ मार्च २०२५: नागपूर शहरातील लकडगंज येथील अनाथ विद्यालय परिसरातील विनायकराव देशमुख हायस्कूल आणि सायन्स ज्युनियर कॉलेज मध्ये वाहतूक नियमांबाबत जनजागृती उपक्रम म्हणून 'राइड टू सेफ्टी' रॅलीचे आयोजन आज करण्यात आले. या कार्यक्रमात, प्रमुख पाहुण्या म्हणून, नागपूरच्या वाहतूक शाखेच्या सहाय्यक पोलिस आयुक्त श्रीमती माधुरी बाविस्कर यांनी रॅलीला हिरवा झेंडा दाखवला. या उपक्रमाचा उद्देश दुचाकीस्वार आणि मागे बसणाऱ्या व्यक्तिला रस्ता सुरक्षा नियमांबद्दल जागरूक करणे हा होता.

जवळपासच्या शाळांमधून आलेल्या त्यांच्या पालकांसह ५०० हून अधिक मुले रॅलीत सहभागी झाली होती. त्यांना आयएसआय चिन्हांकित हेल्मेट देण्यात आले आणि रस्ता सुरक्षेच्या मूलभूत नियमांचे पालन न करणे तसेच हेल्मेट न वापरणे अश्या धोक्यांबद्दल जागरूक करण्यात आले. आयसीआयसीआय लोम्बार्डने सीएसआर अंतर्गत हा उपक्रम हाती घेतला आहे. कंपनीने आतापर्यंत ४.४७ लाखांहून अधिक आयएसआय चिन्हांकित हेल्मेट वितरित केले आहेत आणि या आर्थिक वर्षात संपूर्ण भारतात .५ लाखांहून अधिक हेल्मेट वितरित करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

# आयसीआयसीआय प्रु गिफ्ट सिलेक्ट

## सद्यस्थितीत शेयर बाजारात सुरु असलेल्या चढ-उतारांवर मात करत निश्चित उत्पन्न देणारा नवीन प्लॅन

**अमरावती, १० मार्च :** आयसीआयसीआय प्रुडेंशियल लाइफ इन्शुरन्स ने आयसीआयसीआय प्रु गिफ्ट सिलेक्ट हा नवा दीर्घकालीन बचत प्लॅन सादर केला आहे, जो ग्राहकांना निश्चित उत्पन्नाची खात्री देतो आणि त्यांना गरजेच्या वेळी पैसे काढण्याची सुविधा देतो.

या प्लॅनमध्ये ग्राहकांना अनेक लवचिक पर्याय उपलब्ध आहेत. निश्चित उत्पन्न कधी सुरू करायचे, निश्चित उत्पन्नाचा कालावधी, परिपक्वतेच्या म्हणजेच प्लॅनच्या मॅच्युरिटीवेळी ठराविक रक्कम मिळविण्याचे स्वातंत्र्य या प्लॅनमध्ये आहे. याशिवाय, यामध्ये जीवन विमा देखील आहे, जो कुटुंबासाठी आर्थिक सुरक्षा प्रदान करतो.

या प्लॅनची खासियत म्हणजे वाढत्या उत्पन्नाचा पर्याय, ज्यात उत्पन्न दरवर्षी ५% चक्रवाढ दराने वाढते. यामुळे महागाईच्या काळात देखील आर्थिक व्यवस्थापन करण्यास मदत होईल.

आयसीआयसीआय प्रुडेंशियल लाइफ इन्शुरन्सचे प्रमुख उत्पादन आणि वितरण अधिकारी श्री. अमित पालटा म्हणाले, आमच्या नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या परिपाठीनुसार आम्ही नेहमीच ग्राहकांसाठी त्यांच्या बदलत्या गरजांनुसार नवीन आणि उपयोगी योजना आणत असतो. आयसीआयसीआय प्रु गिफ्ट सिलेक्ट हा असाच एक प्लॅन आहे, जो ग्राहकांना त्यांच्या आर्थिक उद्दिष्टांनुसार आणि रोख प्रवाहाच्या गरजांनुसार निश्चित उत्पन्नाची हमी देतो.

या प्लॅनमधील वाढत्या उत्पन्नाच्या वैशिष्ट्यामुळे ग्राहकांना महागाईची चिंता न करता अधिक दीर्घकालीन आर्थिक नियोजन करता येईल. आमच्या ग्राहकांना दिलेले वचन पाळण्याची आम्ही पूर्ण बांधिलकी घेतलेली आहे. याचेच उदाहरण म्हणजे वित्तीय वर्ष २०२५ च्या पहिल्या ९ महिन्यांत आमचा क्लेम सेटलमेंटरेट ९९.३% इतका राहिला आहे, म्हणजेच जवळपास सर्व विमा दावे यशस्वीपणे निकाली काढले गेले. तसेच, ज्या प्रकरणांमध्ये चौकशीची आवश्यकता नव्हती, त्यामध्ये सरासरी फक्त १.२ दिवसांत क्लेमचे पेमेंट करण्यात आले, ज्यामुळे ग्राहकांना वेगवान आणि सुलभ सेवा मिळू शकली.

# नथिंग फोन (३ए) ची विक्री ११ मार्चपासून सुरू

**नवी दिल्ली, १० मार्च २०२५:** नथिंग या लंडनस्थित तंत्रज्ञान कंपनीने आपला नथिंग फोन (३ए) सीरिज ११ मार्चपासून फ्लिपकार्ट, विजय सेल्स, क्रोमा आणि भारतातील इतर आघाडीच्या रिटेल स्टोअर्समध्ये उपलब्ध होत असल्याची घोषणा केली आहे. खास पहिल्या दिवशीचीसवलतम्हणूनफोन (३ए) फक्त १९,९९९ रु. आणि फोन (३ए) प्रो निव्वळ २४,९९९ रु. (सर्व सवलतींचा समावेश) उपलब्ध असणार आहे.

नथिंगने ४ मार्च २०२५ रोजी लक्षणीय कॅमेरा अपग्रेड असलेला फोन (३ए) सीरिज जगभरात सादर केला. फोन (३ए) मध्ये ५०मेगा पिक्सल मेन सेन्सर, सोनी अल्ट्रा-वाईड सेन्सर आणि ५०मेगा पिक्सल टेलिफोटो लेन्स तसेच २एक्स ऑप्टिकल झूम आहे. तर फोन (३ए) प्रोमध्ये पेरीस्कोप कॅमेरा, ६०एक्स अल्ट्राझूम आहे. सेल्फीसाठी फोन (३ए) मध्ये ३२मेगा पिक्सल फ्रंट कॅमेरा आहे तर प्रो मॉडिलमध्ये ४के व्हिडीओ रेकॉर्डिंगसह ५०मेगा पिक्सल सेन्सर आहे.

दोन्ही फोनमध्ये स्नॅपड्रॅगनएँ७जेन ३ मोबाइल प्लॅटफॉर्म आणि ५०००एमएएच बॅटरीज असल्याने पूर्ण चार्ज झाल्यावर हा फोन दोन दिवस चालतो. आता ५० अशा नव्या वेगवान चार्जिंगमुळेफोन (३ए) सीरिजचेफोन २० मिनिटांच्या चार्जिंगमध्ये पूर्ण दिवस (५०%) काम करतात.



# रचना मिस्त्रीची व्यक्तिरेखा जागृतिला जागृति एक नई सुबहमध्ये मिळाला पारंपारिक मेकओव्हर



**मुंबई, १० मार्च :** झी टीव्हीवरील 'जागृति एक नई सुबह' या मालिकेत जागृतिची भूमिका करणारी लोकप्रिय टेलिव्हिजन अभिनेत्री रचना मिस्त्री हिने लग्नानंतरच्या तिच्या आकर्षक परिवर्तनाने प्रेक्षकांना मोहित केले आहे. आपल्या धाडसी आणि आधुनिक फॅशन निवडींसाठी ओळखल्या जाणाऱ्या जागृतिच्या पोशाखांमध्ये आता पारंपारिक भारतीय पेहरावाची शोभा आणि सौंदर्य दिसून येतेआणित्यामुळे तिच्या व्यक्तिरेखेच्या प्रवासाला एक प्रकारची खोली लाभते.

लग्नापूर्वीजागृतिच्या स्टाईलमध्ये तिच्या आधुनिक आणि स्वतंत्र विचारांचे प्रतिबिंबदिसायचे, ज्यामध्ये आकर्षक ड्रेसेस आणि समकालीन पोशाखांचा समावेश होता जे तिच्या लूकची व्याख्याकरतअसत. मात्र, लग्नानंतरतिनेपारंपारिकसाड्यासुंदरपणे स्वीकारल्या आणि प्रवासात एक महत्त्वाचा बदल घडवून आणला. ही उत्क्रांती केवळ पोशाखांमध्ये बदल करण्यापेक्षा जास्त आहे -ती तिच्या पात्राच्या भावनिक वृद्धीचे आणि तिने स्वीकारलेल्या नवीन जबाबदाऱ्यांचे प्रतिबिंब आहे. हा बदल केवळमालिकेचेदृश्य आकर्षणच वाढवत नाही तर वास्तविक जीवनात अशाच बदलांचा अनुभव घेणाऱ्या लोकांनाआपलासावाटतो.

या परिवर्तनासहरचनाने जागृतिच्या भावनांमध्ये नवीन सखोलपणा आणला असूनत्यामुळे ती प्रेक्षकांशी अधिक जवळीक साधते. मालिका आता होळीच्या दृश्यासाठी सज्ज होत असतानाजागृतिचे वडील कलिकांत (आर्य बब्बर) ला सांगतात की तिला सूरज (विजयेंद्रकुमेरिया) कडून घटस्फोट हवा आहे. पण कलिकांत ते मान्य करेल का? की जागृतिला तिच्या स्वातंत्र्यासाठी लढावे लागेल?

पुढे काय होते हे जाणून घेण्यासाठी पहा 'जागृति-एकनई सुबह' दररोज रात्री ८:३० वाजता, फक्त झी टीव्हीवर!


**Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project**


**E-TENDER NOTICE NO 2025 DOAWB_1158423**

SURVEY, DESIGN, FABRICATION, SUPPLY, INSTALLATION, TESTING & COMMISSIONING OF TOTAL 78.68 kWp OF "ON GRID" CONNECTED ROOFTOP SOLAR PV POWER PLANT INCLUDING COMPREHENSIVE MAINTENANCE CONTRACT (CMC) FOR 5 YEARS

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded SMART Project. **Tiroda Agro Farmer Producer Company Ltd., Chirekhani, Tal. Tiroda, Dist. Gondia** is one of the beneficiaries under the project and inviting online bids on **https://mahatenders.gov.in** for above mentioned Machinery. The bid document is also available on the project website **www.smart-mh.org,** in tender and procurement section. The last date for submission of online bid is **01/04/2025 up to 12.00 PM.** Any updates or notices shall be published on aforementioned websites only.

**District Implementation Unit,**
**SMART Project Dist. Gondia**


# शब्दकोडे क्रमांक २०५६



**आडवे शब्द :-**
१) दुसऱ्याच्या द्रव्याचा अपहार करणे (वा.प्र.)
४) राखरांगोळी होणे
८) चामखीळ
१०) च्या साठी
११) खंदक
१२) पडलेला (वाडा)
१३) फुलातून काढलेले सुगंधी द्रव
१४) पत्र(इं.)
१६) पुष्कळ
१७) वस्तुनिर्मितीची जागा
१९) कुत्रा
२०) स्वच्छ
२१) सुकुमार
२३) संगीतातील एक राग
२५) दरवाजा
२७) एक चर्मवाद्य
२८) बारीक केस
२९) घोडा
३०) नाकावरील एक छोटा दागिना
३२) मालक
३४) समशेर
३७) खरकट्याचा प्रचंड ढीग
३९) वेळप्रसंग ओळखणारा
४१) मलई
४३) खिडकीला असलेला पारदर्शक घटक
४५) खरगोश
४६) मनुष्यजात
४७) भ्रमर
४९) धपाटा, तडाखा
५०) पवित्र
५१) ढीग
५२) सावली
५३) तृप्त न होणारी भूक
५५) खसखस लावलेला गोड पदार्थ
५७) संगीतातील एक राग
५९) धष्टपुष्ट
६१) स्त्री आणि पुरुष
६३) अगदी क्षुल्लक किमतीचे
६५) अजगर
६६) नवऱ्याची दुसरी पत्नी
६७) च्या सह, चूकच्या उलट
६९) अंग, कपडे स्वच्छ करण्याचे गुळगुळीत साधन
७०) क्वचित
७२) हात
७३) मर्यादा, सीमा
७५) मला
७६) फांदी तुटतानाचा आवाज
७७) ऐट, दिमाख
७८) एक पालेभाजी

**उभे शब्द :-**
१) खजिना, द्रव्यनिधी
२) शिक्षक
३) आवाज, ध्वनी
४) उत्कर्ष, चलती
५) सर्प
६) तात्काळ
७) नकारच्या विरुद्ध
८) माजलेला
९) मंत्रीमंडळ
११) ओरखडा
१३) समजण्यास कठीण, दुर्बोध
१५) डोक्याचा केशविरहित भाग
१६) अवधान, चित्त
१८) विशेष
१९) नाकावाटे शरीरात हवा घेण्याची क्रिया
२२) संधी, मुभा
२३) च्या तर्फे
२४) केसांचा भांग पाडण्याचे एक साधन
२५) आग अग्नी(इं.)
२६) केर
३१) जुगाराचा एक प्रकार, माठ
३२) हिंमत
३३) साखरेची फुगीर वडी
३५) किंचित छोटासा
३६) पृथ्वी
३८) समोरच्याच्या मनातील विचार ओळखणारा
४०) वेशीचा रक्षक, पाटलाचा हरकाम्या नोकर
४२) यमाकडून पापी लोकांना दिल्या जाणाऱ्या वेदना
४४) नशा आणणारा एक पदार्थ
४६) हाणामारी
४८) आवड, द्रवपदार्थ
५०) गवताचे पान
५४) वरपांगी
५५) बहुमोल
५६) सामान्य
५८) माजघर, भोजनशाळा
६०) निर्धन
६२) रममाण, निमग्न
६३) मकबरा
६४) एक पांढरे सुगंधी फूल
६५) पत, नाव, अब्रू
६६) विनाहेतू, सोपे, अकारण
६८) नगद, रोख रक्कम
६९) सरकविणारे मलशुद्धी करणारे
७०) सारखा
७१) गरज
७३) पारद
७४) बोलणे, जिव्हा

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | स्त | नि | ती | ल | नि | खा | रा | | भा | र | त | | का | वा |
| का | व | | र | वा | | रा | ज | व | ट | | ल | व | क | र |
| ल | | पा | क | | गो | | स्व | र | | न | वा | र | | क |
| | मा | रा | मा | री | | म | | द | र | बा | र | | प | री |
| वा | रा | | न | त | म | स्त | क | | त | ब | | बा | र | |
| | मा | र | | स | त | वा | | पा | ल | | क | र | त | ल |
| प | र | स | दा | र | | ल | ग | त | | कं | | का | प | ड |
| र | | र | म | | जि | | ज | | वा | द | न | | र | |
| क | ळ | शी | | स | रा | फ | | आ | ड | | | रा | त | वा |
| र | | त | ड | का | फ | ड | की | | व | सा | ह | त | | सि |
| | भा | | रा | ळ | | मा | र | वा | डी | | रा | | प्र | त |
| अ | व | य | व | | वा | रू | | न | ल | द | म | यं | ती | |
| न | | म | ड | के | | न | ट | वा | | वा | | | क्षा | र |
| मो | गा | | रा | | अ | ने | क | | रा | खा | व | ळ | | य |
| ल | व | | व | क्ष | | णे | | का | म | ना | | | खं | त |

## महत्त्वाचे

### 'गाव बोलावतो' चित्रपटाचा ट्रेलर रिलीज

**नाशिक ।** आपलं गाव समृद्ध करण्यासाठी एका बापाने आपल्या शहरातील मुलाला हाक द्यावी आणि मुलाने कोणताही विचार न करता आपल्या गावासाठी झोकून द्यावे आणि वडिलांचे समृद्ध गावाचे स्वप्न साकार करावे. हीच गोष्ट




'गाव बोलावतो' या चित्रपटाच्या माध्यमातून पुढे आणण्याचा प्रयत्न दिग्दर्शक विनोद माणिकराव यांनी केला आहे. भूषण प्रधान, माधव अभ्यंकर, गौरी नलावडे आणि श्रीकांत यादव यांच्या मुख्य भूमिका असलेल्या 'गाव बोलावतो' या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच रिलीज झाला. सध्या गावाकडे असं चित्र निर्माण झालंय की, गावात केवळ म्हातारी लोक दिसतात आणि त्यांची मुलं, नातवंडं नोकरी-उद्योगधंद्यांच्या निमित्ताने शहरात स्थिरावलेली दिसतात. मात्र, तरूणाईनेही आपल्या गावात राहून, गावाला जाणून घेऊन प्रगतीच्या दिशेने घेऊन जाणं ही तरूण पिढीची जबाबदारी आहे. गावाच्या भल्यासाठी, विकासासाठी गावातीलच नागरिकांनी एकत्र येऊन गाव सुधारायला हवं असा संदेश या चित्रपट देऊन जातो. कोणतंही चांगलं काम हाती घेतलं की त्यात नानाप्रकारे त्रास देऊन त्यात विघ्न आणणारे लोकंही गावात असतात, अशांच्या विरोधात गावकऱ्यांनी एकत्र येऊन लढा दिल्यास गावाचा विकास नक्कीच होईल, असे भाष्य या ट्रेलरमधून करण्यात आले आहे. गाव, शेती, शेतकरी, त्यांच्याभोवती फिरणारं राजकारण, विकासाचं स्वप्न बघणारा एक भला माणूस, त्याच्या मुलाची गावाकडे परतलेली पावलं यावर बेतलेला 'गाव बोलवतो' हा चित्रपट! या चित्रपटात भूषण प्रधान, माधव अभ्यंकर, गौरी नलावडे यांच्यासोबतच श्रीकांत यादव, शुभांगी लाटकर, किरण शरद यांच्या प्रमुख भूमिका आहेत. संस्कार वाहिनी प्रोडक्शन आणि फिल्मिटेरियन मीडिया वर्क्स निर्मित 'गाव बोलावतो' या चित्रपटाचे दिग्दर्शक विनोद माणिकराव हे आहेत. तर निर्माते प्रशांत मधुकर नरोडे, शंतनू श्रीकांत भाके हे आहेत, तर व्हिज्युअल बर्ड्स इन्स्टिट्यूट अँड स्टुडिओ, अमित मालवीय, प्रवीण इंदू, गणेश इंगोले, सुधीर इंगळे, तुषार खेरडे, दिनेश राउत हे सहनिर्माते आहेत. २१ मार्चपासून हा चित्रपट महाराष्ट्रभरात प्रदर्शित होईल.

### लोकशाही दिन उपक्रमातून १८ तक्रारींचे निराकरण

**नाशिक ।** आपल्या समस्या आणि तक्रारींचे निवारण करण्यासाठी लोकशाही दिन उपक्रमाच्या माध्यमातून आलेल्या नागरिकांच्या चेहऱ्यावर खऱ्या अर्थाने समाधान दिसले. विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी विभागीय लोकशाही दिन उपक्रमात तक्रारी आणि समस्या घेऊन आलेल्या नागरिकांशी अतिशय संवेदनशीलतेने संवाद साधला. त्यांच्या अडचणी समजावून घेतल्या आणि संबंधित यंत्रणेला त्या तात्काळ सोडविण्याचे निर्देशही दिले.वप्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी हा विभागीय लोकशाही दिन उपक्रम राबविण्यात येतो. जिल्हास्तरावर आयोजित करण्यात आलेल्या लोकशाही दिनात मांडलेल्या तक्रारींचे समाधान झाले नाही तर नागरिक तेथील टोकन नंबर घेऊन विभागीय लोकशाही दिन उपक्रमात दाद मागतात. आजच्या विभागीय लोकशाही दिनात एकूण १८ जणांनी आपल्या समस्या मांडल्या. विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांनी अतिशय आस्थेवाईकपणे विचारपूस करत त्यांच्या समस्या समजावून घेतल्या. त्यांनी मांडलेल्या समस्यांबाबत संबंधित विभागांना कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. यावेळी अपर आयुक्त जितेंद्र वाघ, सहआयुक्त उज्ज्वला बावके यांच्यासह मनपा, महसूल, सार्वजनिक बांधकाम यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

### पिंप्रज शाळेत बहुपयोगी निवाराशेडचे लोकार्पण

**नाशिक ।** आदिवासी भागातील जिल्हा परिषदेच्या आदर्श शाळा, पिंप्रज, ता. दिंडोरी येथे भव्य बहुउपयोगी निवारा शेडचे लोकार्पण करण्यात आले. अमास सेवा ग्रुप मुंबई व दादा गुरु अजरामर जीवदया ग्रुप घाटकोपर यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय समिती अध्यक्ष सोमनाथ बेंडकोळी होते. प्रमुख पाहुणे म्हणून हिरुबेन छेडा, शांताबेन गाला, चंद्रकांतभाई देढीया उपस्थित होते. चंद्रकांतभाई व शिक्षक विजय भोये यांच्या मार्गदर्शनाने शाळेचे मुख्याध्यापक यशवंत भामरे, मनोहर गांगुर्डे, देविदास कदम, मुरलीधर महाले, उर्मिला शिंदे, मनोहर गांवडे, लता पिंपळके यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. मान्यवरांच्या हस्ते शाळेला क्रीडा साहित्य तसेच विद्यार्थ्यांना खाऊ, होळीनिमित्त पिचकाऱ्या, पर्यावरणपूरक रंग यांचे वाटप करण्यात आले. सर्व शिक्षकांना हँडबॅग व समूहनृत्य पथकाला ४ हजार रुपयांचे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. पोकळवाडे ग्रामपंचायतीने शेडजवळ ओटा व फरशी बसवून दिली. पोलिस पाटील हिरामण बोंबले, ग्रा.पं. सदस्य बाळू बोंबले, लहानू बोंबले, ग्रामसेवक भाऊसाहेब गायकवाड तसेच दोन्ही ग्रुपचे सदस्य आदी उपस्थित होते.

# लोखंडी सळ्या वाहतुकीचा प्रश्न गंभीर; नागरिकांमध्ये संताप

**सिडको ।** मागील काही दिवसांपूर्वी नाशिकमधील द्वारका उड्डाण पुलावर लोखंडी सळया घेऊन उभ्या असलेल्या अवैध कंटेनरमुळे भीषण अपघात झाला होता. या अपघातात ८ नवयुवकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. नागरिकांनी या प्रकारानंतर पोलिसांनी कठोर कारवाई करावी अशी मागणी केली होती. मात्र, काही दिवस कारवाई झाल्यानंतर पुन्हा अशा घटनांचे सत्र सुरू झाल्याचे दिसत आहे.

सध्या फाटा ताज हॉटेल समोरील बोगद्यातून अवैध पद्धतीने अप्पे रिक्षांमधून स्टील वाहतूक केली जात आहे. यामुळे मोठ्या अपघातांचा धोका निर्माण झाला आहे. काही दिवसांपूर्वी नाशिकमध्ये याचप्रकारे झालेल्या एका अपघातात नऊ जणांचा मृत्यू झाला होता. अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी नागरिक आणि स्थानिक संस्था पोलिस प्रशासनाकडे तक्रारी करत आहेत. द्वारका पुलावरील अपघातानंतर प्रशासनाने काही प्रमाणात वाहनांवर कारवाई केली. मात्र, दिवस



सरताच पुन्हा अशा वाहतुकीला अभय मिळत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. अवैध कंटेनर आणि मोठ्या वाहनांची बेकायदेशीर वाहतूक शहरात सर्रास सुरू असून, वाहतूक पोलीस त्याकडे दुर्लक्ष करत आहेत. विशेष म्हणजे वाहतूक पोलीस ज्या ठिकाणी तैनात आहेत, त्याच ठिकाणी मोठ्या प्रमाणावर नियमभंग होत असल्याचे दिसत आहे. त्यामुळे जर पोलीस वाहनचालकांवर कारवाई करत नसतील, तर त्या भागातील वाहतूक पोलिसांना निलंबित करावे, अशी मागणी विविध पक्ष आणि संघटनांकडून करण्यात येत आहे. शहरातील सर्व पक्ष आणि सामाजिक संघटनांनी मिळून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे या संदर्भात लेखी निवेदन देण्याचा निर्णय घेतला आहे. शहरात अवैध वाहतूक थांबवण्यासाठी कठोर उपाययोजना राबवाव्यात, अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई व्हावी आणि संबंधित पोलिसांना जबाबदार धरावे, अशी मनसेचे संदीप दोंदे यांच्यामार्फत केली जाणार आहे. अवैध वाहतुकीमुळे शहरातील नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे. मोठी वाहने, जड साहित्य आणि नियमबाह्य वाहतूक यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. जर वेळेत कारवाई झाली नाही, तर भविष्यात आणखी मोठ्या दुर्घटना घडू शकतात. या पार्श्वभूमीवर, पोलीस आणि महापालिकेने मिळून अवैध वाहतूक थांबवण्यासाठी कठोर उपाययोजना राबवाव्यात. वाहतूक नियमांचा भंग करणाऱ्यांवर त्वरित दंडात्मक कारवाई करावी आणि वाहनचालकांना योग्य ते निर्देश द्यावेत, अशी नागरिकांची मागणी आहे. प्रशासन आता कोणती भूमिका घेतं, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## 'त्या' ४८ वृक्ष तोडीविरोधात हरकतींची आज सुनावणी



**नाशिक ।** नाशिक महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागाने आयटीआय पूल ते वावरे नगर दरम्यान ४८ झाडे तोडण्याचा प्रस्ताव दिला होता. मात्र, या वृक्ष तोडीला स्थानिक नागरिकांनी तीव्र विरोध केला आहे. त्यांनी पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांचा उल्लेख करत महानगरपालिकेकडे लेखी हरकत नोंदवली आहे.

या पार्श्वभूमीवर, महापालिकेने नागरिकांच्या हरकतींची सुनावणी घेण्याचा निर्णय घेतला आहे. ही सुनावणी मंगळवारी (११ मार्च) सकाळी ११:१५ वाजता सातपूर विभागीय कार्यालय, त्र्यंबक रोड येथे होणार आहे. याकडे वृक्ष प्रेमींचे व सर्व नागरिकांचे लक्ष लागले आहे. महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागाला सातपूर परिसरातील काही झाडांच्या विस्तारामुळे वाहतुकीस अडथळे निर्माण होत असल्याच्या तक्रारी मिळाल्या होत्या. त्यावर उपाय म्हणून झाडे छाटणे, पुनर्रोपण करणे किंवा तोडण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला. मात्र, स्थानिक नागरिकांनी या प्रस्तावाला विरोध केला आहे. वृक्षप्रेमी अमित कुलकर्णी आणि सुमिल शर्मा यांनी २० आणि २४ फेब्रुवारी रोजी महापालिकेकडे हरकत नोंदवली होती. झाडांची तोड रोखण्यासाठी त्यांनी पर्यावरणपूरक पर्यायांचा विचार करण्याची मागणी केली आहे.

महापालिकेने स्पष्ट केले आहे की, सुनावणीस नागरिकांनी उपस्थित राहून आपली बाजू मांडावी. अन्यथा त्यांची हरकत ग्राह्य धरली जाणार नाही. या सुनावणीत वृक्ष तोडण्याच्या प्रस्तावावर सखोल चर्चा होईल आणि तोड टाळण्यासाठी अन्य उपायांवर विचार केला जाईल. या प्रकरणामुळे नाशिकमध्ये पर्यावरण संरक्षणाबाबत जागरूकता वाढली असून, आता प्रशासनाचा अंतिम निर्णय काय राहतो, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## वंचित बहुजन माथाडी, ट्रान्सपोर्ट, कामगार युनियन जिल्हा कमिटी अध्यक्षपदी अविनाश शिंदे यांची नियुक्ती

**नाशिक ।** वंचित बहुजन माथाडी.ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियनच्या जिल्हा कमिटी अध्यक्षपदी अविनाश शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. युनियनचे संस्थापक ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशानुसार प्रदेश सरचिटणीस सुरेश मोहिते यांनी एका पत्रकाद्वारे याची घोषणा केली.

यानंतर अविनाश शिंदे यांनी युनियनची जिल्हा कार्यकारणी घोषित केली असून, त्यात सर्व घटकांना सामावून घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. युनियनची जिल्हा कार्यकारिणी पुढील प्रमाणे. स्थायी समितीचे माजी सभापती संजय साबळे यांची मार्गदर्शक पदी नियुक्ती झाली आहे तसेच सुनील साळवे, सिडको (महासचिव), सूरज गांगुर्डे, टाकळी ( कोषाध्यक्ष), दामोदर पगारे, तुकाराम मोजाङ, जीवन जाधव (सर्व उपाध्यक्ष), आकाश सोनवणे व अतुल जाधव (सचिव), विशाल हिवराळे, लखन डांगळे (संघटक), किरण मोरे (सहसचिव), करण दाभाडे, असिफ शेख (प्रसिद्धी प्रमुख). प्रमोद पाटील व संदेश सोनवणे (सदस्य) पदी निवड करण्यात आली आहे जिल्ह्यातील माथाडी कामगार तसेच कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी आपण कटिबद्ध राहू. कामगारांना न्याय मिळवून देण्याचा आपण तसेच युनियनचे सर्व पदाधिकारी प्रयत्नशील राहतील, असे वंचित माथाडी कामगार बहुजन युनियनचे नूतन जिल्हाध्यक्ष अविनाश शिंदे यांनी सांगितले.



## देवगाव नियतक्षेत्रात वनवा जनजागृती

**त्र्यंबकेश्वर ।** महाराष्ट्र वन विभाग पश्चिम भाग नाशिक वनपरिक्षेत्र अधिकारी त्र्यंबकेश्वर प्रादेशिक यांच्या मार्गदर्शनाखाली त्र्यंबकेश्वर तालुक्यातील देवगाव परिमंडळचे वनरक्षक के . वाय. दळवी यांनी देवगाव नियतक्षेत्रातील वाडी, वस्ती, शाळा, कॉलेज येथे प्रत्यक्ष जाऊन वनवा लागू नये, वनांचे संरक्षण व संपादन व्हावे तसेच जंगलाचे महत्व या विषयी गावोगावी जाऊन जनजागृती केली आहे. यावेळी ग्रामस्थ, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

## महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाच्या समर्थनार्थ मोर्चा

**देवळाली कॅम्प ।** महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाच्या समर्थनार्थ देवळाली कॅम्प येथे मोठ्या संख्येने बौद्ध उपासक व उपासिकांनी शांततामय मोर्चा काढला.




महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या ज्ञानमंदिर बौद्ध विहार येथून सुरू झालेल्या या रॅलीचा समारोप देवळाली कॅम्प पोलीस स्टेशन येथे करण्यात आला. बिहारमधील बौद्धगया येथील महाबोधी महाविहार हे बौद्धांच्या ताब्यात द्यावे, तसेच तेथील व्यवस्थापनातून ब्राह्मण वर्चस्व हटवावे, अशी या मोर्चातील प्रमुख मागणी होती. महाबोधी विहार व्यवस्थापन कायदा १९४९ मध्ये सुधारणा करून व्यवस्थापन समितीत केवळ बौद्ध धर्मियांचे प्रतिनिधित्व असावे, तसेच धार्मिक आणि सांस्कृतिक बाबींमध्ये बाह्य धर्मीयांचा हस्तक्षेप नसावा, अशा मागण्या या वेळी करण्यात आल्या. या मागण्यांचे निवेदन देवळाली कॅम्प पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पिसे यांना देण्यात आले. या मोर्चात ज्ञानमंदिर बौद्ध विहाराचे चेअरमन विश्वनाथ काळे, संजय भालेराव, भीमराव धिवरे, पंडित कटारे, अविनाश गायकवाड, विश्वनाथ पोपटकर, नितीन साळवे, सजन काळे, लखन डांगळे, भारती साळवे, अभिजित गजरे, राहुल जाधव, दिनेश कटारे, विनोद जगताप, किलेश बोराडे, कृष्णा लोखंडे आदी धम्मबांधवांनी सक्रिय सहभाग घेतला.

## पीव्हीजी शिक्षणशास्त्र महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांना अभिवादन



**नाशिक ।** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील कार्य प्रेरणादायी आहे. प्रत्येकाने सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून कार्य केले पाहिजे, असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश पाटील यांनी केले.

पुणे विद्यार्थी गृहाच्या पीव्हीजी शिक्षणशास्त्र महाविद्यालयात क्रांती-ज्योती सावित्रीबाई फुले यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. प्राचार्य डॉ. सुरेश पाटील यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. उपस्थित सर्वांनी पूजन करून अभिवादन केले. विभागप्रमुख प्रा.दिलीप अहिरे यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करून सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्याबद्दल मनोगत व्यक्त करून सर्वांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी प्रा.डॉ.अरविंद जिंजर, प्रा. मनीषा पाटील, प्रा. डॉ.रबाब भगत, प्रा. रोहिणी भालेराव, अर्चना जोशी, सखाराम गायकवाड उपस्थित होते. सेजल गुजराथी यांनी सूत्रसंचालन केले तर प्राजक्ता आव्हाड यांनी आभार मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि प्रशिक्षणार्थी विद्यार्थी उपस्थित होते.

# अधिक परताव्याच्या लाभाचे अमिषापासून सावधान : ढवळे

## मॉर्निंग ग्रुप परिवारातर्फे सायबर सुरक्षा विषयावर ज्येष्ठांना प्रबोधन

**सिडको ।** काळाप्रमाणे तंत्र बदलते अगर विकसित होते याकडे चांगल्या संदर्भाने जसे पाहता येते, तसे वाईट अगर चुकीच्या बाबींबद्दलही गांभीर्याने बघणे क्रमप्राप्त होऊन बसते. चोरी, लुटमारीचे वा फसवणुकीचे तंत्र असेच बदलले आहे. त्यामुळे राज्यातच नव्हे, तर संपूर्ण देशातच वाढलेल्या सायबर गुन्हेगारीचे आव्हान चिंतेचे ठरत असल्याचे प्रतिपादन सायबर पोलीस स्टेशनचे वरिष्ट पोलीस निरिक्षक सुभाष ढवळे यांनी केले.

मॉर्निंग ग्रुप परिवारातर्फे क्रिएटिव्ह माईंड मिडिया सर्विसेस चे संचालक जितेंद्र येवले यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजीत 'सायबर सुरक्षा' विषयावर प्रबोधनात्मक व्याख्यान कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना सुभाष ढवळे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर सायबल सेलचे दर्शन सोनवणे, डॉ. एम.बी.पवार, जितेंद्र येवले, प्रमोद उपाध्ये, गिरीश पाटील,बाळकृष्ण शिरसाठ, अशोक चुंभळे, अरूण पाटील, रमेश जगताप उपस्थित होते. यावेळी श्री. ढवळे म्हणाले की, घरात अथवा दुकानात शिरून किंवा खिशात हात घालून चीजवस्तू, पैसा अडका लांबवण्याचा काळ आता राहिला नाही. याचा अर्थ 'असे' होत नाही अशातला भाग नाही, मात्र आता चोऱ्या करण्याचे वा पैसा लांबवण्याचे चोरांचे तंत्र बदलले आहे. कालमानानुसार 'अपडेट' होत ते घरी बसल्या कुणाच्याही खिशात हात घालू लागले आहेत. विशेषत: ऑनलाइन व्यवहार करणारे किंवा कमी कालमर्यादेत अधिक परतावा देण्याचे आमिष दाखविणाऱ्या गुंतवणुकीच्या योजनांना बळी पडणारे तसेच बुद्धी गहाण टाकून कसल्या तरी बक्षिसाच्या संदेशाला भुलणारे लोक या सायबर क्राइमचे बळी ठरतात. अर्थात, याहीखेरीज संगणकीय फेरफार करून एकाचवेळी अनेकांच्या बँक खात्यावर दरोडा घालण्याचे प्रकारही होऊ लागले आहेत. त्यामुळे या वाढत्या सायबर क्राइमकडे गांभीर्याने लक्ष पुरवून आधुनिक पद्धतीने व्यवहार करू पाहणाऱ्या ग्राहकांना सुरक्षितता प्रदान करणे हे संबंधित सर्वच यंत्रणांसाठी कसोटीचे ठरले आहे.



अधिकतर प्रकरणांत नागरिकांच्या बेसावधपणामुळे या तक्रारी ओढवल्याचे आढळून येते. बँकांच्या एटीएम कार्डचे नंबर आदी तसेच आपल्या खात्याबद्दलची माहिती कुणालाही सांगू नये, अगदी बँकेतून बोलतो आहे असे सांगून विचारले गेले तरी ती देऊ नये; याबाबत वारंवार जागृती केली जात असतानाही काहीजण अशी माहिती देऊन बसतात व नंतर त्यांना पश्चाताप करण्याची वेळ येते. अधिक लाभाच्या लोभापायी काहीजण ऑनलाइन योजनांमध्ये पैसे गुंतवून पायावर धोंडा पाडून घेतात, तर बक्षीस लाभल्याच्या संदेशाला बळी पडून मूर्खात निघणारेही कपाळमोक्ष करून घेतात. तेव्हा सावधगिरी हाच यावरील उपाय ठरतो. स्वत: ग्राहकांनी तर ती बाळगायला हवीच; परंतु ऑनलाइन सेवा पुरविणाऱ्यांनीही त्याबाबतच्या सुरक्षिततेची काळजी घ्यायला हवी. कालमानाप्रमाणे चोरही चतुर झाल्याचे पाहता ऑनलाइन व्यवहारांत वाढ जशी होते आहे तशी यासंदर्भातील जनजागरणाची मोहीमही तीव्र व प्रभावी होणे गरजेचे असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी मोठ्या संख्येने ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

### घ्यावयाची काळजी

१) मोबाईल मध्ये आपले डाक्युमेंट सेव्ह करून ठेऊ नये. २) कोणतीही लिंक शेअर क्लिक किंव्हा शेअर करू नका. ३) मोबाईल. मध्ये अनोळखी ॲप डाउनलोड करू नका ४) डिजिटल अरेस्ट होत नाही खात्री बाळगा. ५) मोबाईल अनोळखी व्यक्तीला देऊ नका. ६) शेअर बाजारात लाभ देणारे टिप्स घेऊ नका. ७) पॉर्न साईट वापरू नका. त्यातील महिला सोबत चॅट करू नका.

# युवा मानस

## बँकींग क्षेत्रात रोजगाराची संधी











## आयफोनच्या चाहत्यांना झटका



## यूजीसीचा निकाल कसा तपासणार?




## 'गूगल पे' चे एक खास फिचर





## फोनमधील फीचर करेल भूकंपाबाबत अॅलर्ट




## रॉकींग लूक



## हिरव्या वाटेवर



# सेन्सेक्स दिवसाच्या उच्चांकावरुन 620 अंकांनी घसरला





**मुंबई, दि.१० प्रतिनिधी**

शेअर बाजारात आज १० मार्च रोजी मोठी अस्थिरता होती. दिवसभर वधारून व्यवहार केल्यानंतर शेवटच्या तासात जोरदार विक्री झाल्यामुळे सेन्सेक्स आणि निफ्टी दोन्ही शेवटी घसरून बंद झाले. दिवसाच्या उच्चांकावरून सेन्सेक्स 620 अंकांनी घसरला. तर निफ्टी 22,500 च्या खाली बंद झाला. त्यामुळे शेअर बाजारात गुंतवणूकदारांचे 5 लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले.

छोट्या आणि मध्यम शेअर्समध्येही मोठी घसरण दिसून आली. बीएसई मिडकॅप निर्देशांक 1.46 टक्क्यांनी आणि स्मॉलकॅप निर्देशांक 2.11 टक्क्यांनी घसरून बंद झाला. एफएमसीजी वगळता निफ्टीचे सर्व 12 क्षेत्रीय निर्देशांक घसरून बंद झाले. व्यवहाराच्या शेवटी सेन्सेक्स 217.41 अंकांनी घसरून 74,115.17 वर बंद झाला. तर निफ्टी 92.20 अंकांनी घसरून 22,460.30 वर बंद झाला.

बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल आज 10 मार्च रोजी 393.37 लाख कोटी रुपयांवर घसरले आहे, जे त्याच्या मागील ट्रेडिंग दिवशी म्हणजे शुक्रवार, 7 मार्च रोजी 398.29 कोटी रुपये होते. अशा प्रकारे सूचीबद्ध कंपन्यांचे मार्केट कॅप 4.92 लाख कोटी रुपयांनी कमी झाले आहे. दुसऱ्या शब्दांत गुंतवणूकदारांच्या संपत्तीत 4.92 लाख कोटी रुपयांची घट झाली आहे.

**सेन्सेक्स 74,115**

**निफ्टी 22,460**

आज, बीएसई सेन्सेक्समधील 30 पैकी 8 शेअर्स वाढीसह बंद झाले. यामध्ये पॉवर ग्रिडच्या शेअर्समध्ये सर्वाधिक 2.85 टक्के वाढ झाली आहे. यानंतर हिंदुस्तान युनिलिव्हर (HUL), इन्फोसिस, नेस्ले इंडिया आणि एशियन पेंटचे शेअर्स 0.45 ते 1.97 टक्क्यांच्या वाढीसह बंद झाले. सेन्सेक्समधील उर्वरित २२ शेअर्स आज घसरणीसह बंद झाले. त्यातही इंडसइंड बँकेचे समभाग सर्वाधिक 3.86 टक्क्यांनी घसरले. तर Zomato, Larsen & Toubro, Titan आणि Mahindra & Mahindra चे शेअर्स 0.97 टक्क्यांपासून 2.58 टक्क्यांपर्यंत घसरले. नाटोवरील अमेरिकेच्या भूमिकेच्या पार्श्वभूमीवर युरोपियन कमिशनने पुढील काही वर्षांत संरक्षणावर ८०० अब्ज युरो खर्च करण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेला 'ReArm Europe' असे नाव देण्यात आले आहे. येत्या काळात युरोप दारूगोळा, हवाई क्षेपणास्त्रे, क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली, तोफखाना प्रणाली, ड्रोन आणि इतर अनेक प्रकारची संरक्षण उपकरणे खरेदी करेल. आयसीआयसीआय सिक्युरिटीजचा असा विश्वास आहे की येत्या काळात संरक्षण कंपन्यांना मोठ्या प्रमाणात ऑर्डर मिळतील. ब्रोकरेजने सोलर इंडस्ट्रीज, डायनॅमॅटिक टेक्नॉलॉजीज, आझाद इंजिनिअरिंग आणि पीटीसी इंडस्ट्रीज यांना संभाव्य नफा मिळवून देणारे म्हणून सूचीबद्ध केले आहे आणि त्यांना खरेदी करण्याची शिफारस केली आहे.

# तिसरे अपत्य झाल्यास ५० हजार, मुलगा झाल्यास एक गाय मिळणार; खासदारांच्या ऑफरमुळे नवा वाद

**नवी दिल्ली, दि. १० वृत्तसंस्था**

एकीकडे भारताची लोकसंख्या सातत्याने वाढत आहे तर दुसरीकडे आंध्र प्रदेशातील सत्ताधारी पक्षाच्या खासदाराने अजब ऑफर आणली आहे. आंध्र प्रदेशातील मुख्यमंत्री आणि तेलुगु देशम पार्टीचे अध्यक्ष चंद्राबाबू नायडू यांनी जोडप्यांनी अधिक मुले जन्माला घालावी यासाठी प्रोत्साहन देत आहेत त्यातच त्यांच्या पक्षाच्या खासदाराने केलेल्या विधानामुळे नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.

आंध्र प्रदेश्च्या विजयनगर लोकसभा मतदारसंघातील खासदार अप्पाला नायडू यांनी म्हटलं की, तिसरं अपत्य जन्माला घालणाऱ्या महिलेला ५० हजार रूपये दिले जातील. त्याशिवाय जी महिला मुलाला जन्म देईल तिला भेट म्हणून एक गाय दिली जाईल. मी माझ्या पगारातून महिलांना ही रक्कम बक्षीस म्हणून देईन असं त्यांनी सांगितले. त्यांचं हे विधान सोशल मीडियात खूप व्हायरल होत आहे. विशेष म्हणजे नायडू यांचा व्हिडिओ टीडीपी नेते आणि कार्यकर्ते त्यांच्या सोशल मीडिया अकाऊंटवर शेअर करत आहेत.

अप्पाला नायडू यांचे हे विधान आंध्र प्रदेशात लोकसंख्यावाढीसाठी क्रांतीकारी पाऊल ठरेल असं टीडीपी नेते म्हणत आहे. इतकेच नाही तर मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनीही त्यांच्या खासदाराचं कौतुक केले आहे. जागतिक महिला दिनी विजयनगरच्या राजीव स्पोर्ट्स कपाऊंडमध्ये झालेल्या कार्यक्रमात खासदारांनी महिलांना ऑफर दिली. अलीकडेच दिल्ली दौऱ्यात मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी दक्षिण भारतात घटणाऱ्या लोकसंख्येबाबत चिंता व्यक्त केली होती. कमी होत असलेली लोकसंख्या पुढील काळात आव्हानात्मक असेल. उत्तर प्रदेश, बिहार इथं युवा लोकसंख्या वाढतेय असंही चंद्राबाबू नायडू यांनी म्हटले होते.



दरम्यान, याआधी मी कुटुंब नियोजनाला प्रोत्साहन देत होतो, परंतु आता माझे विचार बदलले असून मी लोकसंख्या वाढीच्या बाजूने आहे. भारत एक असा देश आहे, ज्याच्याकडे अधिक लोकसंख्येमुळे सर्वात फायदा आहे. जर आपण योग्य नियोजन केले तर भारत आणि भारतीयाना भविष्यात चांगले दिवस येतील. जागतिक पातळीवर सेवांमध्ये इतर देशांना भारतीयांवर निर्भर राहावे लागेल असं सांगत मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी महिला कर्मचाऱ्यांना मातृत्व रजा वाढवण्याचा निर्णय घेतला आहे.

# महाराष्ट्रातील दोन साहित्यिकांचा प्रतिष्ठित साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मान

## डॉ. सुधीर रसाळ यांचा मराठीसाठी,डॉ. दिलीप झवेरी यांचा गुजराती साहित्यकृतीसाठी केला गौरव

नवी दिल्ली, दि.१० वृत्तसंस्था

मराठीतील ज्येष्ठ समीक्षक आणि लेखक डॉ. सुधीर रसाळ यांना त्यांच्या समीक्षात्मक ग्रंथ 'विंदांचे गद्यरूप' यासाठी तर गुजराती भाषेसाठी दिलीप झवेरी यांना त्यांच्या 'भगवाननी वातो' या कवितासंग्रहासाठी प्रतिष्ठित साहित्य अकादमी पुरस्काराने आज सन्मानित करण्यात आले.

येथील कमानी ऑडिटोरियममध्ये ' साहित्य अकादमी पुरस्कार 2024 अर्पण' सोहळ्याचे दिमाखदार आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रख्यात नाटककार आणि लेखक महेश दत्तानी प्रमुख पाहुणे म्हणून, तर साहित्य अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक, उपाध्यक्ष कुसुम शर्मा, सचिव के. श्रीनिवासराव व्यासपीठावर तसेच विविध भाषेतील साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त मान्यवरांसोबत उपस्थित होते. पुरस्काराच्या स्वरूपात ताम्रपत्र, शाल आणि रुपये एक लाख रोख रक्कम प्रदान केली जाते.



पुरस्कार वितरणाच्या कार्यक्रमात 23 प्रादेशिक भाषांमधील नामांकित साहित्यिकांच्या साहित्यकृतींना गौरवण्यात आले.

मराठी साहित्य क्षेत्रातील ज्येष्ठ समीक्षक डॉ.सुधीर रसाळ यांच्या "विंदाचे गद्यरुप" या समीक्षात्मक पुस्तकात प्रख्यात मराठी कवी आणि समीक्षक विंदा करंदीकर यांच्या समीक्षात्मक लेखनावर सविस्तर चर्चा करण्यात आलेली आहे.

डॉ.सुधीर रसाळ हे मराठीतील मान्यवर समीक्षक आणि लेखक आहेत. त्यांनी 1956 पासून मराठी वाङ्ग्याची समीक्षा करत उल्लेखनीय योगदान दिले आहे. दिल्लीच्या साहित्य अकादमीमध्ये मराठीचे प्रतिनिधित्व करणारे रसाळ हे औरंगाबाद विद्यापीठाच्या मराठी भाषा व वाङ्मय विभागाचे 1990 ते 1993 या काळात प्रमुख होते. साहित्य लेखन, समीक्षा आणि संपादन या क्षेत्रांत त्यांचा हातखंडा आहे.

गुजराती भाषेचे ज्येष्ठ कवी लेखक आणि समीक्षक दिलीप झवेरी यांचा जन्म मुंबईतील असून ते ठाणे येथे स्थायिक झाले आहेत.

'भगवाननी वातो हा गुजराती भाषेतील 16 पृथक्क गद्य कवितासंग्रह संग्रह असून एकच लांब कविता आहे. या कवितासंग्रहामध्ये ईश्वरा बद्दल जटिल कोलाज मांडलेले असल्याने हा गंभीर केंद्रीय विषय आहे. हा कवितासंग्रह नाजूकपणे रोजच्या बोली भाषेत मांडलेला आहे. या कविता संग्रहामध्ये संपूर्ण ब्रह्मांडाला एकत्रित करण्याचा प्रयत्न आहे यामध्ये राजकीय व्यवस्था, विज्ञान, इतिहास भूतकाळ आणि वर्तमान का यांचे एकत्रित मिलाफ करून कविता गुंफल्या आहेत.

कोकणी भाषेसाठी लेखक नाटककार समालोचक आणि अनुवादक मुकेश थळी यांना त्यांच्या 'रंगतरंग ' निबंध संग्रहासाठी आज साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

रंगतरंग या निबंध संग्रहात एकूण 24 वेगवेगळ्या विषयांवर निबंध लिहिलेले आहेत. या निबंधाची भाषा अत्यंत काव्यात्मक सुंदर तथा सहज स्पष्ट आणि आकर्षक अशी आहे. यामध्ये म्हणी, वाक्यप्रचार यांचा उपयोग करण्यात आला असून जी वाचकांना चकित करते.

साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त सर्वच सन्मानित साहित्यिक उद्या साहित्य अकादमी परिसरातील नर्मदा या सभागृहात सकाळी दहा वाजता त्यांच्या पुरस्कार प्राप्त साहित्य विषयी संवाद साधतील.

# भारतीय वेशभूषा असेल तरच प्रवेश मिळणार

## जेजुरी खंडोबा मंदिराचा महत्वपूर्ण निर्णय

**जेजुरी, दि. १० प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या श्री क्षेत्र खंडोबा देवाच्या दर्शनासाठी जेजुरी गडावर येणाऱ्या भाविकांसाठी आजपासून वस्त्र संहिता लागू करण्याचा निर्णय देवस्थान ट्रस्टने घेतला असून तसेच त्यासाठी नियमावलीही जाहीर करण्यात आली आहे.

यापुढे मंदिरात दर्शनासाठी भारतीय वेशभूषा परिधान करणे आवश्यक असेल. भारतीय वेशभूषा असेल तरच भाविकांना प्रवेश मिळेल असा निर्णय श्री मार्तंड देव संस्थान, जेजुरीच्या विश्वस्त मंडळाच्या वतीने घेण्यात आला आहे. पुरूष व महिला भाविकांना मंदिरांत कमी कपड्यांमध्ये प्रवेश मिळणार नाही, असंही स्पष्ट करण्यात आले आहे.

फॅशन म्हणून वापरण्यात येणाऱ्या फाटक्या जीन्स, बर्मुडा, शॉर्ट, स्कर्ट असा व तत्सम कपडे घालून देव दर्शनास गडावर येण्यास मज्जाव केला जाणार आहे. याविषयी बोलताना श्री मार्तंड देवस्थानचे प्रमुख विश्वस्त श्री. अभिजीत देवकाते म्हणाले की, "मंदिराची पावित्र्य, शालीनता जपणारी वेशभूषा भाविकांकडून अपेक्षित आहे. गुडघ्याच्या वरती असणारे किंवा आखूड- कमी कपडे



अपेक्षित नाहीत. असे कपडे न घालण्याचं नम्र आवाहन सर्व विश्वस्त मंडळाच्या वतीने भाविकांना करण्यात आले आहे. महिला आणि पुरुष दोघांसाठी हे नियम सारखेच असणार आहेत. दरम्यान दर्शनासाठी येताना भाविकांनी कोणत्याही प्रकारचे भारतीय पारंपरिक वेशभूषा केलेली चालणार आहे.

याचबरोबर देवस्थानच्या भंडारा प्रसाद निर्मिती केंद्राचा शुभारंभ करण्यात आला आहे. हा भंडारा प्रसाद भाविक भक्तांनी देवाला मनोभावे अर्पण केलेल्या भंडाऱ्यापासून तयार करण्यात येणार आहे. खंडोबा मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या प्रत्येक भाविकांना निःशुल्क हा " भंडार प्रसाद " देण्यात येणार आहे. भाविकांनी या प्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे. देवाच्या अंगावर पडणारा भंडारा एकत्र करून त्याच्या पिशव्यामधून भाविकांना देण्यासाठी पुणे येथील खंडोबा भक्त विलास दशरथ बालवडकर यांनी सुमारे एक लाख रुपये खर्चाची यंत्रसामुग्री देवसंस्थानला दिली आहे.

# मुंबई ते न्यूयॉर्क विमानात बॉम्ब?

## धमकी मिळाल्यानंतर एअर इंडियाचे विमान अर्ध्यातूनच परतले

**मुंबई, दि. १० प्रतिनिधी**

एअर इंडियाचे एक विमान मुंबईहून न्यूयॉर्कला जात असतानाच अचानकपणे अर्ध्या वाटेतूनच पुन्हा मुंबईत परतलेय. विमानात बॉम्ब असल्याची धमकी मिळाल्यानंतर पायलटला त्याचा मार्ग बदलावा लागला. एअर इंडियाचे बोईंग 350 विमान अझरबैजानवरून उड्डाण करीत असताना विमानातील क्रू मेंबर्सना ही धमकी मिळाली. विमान मुंबईत परतल्यानंतर बॉम्ब शोधक अन् बॉम्ब नाशक पथक घटनास्थळी पोहोचले असून, बॉम्ब शोधण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आलीय. मात्र, आतापर्यंतच्या तपासात काहीही समोर आलेले नाही. त्यामुळे ही फक्त एक खोटी धमकी असल्याची आता चर्चा आहे. पोलीस अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, एका प्रवाशाला शौचालयात एक चिठ्ठी सापडली, ज्यावर लिहिले होते 'विमानात बॉम्ब आहे'. ते पाहून तो काळजीत पडला आणि त्याने लगेचच क्रू मेंबर्सला याबद्दल माहिती दिली. यानंतर विमानाचे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. या विमानात एकूण 303 प्रवासी आणि 19 क्रू मेंबर्स होते. विमानाने मुंबईहून पहाटे 2 वाजता उड्डाण केले आणि सकाळी 10.25 वाजता परतले. एआय-119 ला मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते न्यू यॉर्कमधील जॉन एफ केनेडी विमानतळापर्यंतचा प्रवास पूर्ण करण्यासाठी सुमारे 15 तास लागतात. एअर इंडिया म्हणते की, विमान आता उद्या सकाळी 5 वाजता उड्डाण करणार आहे. एअर इंडियाने असेही म्हटले आहे की, प्रवाशांना विश्रांतीची जागा, जेवण आणि इतर मदत पुरवण्यात आलेली आहे.

एअर इंडियाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, 'आज 10 मार्च 2025 रोजी मुंबई ते न्यू यॉर्कला जाणाऱ्या एआय-119 विमानात संभाव्य सुरक्षा धोका आढळून आला. नियमानुसार, विमानातील सर्व प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने विमानाला मुंबईत परत बोलावण्यात आले. सकाळी 10.25 वाजता विमान मुंबईत सुरक्षितपणे उतरले. सुरक्षा यंत्रणा या प्रकरणाची चौकशी करीत आहेत. एअर इंडियाचे अधिकारी त्यांचे पूर्ण सहकार्य करीत आहेत. आता हे विमान 11 मार्च 2025 रोजी पहाटे 5 वाजता निघेल, तोपर्यंत सर्व प्रवाशांना हॉटेलमध्ये राहण्याची व्यवस्था, जेवण आणि इतर मदत देण्यात आलेली आहे.

# अलोपेशिया आजार कारण आणि उपचार

**लोकारोग्य**

**हॅलो डॉक्टर**

हल्लीची जीवनशैली ही प्रचंड धकाधकीची आणि तितकीच ताणतणाव युक्त अशी बनलेली दिसतेय. याच ताणतणावाचा दुष्परिणाम हा मानवी आरोग्यावर मोठ्या प्रमाणात होताना दिसतो. मधुमेह, उच्चरक्तदाब, किडनीचे, फुफ्फुसाचे असे नवनवीन आजार देखील उदभवताना दिसतात. याच तणावयुक्त जीवनशैलीचा परिणाम हा मोठ्या प्रमाणात केसांच्या आरोग्यावर देखील होतोय. अकाली केसगळती, आणि टक्कल पडणे अर्थात अलोपेशिया चा विकार त्यामुळेच बळावताना दिसतोय. हा अलोपेशिया आजार नेमका काय आहे? या आजाराची कारण काय आहेत? निदान नेमकं कस करायचं? आणि सर्वात महत्वाचं म्हणजे अलोपेशिया आजारावर उपचार काय आहेत? याच प्रश्नांची उकल करण्यासाठी त्वचा विकार **तज्ज्ञ डॉ. विनोद शृंगारे** यांच्याशी बातचीत.

१]अलोपेशिया हा आजार म्हणजे नेमका कोणता आजार आहे?




मोठ्या प्रमाणात केसगळती होणे किंवा डोक्यावर केस गळती होऊन टक्कल पडणे यालाच वैद्यकीय परिभाषेत अलोपेशिया म्हणतात. अलोपेशियाचे वेगवेगळे प्रकार आहेत. काही प्रकारामध्ये डोक्यावरच्या एकाच भागाचे केस गळू शकतात. तर काही प्रकारामुळे डोक्याच्या. चेहऱ्याच्या किंवा शरीराच्या अनेक भागातून केस गळती होते.

२] अलोपेशिया हा आजार कशामुळे होतो?

अलोपेशिया या आजाराची अनेक कारण आहेत. यामध्ये एंड्रोजेनेटिक अलोपेशिया हे पुरुष आणि महिलाच्या केसगळतीचे कारण आहे जे अन्यवंशिक आहे. हे पालकांकडून वारशाने पुढल्या पिढीला मिळते. आपल्या शरीराला जबरदस्त धक्का बसला कि शरीरावरील केसांची वाढ तात्पुरती थांबते. शिवाय केस गळतात.याशिवाय दीर्घकाळापर्यंत ताप येणे,मानसिक ताणतणाव,अचानक वजन कमी होणे, शरीरावरील शस्त्रक्रिया, लोह किंवा जस्ताची कमतरता,कर्करोगाची औषधी, सोरायसिस, दाद सारख्या रोगांचे संक्रमण, केसाना वापरले जाणारे रासायनिक साबण किंवा शाम्पू अशा अनेक कारणामुळे हा आजार होऊ शकतो.

३] अलोपेशिया आजाराची लक्षण काय असतात?

अलोपेशिया एरिता मुळे केस गळण्याचे एक किंवा अधिक ठिपके डोक्यावर येतात. डोक्यावर जिथे टक्कल पडते तिथली त्वचा गुळगुळीत दिसते. काही लोकांना टक्कल पडलेल्या भागात खाज सुटते. जळजळ जाणवते. अलोपेशिया टोटॅलिस मध्ये डोक्यावरचे सर्व केस गाळून पडतात. टक्कल पडलेल्या भागाची त्वचा लाल दिसते. आपण त्वचाविकार तज्ज्ञाकडे गेलो कि ते ठराविक प्रकारच्या टेस्ट करून अलोपेशिया चे निदान करतात.

४]अलोपेशिया आजारावर उपचार कोणते आहेत?

अलोपेशिया आजाराचा उपचार नेमक्या कारणावर अवलंबून असतो. जर अंतर्निरहित संसर्ग किंवा आरोग्यस्थिती बिघडलेली असेल तर त्यावर उपचार केल्याने केस गळती कमी होऊ शकते. जर अलोपेशिया अनुवांशिक असेल तर महिलांसाठी मिनोऑक्सिडील किंवा स्पायरोनोलॅक:टोन किंवा सायप्रोट्रॉन या अँड्रोजन गोळ्या आहेत. पुरुषांसाठी मिनोऑक्सिडील गोळ्या किंवा फिनस्ट्राईड या गोळ्यांचा उपचार आहे.

# दिवसाढवळ्या सोन्याच्या दुकानात सशस्त्र दरोडा; 25 कोटींचे दागिने लुटले

**पाटणा, दि. १० वृत्तसंस्था**

सोन्याची दुकाने लुटल्याच्या अनेक घटना तुम्ही एकल्या किंवा वाचल्या असतील. पण, बिहारच्या अराहमध्ये दिवसाढवळ्या 25 कोटी रुपयांचा दरोडा टाकल्याची धक्कादायक घटना घडली आहे. शहरातील गोपाळी चौकातील तनिष्क ज्वेलरी शोरुममध्ये शिरलेल्या सशस्त्र दरोडेखोरांनी सुमारे 25 कोटी रुपयांचे दागिने लुटून पोबारा केला. या दरोड्याची संपूर्ण घटना दुकानात लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे.

शोरुममध्ये लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात दरोड्याची ही घटना कैद झाली आहे. फुटेजमध्ये स्पष्टपणे दिसत आहे की, आज सकाळी 10 वाजेच्या सुमारास सशस्त्र दरोडेखोर शोरुममध्ये घुसतात आणि दुकानातील सर्वांना धमकावून सोने, चांदी, हिऱ्याचे दागिने बॅगेत भरुन पळ काढतात. या घटनेनंतर संपूर्ण परिसरात खळबळ उडाली. स्टोअर मॅनेजरच्या म्हणण्यानुसार, सुमारे 25 कोटी रुपयांचे दागिने लुटले गेले आहेत. तर, रोख रकमेचे मूल्यांकन केले जात आहे.

दरम्यान, दरोड्यानंतर भोजपूरच्या एसपीसह पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचले आणि तपास सुरू केला. एसपी राज म्हणाले की, गुन्हेगारांची ओळख पटवली जात असून त्यांच्या अटकेसाठी एसआयटी स्थापन करण्यात आली आहे. मात्र शोरुमपासून अवघ्या 600 मीटर अंतरावर असलेल्या नगर पोलिस ठाण्याचे पोलिस दरोड्याच्या वेळी घटनास्थळी पोहोचू शकले नाहीत, त्यामुळे पोलिसांच्या कार्यशैलीवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

# चिंचेचे औषधी गुणधर्म

कांचनाथ कुळातला चिंचवृक्ष हा मूळ आफ्रिकेतला असल्याचे म्हणतात. परंतु अतिप्राचिन काळापासून तो भारतीय भूमीत आहे. त्याला भारतीय वृक्ष मानण्यातत येते. आपल्याकडे हिरवी चिंच व लाल चिंच अशा दोन जाती आहेत. चिंचफळातला गर रोचक, दाहशामक व रक्तपित्तशामक असतो. लघवीच्या विकारावर चिंचेच्या टरफलांची राख देतात. फुले रक्तसंग्राहक आहेत. चिंचपन्हे पित्त व इतर ज्वरात होणाऱ्या जुलाबावर देतात. मुरगळा, व्रण बरा होण्यासाठी त्यावर चिंचपाला ठेचून बांधतात. चिंचपाला सारक, रूचकर व रक्तदोषनाशक असतो. त्यात टार्टिरिक ॲसिड व क्षारादी

**आरोग्यम् धनसंपदा**



औषधी गुणधर्म असतात. पाळीव जनावरांची पचनक्रिया बिघडली असता त्यास चिंचपाला व लिंबपाला मिश्रीत चारा खाऊ घालतात. गुरांची मान व पाय सुजीवर चिंचपाला व वारूळाची माती उकळत्या पाण्यात कढवून त्याचा लेप करतात.पोटात कळा येत असतील, पातळ जुलाब होत असतील तर भाताच्या पेजेत चिंचपाला वाटून ते मिश्रण औषधासारखे घ्यावे. त्याने अतिसार थांबतात, असे वैद्यराज सांगतात. पाल्याच्या रसात तुरटी उगाळून त्यात कापडाची पटटी भिजवून डोळ्यावर बांधल्यास नेत्रविकार बरा होतो. चिंचेच्या कोवळया पानांची चटणी व कोशिंबीर फारच रूचकर लागते. चटणीत चवीला गुळ, हिंग व तिखट किंवा हिरवी मिरची वाटून टाकतात.भोजनानंतर मुखशुद्धीसाठी चिंचोका वापरतात. भाजलेल्या चिंचोक्याची टरफले काढून सुपारीसारखे चुर्ण किंवा तुकडे, भाजलेल्या खारकांचे तुकडे तसेच मीठ व लिंबयुक्त ओवा टाकतात. ही सुपारी चवदार व पाचक असते.

# जागतिक किडनी दिनानिमित्त नेफ्रोप्लसतर्फे देशभरात मोफत आरोग्य तपासणी मोहीम

आशियातील सर्वात मोठे डायलिसिस केअर नेटवर्क असलेल्या नेफ्रोप्लसने १३ मार्च २०२५ रोजी जागतिक किडनी



दिनानिमित्त भारतातील २०+ शहरांमध्ये आणि निवडक आंतरराष्ट्रीय ठिकाणी मोठ्या प्रमाणात किडनी तपासणी मोहीम सुरू केली आहे. 'तुमचे मूत्रपिंड ठीक आहेत का? लवकर ओळखा आणि मूत्रपिंडाचे आरोग्य सुरक्षित करा' या थीमखाली ही मोहीम सुरू करण्यात आली आहे. याचा उद्देश क्रॉनिक किडनी डिसीज (CKD) रोखण्याबाबत जागरूकता निर्माण करणे आहे. ६ मार्च ते १८ मार्च २०२५ या कालावधीत दिल्ली, हैदराबाद, बेंगळुरू, मंगलोर, हल्द्वानी, रांची, जयपूर, विशाखापट्टणम, राजमुंद्री, देहरादून, नागपूर, वडोदरा, वाराणसी, गोरखपूर, पटना, लखनऊ, दरभंगा, मोतीहारी, सासाराम, जौनपूर, आझमगड, महबूबनगर, हिसार, पंचकुला यासह भारतातील विविध शहरांमध्ये आणि नेपाळ, फिलीपिन्स आणि उझबेकिस्तानमधील निवडक क्लिनिकमध्ये मोफत तपासणी शिबिरे आयोजित केली जातील. हा उपक्रम मधुमेह, उच्च रक्तदाब आणि तंबाखूच्या वापरासारख्या अस्वास्थ्यकर जीवनशैलीच्या पर्यायांमुळे धोका असलेल्या व्यक्तींसाठी, सीकेडीची लवकर ओळख आणि प्रतिबंध करण्यावर लक्ष केंद्रित करतो. तपासणी व्यतिरिक्त, नेफ्रोप्लस तीन दिवसांच्या कार्यक्रमादरम्यान गोळा केलेल्या डेटाचा वापर करून एक व्यापक संशोधन अभ्यास करेल. हा अभ्यास प्रमुख गोष्टींचे विश्लेषण करेल

**जनआरोग्य**

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# संपूर्ण देशात मतदार यादीवर संशय

## चर्चा व्हायला हवी- राहुल गांधींची मागणी

**नवी दिल्ली, दि. १० वृत्तसंस्था**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा आजपासून (10 मार्च) सुरू झाला आहे. 4 एप्रिलपर्यंत चालणाऱ्या या अधिवेशनात एकूण 16 बैठका होणार आहेत. या कालावधीत वक्फ कायद्यासह सुमारे 36 विधेयके मांडण्याची तयारी सरकार करत आहे. दरम्यान, आज लोकसभेतील चर्चेदरम्यान विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मतदार यादीचा मुद्दा उपस्थित केला.

विरोधी पक्षनेते राहुल गांधी म्हणाले, संपूर्ण देशात आणि प्रत्येक विरोधी राज्यात मतदार यादीवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. महाराष्ट्रासह प्रत्येक राज्यातील मतदार यादीत गडबड असल्याचा संशय व्यक्त होतोय. या मतदार यादीवर सभागृहात चर्चा झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

लोकसभा व्यतिरिक्त राहुल गांधी यांनी मतदार यादीबाबत X वर एक पोस्ट देखील केली आहे. त्यात त्यांनी लिहिले की, संपूर्ण विरोधी पक्ष संसदेत मतदार यादीवर सविस्तर चर्चा करण्याची मागणी करत आहेत. महाराष्ट्राच्या मतदार यादीतील अनियमिततेबाबत माझी पत्रकार परिषद होऊन एक महिन्याहून अधिक काळ झाला, मात्र पारदर्शकतेबाबत आम्ही निवडणूक आयोगाकडे केलेल्या मागण्या अद्याप पूर्ण झालेल्या नाहीत. प्रश्न आजही अनुत्तरित आहेत. आता मतदार यादीतील दुबार नावांचे नवे पुरावे समोर आले असून, त्यामुळे नवे आणि गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. लोकशाही आणि संविधानाच्या मूल्यांचे रक्षण करण्यासाठी ही चर्चा अत्यंत महत्त्वाची आहे, असेही राहुल म्हणाले.

मतदार यादीवर बोलताना माजी केंद्रीय मंत्री आणि राज्यसभा खासदार कपिल सिब्बल म्हणाले, निवडणूक आयोग सरकारच्या नियंत्रणाखाली आहे. लोकशाही अशीच चालू राहिली आणि निवडणूक आयोग सरकारची वकिली करत राहिला, तर निश्चितच निकाल तुमच्यासमोर आहेत.


आम आदमी पार्टीचे राज्यसभा खासदार संजय सिंह म्हणाले, निवडणूक आयोग आणि भाजप मिळून सरकारी यंत्रणेचा गैरवापर करतात. बनावट मतदार तयार करत आहे. महाराष्ट्र, हरियाणा आणि दिल्लीत केले आणि आता बंगालमध्ये सुरू झाले आहे. निवडणूक प्रक्रियाच निष्पक्ष नसेल, तर काय करायचे. या संपूर्ण निवडणूक घोटाळ्यात सरकार आणि निवडणूक आयोगाची बाजू पुढे यायला हवी.

# पाच भावांनी एकाच मंडपात केले लग्न

**विकासनगर (उत्तराखंड), दि. १० वृत्तसंस्था**

दोन बहिणींचे एकत्र लग्न म्हणजेच एकाच मंडपात लग्न लागल्याचं आपण अनेकदा पाहिलं असेल. तसंच सामूहिक विवाह सोहळे आपण तर पाहिलेच असतील. अशा विवाह सोळ्यांना आपण हजेरी देखील लावली असेलच. मात्र, उत्तराखंडमधील पाच भावांचा एकाच मंडपातला विवाहसोहळा सध्या चर्चेचा विषय आहे.

लग्नसमारंभात अनावश्यक खर्च होताना आपल्याला दिसतो. जौनसर इथला लग्नसोहळा याला अपवाद ठरलाय. इथं एकाच कुटुंबातील पाच तरुणांनी एकाच मंडपात लग्न केलं. या लग्नात वधू वेगवेगळ्या कुटुंबातील आहेत. पाच नववधू एकत्र घरी आल्यावर नातेवाईकांनी त्यांचं जंगी स्वागत केलं. यामुळं एकाच मंडपात पाच भावांनी लग्न केल्यामुळं हे लग्न परिसरात चर्चेचा विषय राहिला.



विकासनगर-आदिवासी भागातील जौनसर बावर इथं आजही एकत्र कुटुंबाची परंपरा आहे. यात विशेषतः वैवाहिक चालीरीतींचा समावेश होतो. पणजीया गावातील एकाच कुटुंबात पाच तरुणांनी एकत्र लग्न केलं. पाच नववधू एकत्र घरी आल्यावर नातेवाईकांनी त्यांचं जंगी स्वागत केलं. जौनसर बावरच्या पंजिया गावात दोन भावांच्या पाच मुलांचा विवाह जौनसरी रितीरिवाजाप्रमाणं पार पडला.

लग्नानंतर गावातील लोकपरंपरेनुसार राहिणी मेजवानीचं आयोजन करण्यात आलं होतं. यामध्ये गावातील नागरिकांना मेजवानी दिली जाते. कलाम सिंग हे पंजिया गावचे रहिवासी, शेतकरी आहेत. त्यांची तीन मुले खासगी कंपनीत काम करतात. तर, दुसऱ्या भावाची दोन्ही मुले सैन्यात आहेत. कुटुंबातील, गावातील सून आणि मुलींच्या सन्मानार्थ विशेष मेजवानीचं आयोजन केलं जातं आणि पाहुण्यांनाही आमंत्रित केलं जाते. अनोख्या चालीरीती आणि संस्कृतीसाठी प्रसिद्ध असलेलं हे गाव सध्या एकाच कुटुंबातील पाच मुलांच्या लग्नामुळं चर्चेत आहे. पंजिया गावातील स्वातंत्र्यसैनिक वीर पुंकू यांच्या नातवानं एकाच दिवशी पाच लग्न लावली. यासोबतच विवाह सोहळ्यातील अनावश्यक खर्च कमी करण्याचा संदेश या कुटुंबानं दिला.

महासागर NASHIK Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 'ANANDI', KOTWAL PARK, TILAKWADI, APP. VED MANDEER, DHAMANKAR CORNER, NASHIK 422002 , Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK Executive Editor- Sanju Pawar, Resident Editor- Jayant Mahajan.

महासागर नाशिक हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. प्रिंटर्स, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा, वैशाली नगर, दहिसर ईस्ट, मुंबई येथे मुद्रीत करून 'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२ . येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - संजू पवार (मो. नं. ९८९०१०९९७८) निवासी संपादक - जयंत महाजन (९४२०६९१४२०) Email : mumbaimahasagar@gmail.com